
साप्ताहिक

२५ जानेवारी ८६ / २ रुपये

# माणूस

## तलासरीत



साप्ताहिक

# माणूस

वर्ष : पंचविसावे
अंक : पस्तिसावा

२५ जानेवारी १९८६
किंमत : दोन रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ निर्मला पुरंदरे
मेघा राजहंस

वार्षिक वर्गणी
साठ रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही

राजहस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०
दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ–श्याम देशपांडे

## सप्रेम नमस्कार, माणूस

### ज्योतिषपरिषद : योग्यच केले !

दि २८ डिसेंबर ८५ च्या अकात 'पुणे वार्ता' सदराखालील 'बुद्धिप्रामाण्यवाद्याचा सवाल' ह्या वार्तेसबंधात हे पत्र. त्या वार्तेत सुरुवातीलाच, 'या ( ज्योतिष ) परिषदेत बुद्धिप्रामाण्यवादी मचाच्या शाम मानवानी बोलण्याचा प्रयत्न केला; पण त्यांचा हा धाडसी प्रयत्न या व्यासपीठावर सफल होऊ शकला नाही' असे म्हटले आहे.

दि. १४ डिसेंबरच्या अकात परिषदवृत्त आले होते त्यात याचा उल्लेख नव्हता. मी नियमित घेत असलेल्या (म. टा.) पत्रात श्री. मानवाचे आव्हान आले, पण 'ही' वार्ता नव्हती. समजून उमजून ही वार्ता दैनिकानी छापली नसेल तर ते योग्यच केले. जी परिषद ज्योतिष अभ्यासकांची आहे त्या परिषदेच्या व्यासपीठावर विरोधकानी बोलण्याचा (धाडसी !) प्रयत्न करावा, हक्क मागावा हा आश्चर्यकारक प्रकार आहे. हा प्रकार म्हणजे आजच्या समाजजीवनात आलेल्या वाह्यातपणाचा नमुना आहे श्री. मानवांचे आव्हानही याच प्रकारात मोडते. त्यानी दहा कुडल्या व दहा ठसे ज्योतिषांना देण्यापेक्षा पाच–पन्नास कुंडल्या घ्याव्यात, ज्योतिष ग्रथाचा अभ्यास करावा व 'त्यातील नियम या कुडल्याना बसत नाहीत' हे सिद्ध करावे. ते (श्री. मानव) हे सिद्ध करू शकल्यास त्यानी परिषदा भरवून जरूर त्याचा प्रसार करावा; पण जे व्यासपीठ त्याचे नव्हे, त्या व्यासपीठावर हक्क सागू नये. माझ्या मतें बु. प्रा. वादातही हे न बसणारे आहे.

श्री. सोनवणे यांच्या माहितीसाठी, झालेल्या घटनेबद्दल (किंवा एखादा निर्णय घेण्यावेळी) 'दोन गुणिले दोन बरोबर चार' या इतक्या सरळ नियमाने जेव्हा खुलासा होत नाही ( किंवा निर्णय घेता येत नाही ) तेव्हा सामान्यच नव्हे तर बुद्धिवतसुद्धा 'नशिब' किंवा 'लक'वर विश्वास ठेवतात. 'माणूस'-मधील एका लेखात डॉ. शरद अभ्यंकर यानी 'सर्वच प्रश्नांना – घटनाना बु. प्रा. वादातून उत्तरे मिळू शकत नाहीत' हे मान्य केले होते व घटना ( किंवा निर्णय घेणे ) याचा खुलासा (किंवा सल्ला) फलज्योतिषाच्या माध्यमातूनच करता ( देता ) येतो श्री. सोनवणे यानी 'कॉम्प्युटर कुडल्याचे फॅड' म्हणून उगाचच छाती पिटून घेऊ नये. कॉम्प्युटर हे प्रोसेसिंगचे माध्यम ( टूल ) आहे. त्याचा वापर कुडली करण्यासाठी करण्यात गैर ते काय आहे ? उलट तथाकथित विज्ञाननिष्ठापेक्षा ज्योतिषी विज्ञाननिष्ठ आहेत. ते ज्योतिष तर सोडत नाहीतच (कारण विज्ञानाने सर्वच गोष्टीचा कार्य-कारणभाव दाखविता येत नाही ) पण विज्ञानाधिष्ठित यत्राचाही ते वापर करतात.

ही मडळी केवळ विज्ञानशाखेतील पदवीधारक म्हणून विज्ञाननिष्ठ का ? मग ज्योतिष परिषदेतील एका सत्राचे अध्यक्ष प्रसिद्ध शल्यविषारद डॉ. भा. नि. पुरंदरे हे होते. या मडळीनी स्वत: शहाणे व याचे न मानणारे ते गाढव असे मानण्याचे कारण नाही.

याच वार्तेत नरेंद्र दाभोळकराचा उल्लेख आहे म्हणून, दिवाळी ( १९८५ ) पूर्वीच्या 'माणूस'च्या अकात डॉ. नरेंद्र दाभोळकराच्या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाचा वृत्तात आलेला आहे. त्यात त्याचे 'प्रभादेवीच्या मदिरापुढच्या रागानी मी अस्वस्थ होतो' असे उद्गार दिलेले आहेत. या रांगातील लोकाना जी अनुभूती येते (जशी बुद्धिवताना 'नशिब' किंवा 'लक' ची येते ) तशी डॉक्टरमहाशयांना आलेली दिसत नाही.

हा प्रकार कायदा क्षेत्रातील 'सर्कमस्टन्शियल एव्हिडन्स' सारखा आहे. विज्ञाननिष्ठ जर अनुभूती नाकारणार असतील तर 'सर्कमस्टन्शियल एव्हिडन्स्' ही नाकारावा लागेल.

या परिषदेला हजर राहण्याची माझीही इच्छा होती, पण वैयक्तिक अडचणींमुळे मी उपस्थित राहू शकलो नाही. श्री. मानवांना व्यासपीठाचा वापर करण्यास संयोजकांनी मनाई केली असल्यास योग्य तेच केले. पण संयोजकांनी परवानगी दिली असती व मी हजर असतो तर मीच त्यांना बोलू दिले नसते. कारण श्री मानवांचा ज्योतिषविरोध ऐकण्यासाठी काही मी मुंबईहून पुण्याला गेलेलो नसतो. या विज्ञाननिष्ठांच्या असहिष्णुतेतून उद्भवणाऱ्या वाह्यातपणाला त्या त्या ठिकाणी प्रतिकार लगेच झाला पाहिजे असे माझे मत आहे.

१३ जानेवारी ८६ **श्री. आ. अळवणी**
कांदिवली

## मुंबई वाचवण्यासाठी...

¤ माणूसच्या १४ डिसेंबरच्या अंकातील श्री. टेमगिरे व शरद जोशी यांचा 'मुंबई वाचवण्यासाठी' हा लेख व त्याचप्रमाणे ११ जानेवारीच्या अंकातील श्री. फिरोझ रानडे यांचेही त्याबद्दलचे विचार वाचले. मुंबईची समस्या दिवसेंदिवस फारच गंभीर होत चालली आहे. याबाबत कुणाचेही दुमत होणार नाही. श्री. रानडे म्हणतात त्याप्रमाणे आजवर दुर्लक्षिल्या गेलेल्या या जटिल समस्येवर जाहीर चर्चा, अभ्यासपूर्ण लेखन, परिसंवाद व इतर माध्यमांतून जनतेचे तसेच राजकीय व इतर क्षेत्रांतील मान्यवर व्यक्तींचे लक्ष वेधले पाहिजे. निरनिराळ्या संघटना व संस्थांनीही या दिशेने सक्रीय पाऊल उचलून या दिवसेंदिवस भयानक होणाऱ्या समस्येबद्दल वातावरण तापवून महाराष्ट्र व केंद्र सरकारचे, विशेषत: राजीव गांधींचे लक्ष वेधून घेतले पाहिजे.

व्यापक दृष्टीने जर विचार केला तर सतत वाढणाऱ्या लोकसंख्येचा प्रश्न या सर्व प्रश्नांच्या मुळाशी आहे. सरकारने त्यासंबंधी उपाययोजना करण्यास अग्रक्रम द्यावा. पण कांग्रेस शताब्दीच्या अनेक चर्चासत्रांमध्ये याविषयी उल्लेखही नाही. कांग्रेस शताब्दीनिमित्त केलेल्या जाहीर भाषणात श्री. राजीव गांधींनी झोपडपट्टीचा प्रश्न सोडवण्यासाठी १०० कोटी रुपये मंजूर केले. विशेषत: याचवेळी ते म्हणाले, की, शहरांचे प्रश्न फार उशीर होण्यापूर्वीच सोडविले पाहिजेत. मुंबईत अधिक घरे बांधून देणे, सुखसोयी निर्माण करणे, मानखुर्द–बेलापूर रेल्वे हे त्यावरील उपाय खास नाहीत. भावी काळाचा विचार करून या १०० कोटी रुपये देण्याच्या घोषणेऐवजी कोकण रेल्वे पूर्ण करण्याचे आश्वासन दिले असते तर ते जरूर औचित्यपूर्ण व मुंबईकरांच्या एकूण हिताचे झाले असते. कोकणच्या विकासाचा तो कणा आहे व त्यामुळे कोकणातील लोंढा काही वर्षे तरी थांबला असता. सांगोपांग विचार न करता वरवर मलमपट्टी करून शेवटी मतपेटीवर लक्ष ठेऊनच राजकारणी लोक घोषणा करत असल्यासारखेच त्यामुळे वाटते.

मुख्यमंत्री श्री. निलंगेकरांनीही कोकण विकासाचा ४० कलमी कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यात रस्ते, पूल, थोडे कारखाने, तंत्रज्ञान विद्यालये अशाच गोष्टींचा समावेश आहे. त्याऐवजी त्यांनी राजीव गांधींजवळ कोकण रेल्वेचा आग्रह धरावयास हवा होता. व मुंबई सोडून उर्वरीत महाराष्ट्राचा विकास करण्याकडे लक्ष द्यावयास हवे होते. त्यामुळे महाराष्ट्राचा विकासही जरूर साधला असता आणि भविष्यकाळातही मुंबईतील गर्दी कमी होण्याची शक्यता निर्माण झाली असती.

१६ जानेवारी ८६ **सौ. ज्योत्स्ना पेंडसे**
वरळी, मुंबई

### खुलासा

'माणूस' ११ जानेवारी ८६ अंकात 'महाराष्ट्रातील दुष्काळ हटविण्यासाठी उपाययोजना' हा लेख प्रसिद्ध झाला. या लेखाचे लेखक श्री. एच्. एम्. देसरडा यांचे नाव चुकून एस्. एम्. देसरडा असे छापले गेले. क्षमस्व. □



## मुंबापुरी

### □ करमणूक

नव्या वर्षाच्या मुहूर्तावर मुंबईत सांप्रत जुने, चांगले सिनेमे दाखल झालेत.

लहानपणी क्लासटीचरबरोबर पाहिलेला 'दोस्ती' हा राजश्री प्रॉडक्शन्सचा रडवा सिनेमा पुन्हा जोरात चालू आहे. स्टोरी भयानक कंटाळवाणी. सगळा रडवेपणा भरलेला. टिपिकल राजश्री स्टाइल. पण 'दोस्ती'ची गाणी सुरेख आहेत. त्यावेळीही गाजली. आताही लोक गुणगुणतात. 'पारसमणी' नंतर उदयाला आलेली लक्ष्मीकांत–प्यारेलाल ही जोडगोळी ह्या सिनेमानंतर तेजीत चालली.

मदनमोहनच्या कमळस्पर्शाने बहरून गेलेसा 'हीर–रांझा' हा सिनेमा आजही ताजा, टवटवीत वाटतो तो लताच्या गाण्यांमुळे. 'मिलो न तुम तो हम घबराये' हे लताचं खास पंजाबी ढंगातलं गाणं म्हणजे मदनमोहनचं नाजूक कशिदाकामच वाटतं. 'यह दुनिया यह महफिल' ही रफीची आर्त विराणी कोण विसरेल?

'खईके पान बनारसवाला...' असं म्हणत अलाहाबादी भांगेची महती गाणारा अमिताभ अलाहाबादेतून लोकसभेवर गेला असेल. पण त्याच्या नावाची जादू अद्याप लोकांना भुरळ पाडते, बनारसी पानासारखी. 'डॉन' हा त्याचा आणि भूतपूर्व स्वप्नसुंदरी झीनत अमान हिचा पिक्चर पुन्हा रि–रनला आलाय.

हा पिक्चर लोकसभेच्या इतर खासदारां नाही दाखवावा. म्हणजे उड्या कशा मारायच्या, माकडचेष्टा कशा करायच्या त्याचं नीटसं शिक्षण मिळेल. एवतेवी राजकारण म्हणजे निव्वळ करमणूक झालीये. ही करमणूक थोडी नीटस व्हावी असं वाटतं. खासदार, बच्चनजी, आपला ह्याला विरोध नसावा.

## ☐ शाहबानो – भाजप

इंदूरच्या शाहबानोने अनेकावर उपकार करून ठेवलेत. नाहीतर त्या क्षेड. ए. अन्सारी-साहेबाना इतकी गरळ ओकायला कशी मिळाली असती ? आणि त्या नज्मा हेप-तुल्लांना भरमसाठ मुलाखती कशा द्यायला मिळाल्या असत्या ?

तसच, आमच्या मुबईच्या भाजपवाल्यांना आदोलनाचा नया दौर सुरू करायला एरवी नवेनवे बहाणे हवेच असतात. आता समान नागरी कायद्याच्या मागणीकरता आदोलन भाजपवाल्यांनी नाही तर काय मुस्लिम लीगने छेडायच ? शाहबानोकाकू, थोर तुमचे उप-कार हं.

निवडणुकीत अतिशय थोर, चिरस्मर-णीय अशी आपटी खाल्ल्यानंतर भाजपवाले कसे शांत, चित्तलीन झाले होते. आम्हाला वाटल की हे सगळे लोक सूक्ष्मात गेले म्हणून. हिंदु राजे युद्धात हरले की सूक्ष्मात वगैरे जात असा आमचा अद्याप समज (गैर किंवा कसही) आहे.

राम नाईक, मधू देवळेकर, रामदास नायक (अतुल्याचे बेटर हाफ) आणि किरीट सोमैया प्रभृती मंडळी निवडणुकीत हरल्या-मुळे की काय कोण जाणे; अगदी चिडीचाप झाली. पत्रकं नाहीत. वार्ताहर-परिषदा नाहीत. नेहमीच्या प्रश्नावर आदेश–सदेश वगैरे कुछ नही. नाही म्हणायला राम नाईकानी दिडोशी भूखड प्रकरणाची बाग ठोकून तुफान टीकेची राळ स्वतःवर ओढून घेतली. मुबईतली सगळी वर्तमानपत्रं म्हणजे 'पत्र, नव्हे मित्र' असतात असा रामभाऊंचा निरागस समज होता संतानीच म्हटलंय, सगळ्या समजा-गैरसमजातून बाहेर पडावं. मुक्त व्हाव. रामभाऊ असे भ्रममुक्त झालेत म्हणून आम्हाला कोण आनद झाला.

मुबई भाजपवाले दिंडोशीहून थेट इंदूरच्या शाहबानोकडे जातील अस जरासुद्धा वाटलं नव्हतं. आम्ही मनात म्हणत होतो की शाह-बानो प्रकरणी आदोलन–बिदोलन छेडण्याचं काम मेहरून्निसा दलवाई, छाया दातार, मृणाल गोरे वगैरे बायका करतील. केशव गोरे सभागृहात वगैरे मिटिंगा होतील त्याला जाऊ, अस आम्ही आपलं मनाशी सागत होतो तोच मुबई भाजपने के. सी. कॉलेज हॉल-मध्ये लालकृष्ण अडवाणी (यांना व्यवस्थेतले लोक लालजी असंही म्हणतात असं एका भाजप कार्यकर्त्याने सांगितलं. आता ही व्यवस्था म्हणजे कुठली ?) यांच्या नेतृत्वा-खाली एक जगी सभा घेऊनही टाकली.

मृणालताईंनी काही यासंबधी करण्यापूर्वी आपण कॅंपेन सुरूही करावा असा भाजप-नेत्याचा प्लॅन असावा. पण हा इतका उमदा प्लॅन निदान लालजी अडवाणीना सांगायचा की नाही ? के. सी. च्या सभेत लालजीनी सुरुवातीलाच सांगून टाकलं की मुबई भाजप शाहबानो प्रकरणी आदोलन किंवा बिदोलन करणारेय याची आपल्याला माहिती आधी नव्हती.लालजी आता भ्रममुक्त झाले असतील.

## ☐ चित्ररथाची कथा

स्त्रीहट्ट, बालहट्ट आणि राजहट्ट अशी हट्टांची 'हॅट–ट्रिक' पुरवता पुरवता मुबई महानगरपालिकेच्या जनसपर्क अधिकाऱ्याची तारांबळ उडाली. कशी ते सांगतो.

गणराज्यदिनानिमित्त शिवाजी पार्कवर होणाऱ्या संचलनात महापालिकेतर्फे प्रत्येक वर्षी एक चित्ररथ पाठविण्यात येतो. यावर्षी हा चित्ररथ पाठवण्यात येऊच नये. त्याऐवजी त्यावर खर्च होणारी लाखभराची रक्कम नागरी सोयीवर खर्च करावी अशी सूचना अतिरिक्त महापालिका आयुक्त एस् राममूर्तींनी केली. तसं त्यांनी मत्रालयाच्या सामान्य प्रशासन खात्याला कळवूनही टाकलं.

महापालिका आयुक्त जमशेद कागा यानी आयत्या वेळी हा निर्णय फिरवला. चित्ररथ तयार करण्याचा हुकूम सुटला. पैशाची सोयही झाली हे सगळ आटपता–आटपता जानेवारीचा पहिला आठवडा उजाडला. आता अवघ्या पधरवड्यात चित्ररथ कसा तयार होणार ?

नेहमीच्या प्रथेला बाजू सारून जनसंपर्क अधिकाऱ्यानी स्पॉट टेंडर्स मागवली. ज्या काही आठ–दहा निविदा आल्या होत्या त्यात 'डायलॉग' आणि 'अरुणा आर्टस्' या दोन जाहिरात संस्था होत्या. 'डायलॉग'चे सर्वे-सर्वा आहेत शालिनीताई पाटलाचे चिरंजीव राजेंद्र पाटील. तर 'अरुणा आर्टस'चे अध्वर्यू आहेत बाळासाहेब ठाकऱ्याचे युवराज उद्धव ठाकरे. आले की नाही तीन हट्ट छळायला ?

'डायलॉग'वाल्या राजेंद्र पाटलाचं टेंडर मुद्दाम डावलून महापालिकेने उद्धव ठाकऱ्याना चित्ररथ बनवण्याचं कंत्राट दिलं असा सर्वत्र बोलवा आहे.

## ☐ माश्या मारणे–एक कला

विधानसभेचे हिवाळी अधिवेशन नाग-पुरात सुरू झाल्यापासून मुंबापुरीत करण्या-सारखे काही काम उरले नाही जेव्हा कोण-तीही बातमी नसते तेव्हा शरद पवार इंदिरा कॉंग्रेसमध्ये जाणार अशी वार्ता देण्याची प्रथा आहे. परतु सतत ह्या बातमीचा इन्कार करून पवारानी पत्रकाराचा फार हिरमोड केला आहे. यामुळे मत्रालयात काय किंवा महापालिकेत काय पत्रकाराना ह्या दिवसात फारसे काम राहिलेले नाही.

काही ज्येष्ठ पत्रकार दुपारी दोन वाजल्या-पासून मंत्रालयात माशा मारण्याचा कार्यक्रम पार पाडतात. ह्या उपक्रमाला लोकानी हकनाक बदनाम केले आहे. अन्यथा फावल्या वेळात माशा मारण्यासारखा उद्योग नाही. आम्ही तर महापालिकेत वेळात वेळ काढून हा छद पुरवितो.

तुम्हाला वाटते तितका हा छद सोपा नाही. आम्ही पत्रकार आहोत म्हणून सांगतो, माशा पकडणे ही एक कला आहे. भर पहाटे किंवा रात्री माशा पकडणे सोपे असते. कारण या वेळात त्या सुस्त असतात. दुपारच्या वेळी मात्र त्या चटकन् उडून जात असल्याने मनस्ताप होण्याचा सभव जास्त असतो. मत्रालयात जे पत्रकार माशा मारतात ते सरकारच्या बाजूचे पत्रकार समजले जातात आणि महापालिकेत ते पालिका प्रशासनाची बाजू उचलून धरतात. असो.

माशी पकडताना नेहमी तोंडाच्या दिशेने पकडावी. आपण तीर्थप्रसादासाठी करतो तशी उजव्या अथवा डाव्या हाताच्या पंजाची खोबण करावी. माशी बसली असेल तेथ-पासून साधारण एक वीत अतरावर हात धरावा. परंतु शक्यतो माशीवर हाताची सावली पडणार नाही याची काळजी घ्यावी. माशी नेहमीच तोंडाच्या दिशेने उड्डाण करते. त्यामुळे त्या दिशेने हात फिरविल्यास माशी हमखास पजाच्या खोबणीत सापडते घट्ट मिटलेली मुठ किंचित सैल केली की माशी बाहेर पडण्यासाठी धडपड करते. त्यामुळे ती मुठीत सापडली आहे याची खात्री पटते.

माशी चिमटीत पकडण्यासाठी दुसऱ्या

हाताचे अगठ्याजवळील बोट मुठीत सरकवून माशी चाचपून पहावी. माशीचे पख पकडल्याने हाताची बोटे खराब होण्याची शक्यता कमी रहाते ' माशीचे एकदा पंख छाटून टाकले की ती कोणत्याही प्रकारे मारणे सोपे जाते. या सर्व प्रकारात तीन ते चार मिनिटे सहज जातात.

सुरवातीस ही कला अवगत करण्यास कठीण वाटली तरी सवयीने श्वासोच्छ्वासाइतकी नकळत ही प्रक्रिया होऊ शकते. अखेर लेखन सोडले तर अशी कोणती कला आहे की जी पत्रकारांना सहजासहजी साध्य होणार नाही !

—विष्णु जयदेव

## पुणे वार्ता

### ☐ युवावर्षाचा निरोप !

१९८५ संपले, त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय युवक वर्षही संपले. गेल्या वर्षी १२ जानेवारीला स्वामी विवेकानदाच्या पुण्यस्मरणाने युवावर्षाची सुरुवात झाली आणि यदा त्याच्याच पुण्यस्मरणाने, सागता ! पुण्यात या निमित्ताने विविध सस्थानी कार्यक्रम सादर केले, मिरवणुका काढल्या आणि युवावर्षाला ' अलविदा ' केले !

पुण्यातील काही युवक सघटनानी एकत्र येऊन ' उत्सव ८५ ' हा युवोत्सव साजरा केला. दि ४ जाने. ते १२ जाने. ८६ च्या दरम्यान पार पडलेल्या या उपक्रमात वृक्षारोपण, रक्तदान शिबिरे, समाज प्रबोधक पथनाट्ये, परिसंवाद असे युवकांच्या सामाजिक जाणिवाचे प्रतिबिंब असलेल्या कार्यक्रमाबरोबरच त्याचे विविध कलाविष्कार व्यक्त करणारे कार्यक्रमही आयोजित केले होते. या सर्व कार्यक्रमातून जाणवला तो युवकाचा उत्साह–युवाचैतन्याचा सळसळाट !

दि. ४ जानेवारीला सकाळी पिंपरी–चिंचवड प्राधिकरणापासून युवा प्रेरणा ज्योत निघाली आणि धावपटूनी ती टिळक स्मारक मंदिराच्या आवरात आणली. प्रसिद्ध जलतरणपटू कु. सरिता किनरे हिने उत्सवाचे उद्घाटन केले. प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना पुणे विद्यापिठाचे कुलगुरू डॉ. व्ही. जी. भिडे यानी युवकाचा उत्साह आणि मोठ्यांचा अनुभव यांच्या मिलाफातून नव्या सामर्थ्यशाली समाज घडू शकेल असे सागितले. विद्यापीठ आणि युवक सघटना याचे कार्यक्रम एकाच व्यासपीठावर होण्याच्या दृष्टीने प्रयत्न चालू असल्याचेही त्यानी सागितले. अखेर विविधरंगी आनदयात्रेने या उत्सवाची सागता आणि त्याचबरोबर युवावर्षाला अखेरचा निरोप दिला.

युवावर्षाच्या समारोपाच्या निमित्ताने फर्ग्युसन महाविद्यालयानेही ' INSYCH 85 ' हा उपक्रम सादर केला, तर आबासाहेब गरवारे महाविद्यालयातही युवोत्सव साजरा झाला. १२ जानेवारीला सकाळी विद्यापीठाने भव्य रॅली आयोजित केली आणि त्यात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आढळला.

या साऱ्या कार्यक्रमातून युवावर्षाला निरोप तर दिला गेला पण खरेच या वर्षाबरोबर युवावर्ष संपले आहे का ? खरं तर हा प्रश्न आपण प्रत्येक वर्षाच्या शेवटी विचारतोच. प्रत्येक वर्ष आपण कुणाचे तरी म्हणून जाहीर करतो. त्या निमित्ताने वर्षभर वेगवेगळे उपक्रम चालतात. खर म्हणजे या वर्षाच्या निमित्ताने सवाद सुरू होतो. गरज असते ती त्याच्या पाठपुराव्याची ! युवक वर्षाच्या निमित्ताने युवकाचे विविध प्रश्न माडले गेले. त्यावर चर्चाही झाल्या. युवाशक्तीचे महत्त्व वारवार सागितले गेले.

युवकांमधली वाढती व्यसनाधिनता आणि त्याचे दुष्परिणाम ही एक गभीर समस्या आहे. त्यामागील कारणमीमासाही गुतागुतीची आहे. युवावर्षाच्या निमित्ताने या समस्येवरही प्रकाशझोत पडला आहे. ही व्यसनाधिनता कमी होऊन युवाशक्ती विधायक कामाकडे वळवणे शक्य झाले तर युवावर्ष खऱ्या अर्थाने सफल होईल असे वाटते.

विद्यापीठ आणि विद्यार्थी सघटना याच्यात सुसवाद आणि समन्वय निर्माण होण्याचीही गरज आहे. त्या दृष्टीनेही पावले उचलली जात आहेत असे कुलगुरूच्या वक्तव्यावरून वाटते ही देखील एक समाधानाची बाब.

### ☐ वहातूक सप्ताह : काय साधणार ?

पुणे शहरातील वाहतूक हा आता विनोदाचा विषय बनला आहे तुम्ही शहरातील कुठल्याही रस्त्यावर असा– वहातुकीची गुतागुत टाळणे हा एक कसरतीचा प्रकार असल्याचा अनुभव पदोपदी येतो. तुम्ही पायी चालत असा किंवा वहान चालवत असा. तुफान ट्रॅफिक जॅम्समुळे तुम्ही सदैव हैराण असता. कुणी म्हणत पुण्यातील वहातुकीला शिस्त नाही. कुणी म्हणत नियत्रण नाही, कुणी अरुद रस्ते, खराब रस्ते, रस्त्यावरील विविध अतिक्रमणे याना दोष देताना आढळतो. एकूणच पुणे शहरातील वहातूक ही ही एक समस्या आहे.

आता पुण्यात वहातूक सौजन्य सप्ताह सुरू झाला आहे. या निमित्ताने काही कार्यक्रमही आयोजित झाले आहेत ज्यात मार्गदर्शनावर प्रामुख्याने भर देण्यात आला आहे. चित्रपटगृहातून स्लाईड्स् दाखविल्या जात आहेत वगैरे वगैरे. खरोखरच या एका सप्ताहाने काही साधणार आहे का ? पुण्यातील वहातुकीचे प्रश्न सोडविण्यास हा सप्ताह कितपत उपयुक्त होऊ शकेल ?

पुणे शहराची लोकसख्या झपाट्याने वाढली आहे आणि वाढतेच आहे. या वाढीच्या वेगाशी तुलना करता रस्त्याची लाबी, रुंदी, नव्या मार्गांच्या योजना यात फारच तुटपुजी भर पडली आहे त्यातच नवनवी वहाने रस्त्यावर येऊ लागली आहेत. मोपेड्स्चा सुळसुळाट वाढला आहे. या वाढत्या वहानामुळे रहदारीचा प्रश्न बिकट बनला आहे. सायकल, बैलगाडीपासून, स्कूटर्स, मोपेडस्, कार्स, ट्रक्स ही वेगवेगळ्या वेगांनी धावणारी वहाने एकाच रस्त्यावरून धावतात. ओव्हर टेकिंगमध्ये अपघात घडतात. वाढत्या वहानासाठी पार्किंगच्या सोयी अपुऱ्या आहेत त्यामुळे रस्त्यात कुठेही वहाने थाबलेली आढळतात.

रस्त्यावरील अतिक्रमण हाही असाच चिंतेचा विषय. झोपडपट्ट्या, फुटपाथवर माडलेले संसार, फेरीवाले आणि रस्त्यावरील विक्रेते यानी अडवलेली जागा, वर्कशॉप्स आणि दुकानानी रस्त्यावर आणलेले त्याचे उद्योग. कित्येकदा मालाची ने-आण करणारी वहाने रस्त्यावर उभी असतात आणि ट्रॅफीक अडवून मालाची ने-आण वहानामध्ये होत असते. ही सारी दृश्ये कायम पहायला मिळतात. गजबजलेल्या रस्त्यावर तर नेहमीच.

पृष्ठ ३२ वर


# वि. ग. कानिटकर आणि आम्ही

वि. शं. पारगावकर

**का**ळाची जाणीव केव्हा होते ? एखाद्या घटनेच्या आठवणीच्या मुळाशी जर काळ असेल तर त्या घटनेबरोबरच काळाची आठवण होणे अपरिहार्य असते. मग आठवणींच्या त्या शृंखला काळाच्या धाग्यात कशा गुंफल्या गेल्या आहेत याची जाणीव होते. आणि मग काळ आणि जीवन यांचे नाते किती अतूट आहे हे देखील जाणवते. माणसाच्या जीवनातून काळ कसा वहात असतो हे पाहणे मोठे मनोरंजक असते. काळाचा प्रवाह एखाद्या नदीच्या प्रवाहासारखा असतो. नदीचा प्रवाह डोळ्यांना दिसतो तसा काळाचा दिसत नाही. परंतु माणसाच्या पायाखालून काळाच्या वाळूचे कण सतत निसटत असतात. मनुष्याचे पाय जोवर जमिनीवर टिकून असतात तोपर्यंत या निसटत्या कणांची जाणीव होत नाही. परंतु काळाच्या संदर्भात मनुष्य जेव्हा जेव्हा जीवनाकडे पाहतो तेव्हा तेव्हा काळ आणि जीवन यांची चाललेली झटापट लक्षात येते. आणि मग काळाचे अदृश्य स्वरूप आणि त्याच्या शक्तीची जाणीव होते.

माझे मित्र वि. ग. कानिटकर यांना नुकतीच साठ वर्षे पूर्ण झाली; हे सहज आठवले आणि वरीलप्रमाणे काळाची जाणीव मला प्रकर्षाने झाली. वि. गं. ची माझी ओळख किंवा प्रथम भेट केव्हा झाली ते आठवत नाही. वीस पंचवीस वर्षापूर्वी (पुन्हा काळाची आठवण) ती झाली हे आठवते. तेव्हा आमची तरुण लेखकांची पिढी ऐन बहरात होती. नियतकालिकातून नियमित लेखन होत होते. ते वाचकांपर्यंत पोहोचत होते तसेच आमच्या पिढीतील निरनिराळ्या लेखकांपर्यंतही पोहोचत होते. ते वाचून एक नवेच नाते मनात निर्माण होत होते. संवाद साधण्याची उत्कंठा वाढत होती. मग शक्य असेल तेव्हा पत्राने किंवा प्रत्यक्ष भेटीने देखील ही उत्कंठा पूर्ण केली जात होती. १९५५ साली पुण्यात तेव्हा आम्ही एक कथा लेखक मंडळ स्थापन केले होते. पुण्याचे आम्ही लेखक तेव्हा दर पंधरा दिवसांनी एका लेखकाकडे जमत होतो. आणि मनसोक्त गप्पा मारत होतो. तेव्हा एकमेकांच्या लेखनाविषयी, ( लेखनाविषयी फार नव्हे ! ) विशेषत: तिसऱ्याच्या लेखनाविषयी गप्पा होत. मात्र प्रत्येकाला दुसऱ्याच्या लेखनाविषयी कुतूहल असेच. तेव्हाची आठवण अशी की कमलाबाई फडके यांच्यापासून मंगेश पदकीपर्यंत बहुतेक पुण्यातील सर्व लेखक जमत असत. अरविंद गोखले, व्यंकटेश माडगुळकर, नानासाहेब गोरे; ( ते तर मंडळाचे अध्यक्षच होते, आणि मी कार्यवाह होतो.) पाहुणे श्रेष्ठ लेखक म्हणून ना. सी. फडके, श्री. म. माटे आणि चिं. वि. जोशी यांनाही आम्ही बोलावीत असू.

तो काळ मोठा छान होता. परंतु तेव्हा आठवते ते म्हणजे आज पुण्यात आहेत ते लेखक विद्याधर पुंडलीक आणि वि. ग. कानिटकर तेव्हा पुण्यात नव्हते. कथा लेखक मंडळाचा बहर ओसरल्यावर हे दोघे पुण्यात आले. आणि श्री. माजगावकरांचा ' माणूस ' सुरू झाल्यावर वि. गं. ची माझी ओळख झाली. माझी कथा ' माणूस 'च्या दिवाळी अंकासाठी मागण्यासाठी वि. ग. माझ्याकडे आले होते. ती पहिलीच भेट असे आठवते. ओळख झाली आणि गप्पांना सुरुवात झाली तो दिवस रविवारचा असावा. वेळ सकाळची, कोणालाही कामाची घाई नव्हती. आमच्या गप्पा साडेबारा एकला संपल्या आणि आश्चर्य असे की, पहिल्याच भेटीत फार लवकर आमच्यामधला औपचारिकपणा गेला आणि आम्ही एकमेकाला एकेरी नावाने संबोधू लागलो. नंतर असं समजलं की, वि. ग. माझ्या घरापासून फक्त पाच मिनिटांच्या अंतरावर राहतात. पुढे येणं जाणं खूप वाढलं आणि वि. ग. मनावर जास्त ठसले. तेव्हा



राजकारण
इतिहास
विनोद
कथा
कादंबरी
—साहित्याच्या
सर्वच क्षेत्रात
मुक्त आणि
बहारदार
संचार...

त्याच्याच जवळ श्री. माजगावकरही राहात होते. मग जेव्हा जेव्हा वि. ग. कडे जात होतो तेव्हा मी, वि ग. आणि माजगावकर याच्या गप्पा होत. कधी कधी गप्पाच्या कैफात रात्रीचे बारा देखील वाजून जात. डोळयावर झोप तर नसेच पण गप्पाच्या नादात घरच्याही आठवणी पार विसरल्या जात. प्रत्येकाची आपापली घर होती. म्हणून मोठ्या नाइलाजान घरी जावं लागे !

मद्याची नशा असावी तशी गप्पाची नशा रक्तात भिनून गेलेली असे. एक अनाकलनीय आनंद मनावर पसरलेला असे. ही व्यक्तिमत्त्वे पूर्णपणे एकमेकात मिसळलेली होती. तेव्हाची मनःस्थिती आठवली की अद्वैत कशाला म्हणतात हे निराळ्या शब्दात सांगण्याची गरज नाही. नतर केव्हा तरी विद्याधर पुंडलीकही पुण्यात आले. श्री ज. जोशी मूळचे पुण्याचेच; (अस्सल सदाशिवपेठी) परंतु नोकरी निमित्त कुठे बाहेरगावी गेले होते ते पुण्यात आले. माटे, चिं. वि. जोशी गेले, तारा बनारसे विदेशी गेल्या, अरविंद गोखले मुंबईला गेले. कथालेखक मंडळाचा त्यामुळे अस्तच झाला होता; पण मग श्री. ज., पुडलीक, पदकी, रंगा मराठे, सरिता पदकी, मिरासदार, नंतर शकर पाटील, बाळ गाडगीळ अशी नवी लेखक मंडळी एकत्र जमू लागली. त्यात वि. ग. च घर आणि माझं घर हे केंद्रबिंदू केव्हा झालं हे कळलं नाही. दिवसभराची कामं उरकली की मित्रमंडळी माझ्याकडे किंवा वि गं. कडे जमत. आणि रात्री बारा वाजेपर्यंत गप्पा चालत. (बिचाऱ्याच्या बायकाच्या मनःस्थितीची आज कल्पना येते ! )

पुढे वि. ग., मी, पुडलीक आणि माजगावकर यांच्या भेटी सहजपणे लवकर लवकर होऊ लागल्या आणि बैठकीही झडू लागल्या. पदकीही कधी रस्त्याच्या फूटपाथवरून जाताना दिसे. तो एकटाच भणभणत्या डोळ्यानी जाताना दिसे. दुसऱ्या फूटपाथवरून मी जाताना त्याला दिसलो की तो क्षणभर थाबे आणि एक हात वर करून ओरडे, 'पाऱ्या, तुझी गोष्ट वाचली. भिकार आहे !' मीही त्याला इकडून हसत हसत म्हणे 'गोष्टीवरचं नाव नीट पाहा. सरिताबाईंची किंवा कदाचित तुझीच असेल ती !' त्यावर दोघेही मोठमोठ्यानं हसत असू आणि आपापल्या रस्त्याने निघून जात असू.

वि ग., पुडलीक, जोशी, मी आणि माजगावकर असे नेहमीच भेटत होतो.

माजगावकर यांचा स्वभाव शात आणि सयमी. जोशीबुवा मिस्किल आणि टिंगलखोर, पुडलीक अंतर्मुख आणि नेमक व कमी बोलणारे. (ते नेहमी श्री. पु. च्या धाकात असल्यासारखे वाटत ! ) वि. ग. मात्र उजळत्या डोळयांनी आळीपाळीन सर्वांकडे पाहात असत. गंभीरपणाचा आव आणून एखादाच शब्द बोलत आणि ते बोलल्यानंतर लक्षात येई की, त्यानी अमक्याची टोपी उडविली आहे. विशेषतः वि. ग. आणि जोशीबुवाचे हे पट्टे फार श्रवणीय असत.

त्याच काळात माजगावकरानी वि. ग. ची 'नाझी भस्मासुराचा उदयास्त' ही लेखमाला 'माणूस' मध्ये सुरू केली आणि थोड्याच अवधीत तो काळ नाझीच्या भणाणत्या व्यक्तिमत्त्वाने झपाटून गेला. ही लेखमाला फारच प्रभावी ठरली आणि वि. ग. ला आम्ही सर्वजण 'नाझी भस्मासूर' म्हणून सबोधू लागलो ! मात्र पुण्याचं तेव्हाच वातावरण मला अजून आठवतं. सारं वि गं. च्या लेखमालेने भारावून गेलेलं होत. पुण्यातील 'माणूस' चा वाचकवर्ग नवा अक केव्हा हाती येतो याची उत्कठेनं वाट पाहात असे.

ही लेखमाला संपली आणि कानिटकरांचा एक श्रेष्ठ लेखक म्हणून उदय झाला. सुरुवातीच्या काळात आपण जे काही करतो; विचार करतो, लेखन करतो, लेखनाचे निरनिराळे प्रकार हाताळतो; आणि आपल्या विचारावर आणि लेखनावर आपण खूष असतो. लिहिलेलं छापून येतं, काही जवळचे वाचक लेख, कथा आवडल्याचं सांगतात, या साऱ्यावरच आपण संतुष्ट असतो जॉर्ज वॉशिंग्टन आणि त्याच्या कुऱ्हाडीसारखं ते सारं असतं. परतु खऱ्या लेखकाच हे कुतूहल फार काळ टिकत नाही. आतून तो असमाधानी—असतुष्ट असतो. आपली प्रकृती वेगळी आहे, आपण काही वेगळंच शोधतो आहोत आणि आपण जे काही करतो आहोत यात ते वेगळेपण नाही, याची त्याला सतत खत लागलेली असते. यातून आपली स्वत ची वाट शोधण्याचा त्याचा एकीकडे सततचा प्रयत्न चाललेला असतो. या प्रयत्नातूनच त्याची वाट त्याला केव्हा तरी सापडते आणि मग असे झाले की तो सर्वांगानी फुलतो, बहरतो. नाझी भस्मासुरावरची कानिटकरांची लेखमाला प्रदीर्घ काळपर्यंत चालली आणि हे सर्व पुढे पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले. तो एक प्रचड ग्रंथ झाला. नंतर तोही गाजला आणि त्याच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आता तर त्याची डी-लक्स आवृत्ती निघाली आहे. नाझी...ने कानिटकराना आपल्या लेखन प्रकृतीची वाट दाखविली असेच म्हटले पाहिजे.

## कादंबरीकार वि. ग.

यापूर्वी त्यानी इतर बरेच ललित लेखन केले होते. त्यांचा एक कथासंग्रह आणि दोन कादंबऱ्या प्रसिद्ध झालेल्या होत्या. 'खोला धावे पाणी' आणि 'शहरचे दिवे' या त्यांच्या कादबऱ्या. पैकी 'शहरचे दिवे' बरीच गाजली होती. पण तरीही लेखकाच्या लेखनाला जे एक व्यक्तिमत्त्व यावे लागते, तसे व्यक्तिमत्त्व अजून त्याच्या ललित लेखनाला आले नव्हते. परतु पुढे त्यानी कुलकर्णी ग्रथागार या प्रकाशन सस्थेसाठी, त्याच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त 'होरपळ' ही कादबरी लिहिली. या कादबरीने वाचकांच्या मनात कादबरीकार म्हणून वि. गं. विषयी मोठ्या अपेक्षा निर्माण झाल्या. ही कादबरी वि. गं. च्या व्यक्तिमत्त्वाचे एक वेगळेच दर्शन घडविते आणि त्याचे 'नाझी भस्मासूर', जे फार गाजले, त्याच्या लेखनमूळावरही झगझगीत प्रकाश टाकते. त्यांच्या 'पूर्वज' या कथासंग्रहातील कथाबीजाचे मूळ देखील तसे तपासून पाहण्यासारखे आहे. हे सर्व लक्षात घेतल्यानतर लेखक म्हणून वि. गं. च्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश पडतो.

राजकारण, इतिहास आणि सास्कृतिक मूल्ये यांचा ललितपूर्ण भाषेत एक लवलवीत आलेख उभा करणे हा वि. गं. च्या लेखनाचा मर्मबंध आहे हे मग सहज जाणवते. कारण 'होरपळ' ह्या कादंबरीत— ही ऐतिहासिक कादंबरी नव्हे— वि. ग नी इतिहास, संस्कृती आणि राजकारण यांचा, खूप खोलवर जाऊन, लालित्यपूर्ण वेध घेतलेला आहे. या कादबरीमध्ये ललित लेखनाच्या सर्व प्रतिज्ञा त्यानी साभाळलेल्या आहेतच, परंतु त्याबरोबरच वर मी म्हटले त्या तीन प्रमेयामधील गुंतागुत आणि तिचे भान त्यानी सांभाळले

आहे. म्हणूनच 'होरपळ' ही वि. गं. ची कादंबरी मान्यवर समीक्षकांमध्येही चर्चिली गेली असे दिसते. 'नाझी भस्मासूर...' या दृष्टिकोनातून पाहिल्यास त्यांच्या यशाची गुरुकिल्ली कोठे आहे हे सहज लक्षात येते आणि येथेच वि. गं.च्या लेखनाचा परवलीचा शब्द आहे.

एकदा ही नाडी सापडल्यानंतर त्यांच्या लेखनाचा झपाटा वाढला. नंतर त्यांनी चीनच्या एकंदर राजकारणावर आणि माओच्या व्यक्तिमत्त्वावर 'माओ क्रांतीचे चित्र आणि चरित्र' म्हणून असाच एक प्रदीर्घ ग्रंथ लिहिला. अगदी अलीकडे त्यांचे जे पुस्तक प्रसिद्ध झाले ते चर्चिलवर आहे. तसेच दुसरे राजहंस प्रकाशनने प्रसिद्ध केलेले त्यांचे पुस्तक 'फाळणी टाळणारा महापुरुष : अब्राहम लिंकन' हे आहे. या सर्व पुस्तकांवरून त्यांच्या राजकारणाच्या बैठकीची कल्पना येते.

वि. ग. तसे प्रकृतीने गंभीर लेखक आहेत. त्यांचा स्वभाव चिंतनशील आहे; परंतु त्यांचा चेहरा मात्र गंभीर कधीच नसतो. वि. गं. नी विनोदी, उपहासात्मक लेखनही भरपूर केलेले आहे. त्यांना विनोदाची लहर आली की, 'माणूस' साप्ताहिकामधून ते 'ग्यानबा' नावाचे विनोदी आणि खोचक सदर लिहितात! ते वाचकात इतके लोकप्रिय झालेले होते की, माजगावकरांना वि. गं. चे हे विनोदी लेख पुस्तकरूपाने प्रकाशित करावेसे वाटले. 'नाझी भस्मासुरा'चा आणि 'अब्राहिम लिंकन..' चा लेखक विनोदी लेखन कसा करीत असेल? यावर विश्वास ठेवणे कठीण असले तरी ती वस्तुस्थिती आहे.

मात्र ते विनोदी लेखन देखील अत्यंत गंभीरपणे करतात. विनोदी लेखनाचा विचार अतिशय गंभीरपणे केल्याशिवाय खरे तर उत्तम विनोदी लेखन करताच येत नाही. कारण विनोदी लेखनाचा उगमच मुळी जीवनाच्या गंभीर गाभ्यातूनच होतो, हे वि. गं. ना पक्के माहीत आहे.

वि. ग. हे तसे बैठकीत वावरणारे गृहस्थ आहेत; पण अतिशय बोलकं मात्र त्यांचं व्यक्तिमत्त्व नाही. चार सहा अगदी जवळच्या लोकातच ते अधिक उमलतात, खुलतात; परंतु असे असले तरी एखादा सार्वजनिक उत्सव करणे अथवा घडवून आणणे त्यांना फार आवडते. गेल्या काही वर्षांपूर्वी नियमितपणे ते २६ जानेवारीला मित्रमंडळींना– म्हणजेच लेखक, पत्रकार, प्रकाशक, संपादक यांना एकत्र जमवीत असत आणि दिवसभर पुण्याबाहेर एखाद्या रमणीय ठिकाणी जाऊन तो दिवस सर्वांच्या सहवासात साजरा करीत असत. त्यासाठी निमित्त असे ते क्रिकेटची मॅच खेळणे. आता खरे म्हणजे आमच्या पिढीतील कितीशा लेखकांना क्रिकेट खेळता येते? सगळ तसे कॉमेंट्री बहाद्दूर नक्कीच आहेत, म्हणजे साहित्याच्या भाषेत सांगायचे म्हणजे टीकाकार! फक्त विद्याधर पुंडलिकांनी शाळेत असताना हातात क्रिकेटची बॅट धरली होती असे ऐकिवात आहे. त्यामुळे मग वि.ग. पुंडलिकांना दोन्ही टीमचा कॅप्टन करीत असत. यावरून आमची क्रिकेट मॅच कशी रंगत असेल, याची सहज कल्पना येईल! या मॅचमध्ये वि. गं.नी नानासाहेब गोरे, रा. ज. देशमुख, अनंतराव कुलकर्णी आणि महादेवशास्त्री जोशी यांनाही खेळावयास लावले होते. ही मॅच पं. महादेवशास्त्री जोशी यांच्याकडेच धायरी येथे झाली होती. धायरीचे वातावरण, महादेवशास्त्रींचा मळा आणि सौ सुधाताई जोशी यांचा पाहुणचार. तीळ लावलेल्या बाजरीच्या भाकरी, गुळाच्या पोळ्या, वांग्याची भाजी आणि घरचं मुबलक लोणी असा जेवणाचा थाट मग गप्पा, इतर कार्यक्रम आणि ही क्रिकेटची मॅच. ती मॅच खेळताना असं ठरलं होतं की, दहा रन्स केल्या की, शतक पूर्ण झालं असं समजायचं. त्या मॅचमध्ये वि. गं नी मोजून खणखणीत दहा रन्स काढल्या. ओघानेच आलं की, पुंडलिक बोलिंग करीत होते. मग पुन्हा एकदा दुपारचे बटाटा पोहे खाऊन सर्वांनी वि. गं. चं शतक साजरं केलं.

आता तो २६ जानेवारी क्लबही बंद झालेला आहे. आम्हाला एकमेकांना पहिल्यासारखं भेटणंही जमत नाही; पण रंगा मराठे भेटला व त्याने सांगितले, येत्या २६ जानेवारीला कानिटकरांना साठ वर्षे पूर्ण होत आहेत. काळाची दोरी सहज हलली आणि मागच्या आठवणी दाटून आल्या. धायरीच्या त्या मॅचची आठवण झाली तिथं वि. गं. नी खणखणीत शतक पूर्ण केलं होतं. या जानेवारीला मॅच नाही तर नाही, वि. गं. नी जीवनाचं आपलं शतक पूर्ण करावं अशा आमच्या त्यांना शुभेच्छा! □


# अब्राहम लिंकन
# फाळणी टाळणारा महापुरुष

• वि. ग. कानिटकर

भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित झालेली पहिली डिलक्स आवृत्ती. मोठा क्राऊन आकार. पृष्ठे: ४००, किं. १५० रु.

**राजहंस ऑगस्ट ८४ योजनेत सहभागी व्हा.**

सविस्तर योजनापत्रक मागवा.

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

# मास्को - पिघळता पोलादी पडदा?

मनोहर देखणे

सर्वहारा क्रांतीचा अग्रदूत, दीन–दलितांचा तारकनाथ व साम्यवादाची काबा असणारी मास्को नगरी हे काही केवळ शहराचं वा राजधानीचं नाव नाही; हे एक आख्यान आहे आस्तिक वा नास्तिक, जडवादी वा अध्यात्मवादी, समाजवादी किंवा पूंजीवादी, कुणीही असो, तो इथल्या संमोहन–शक्तीचा एकदा तरी अनुभव घेऊ इच्छितोच. १९८४ च्या सप्टेंबरमध्ये, कोरियाच्या प्रवासानिमित्त बाहेर पडल्यावर, मलादेखील मास्को पहाण्याची–समजण्याची संधी मिळाली.

अंदाजे ८० लाख वस्तीच्या या सुंदर, सुव्यवस्थित नि सुनियोजित महानगरीत किती कमालीची शांतता आहे! .. वातावरणात कुठे धूर नाही, ना धूळ, ना हॉर्नचा आवाज, ना ध्वनिक्षेपकाचा कर्णकर्कश गदारोळ, ना हातगाडीवाल्यांच्या आरोळ्या, ना कसलं प्रदूषण. स्वच्छ–सुरेख रस्ते तिथे मला एकही स्कूटर वा फटफटी आढळली नाही. मोटारी, टॅक्सीज, बसेस आहेत नि विश्वविख्यात मेट्रो रेल्वे. मात्र काय बिशाद कुठलही वाहन आपल्या शांततेत बाधा उत्पन्न करील! लोकात शिस्त आहे व म्हणूनच हे शक्य झालंय. सडकेवर थुंकणे, कागद अगर सिगरेटची थोटकं टाकणे, चुकीच्या मार्गाने सडक ओलांडणे, या गोष्टी मास्कोवासियाना माहीतच नाहीत. मुलींची टिंगल–टवाळी, खिसेकापूपणा, गळ्यातल्या चेन्स पळवणे, भांडण–तंटा याचा तिथे मागमूसही नाही. दिवसा अथवा रात्री कोणत्याही वेळी एकटीदुकटी स्त्री निर्भय मनाने तिथे वावरू शकते. युवक–युवतींच्या जोड्या स्वच्छंदपणे केव्हाही व कुठेही हिंडू फिरू शकतात. तिथल्या शांत, धीर–गंभीर आणि सोद्देश जीवनप्रवाहात कसलाच गतिरोध उत्पन्न होत नाही कोणत्याही देशातला कोणीही नागरीक या स्थितीचं कौतुक करील. पण त्याचबरोबर त्याच्या मनी विचार येईल की, हे कसं काय शक्य झालय?

जवळ जवळ इथली सारी व्यवस्था सरकारी आहे. बहुमजली विशाल डिपार्टमेंटल स्टोअर्स–तिथे जीवनावश्यक प्रत्येक वस्तू उपलब्ध आहे. कामाच्या दिवशी त्यांच्या खरेदीसाठी माणसांची झुंबड पडते. परंतु कुठे गलका नाही, धक्काबुक्की नाही. लोक रांगेत आपला नंबर येण्याची शांतपणे प्रतीक्षा करतात. किंमतीची घासाघीस नाही. कारण अगदी छोट्या वस्तूपासून ते मोठ्या वस्तूंपर्यंत सर्वांचे दर ठरवलेले असतात साडीचा पोत निरखण्याची वा कुठल्याच वस्तूच्या चिकित्सेची गरज नाही. कारण त्याच्या गुणवत्तेवर पूर्ण नियंत्रण असतं.

तिथले कॅफेदेखील अगदी एकदम स्वच्छ. वेळेवर उघडणारे नि वेळेवर बंद होणारे. कॅफेत, दुकानात, बसमध्ये वा मेट्रोत धूम्रपानास बंदी आहेच–पण तसा कोणी चोरून प्रयत्नही करत नाही. मेट्रोत विना तिकीट कोणीच प्रवास नाही करू शकत स्टेशनबाहेर ठेवलेल्या एका विशेष ठिकाणी पाच कोपेकचे नाणे टाकल्यावाचून स्टेशनमध्ये प्रवेशच मिळत नाही. कुणी चुकून तसा जाऊ लागला तर एक स्वयंचलित लोखंडी हात आडवा होऊन मार्ग अडवतो मात्र बसमध्ये वेगळी व्यवस्था असते. तिथं कंडक्टर नसतोच आत एका जागी २–३ डबे असतात व त्याशेजारी तिकिटाची गुंडाळी असते उतारू त्या डब्यात पाच कोपेक टाकून एक तिकीट काढून घेतो. पैसे न फाडताही तिकीट फाडण शक्य असतं. परतु तसं करताना मला कोणी आढळलं नाही. उलट तिकिटाची गुंडाळी संपली तरीही लोक त्या डब्यात पैसे टाकताना मी पाहिले.

इथल्या लोकांचा दिनक्रम काही कमी धाईगर्दीचा नाही. नियमितपणे ते घोर मेहनत करतात. आठला तर बरोबर आठला ऑफिसचं काम चालू होतं. कामाच्या वेळात इकडे तिकडे रेंगाळणे नाही, की गप्पागोष्टी नाहीत. त्यामुळे त्यांना सुटी ही महत्त्वाची वाटते सुटीच्या वेळी हे लोक साऱ्या जगाला विसरून गातात, नाचतात, मद्यपान वगैरे करतात व मस्त मजेत असतात. अकारण दुसऱ्याच्या कामात कोणी लक्ष देणार नाही. आरोग्याने मुसमुसते हसरे चेहरे. कुणी उपाशी वा भिकारी नाही. दैनंदिन आपल्या गरजा भागवण्यासाठी हरेक माणूस काही ना काही काम करत असतो.

...तसं तर या जगात पूर्ण काहीच नाही, असूच शकत नाही–मास्कोही त्याला अपवाद नाही. परंतु जी सामाजिक घडी बसवली आहे, ती टिकली तर पाहिजे! इथेच मला काही असे अनुभव आले की ज्याचा उपरोक्त स्थितीशी काही मेळ बसत नाही. त्यातले नमुन्यादाखल काही पुढे देतो.

मास्कोतल्या एका आलिशान 'फाईव्ह स्टार' हॉटेलात मी उतरलो होतो. त्याच्या नवव्या मजल्यावरील खोलीतून दिसणारी वाहती मास्को नदी आणि संथ गतीनं चालणारं जन–जीवन बघताना त्याराच आनंद वाटत होता. मला वाटत होतं, की तासन् तास खिडकीशी बसून रहावं अन् स्थैर्य व परिवर्तन ह्यातलं सामंजस्य आत्मसात करावं. पण तसं घडू शकलं नाही. वारंवार दरवाजावर टकटक होई...अर्धनग्न, मदिरेने धुंद झालेल्या सुंदरी. त्यांच्यापासनं सुटका करून घेण फार कठीण पडत होतं. एक दोनदा तर धक्का मारून बाहेर काढाव लागलं लोकांनी ते पाहिलं पण हसून ते पुढे निघून गेले. एखादी मदालसा केवळ देहसौख्यासाठी हे करत असेल–परतु बहुतांश पोरी डॉलरच्या क्षुधेसाठी या पतित व्यवसायाचा अवलंब करतात. तुम्ही फक्त १० डॉलर्स द्या, देहसुखाबरोबरच ३० रूबल्स पण मिळतील तुम्हाला. हॉटेलातल्या 'डॉलर शॉप' मध्ये, कॅफेत, आपलं सावज धुंडणाऱ्या या तरुणी ...दरवेळी, प्रत्येक जागी तेच ते दृश्य. एक किळस येते. मन खिन्न होतं. हे कशासाठी? विदेशी माल काय फक्त डॉलरनेच मिळतो? ...बहुसंख्य पोरींना विदेशी सिगरेट, दारू, सौंदर्यप्रसाधनं आणि कपड्यांची चटक लागली आहे अन् शरीराचा हा व्यापार तरी कसा म्हणता?– तर त्या तरुणीचा मित्र वा खुद्द पतीच दलाली करतोय.

दुसरा अनुभव अर्थव्यवस्थेबाबतचा आहे. सरकारी दराने १ डॉलरला .८२ रूबल मिळ-

तात. तथापी चोहिकडे उघड उघड टॅक्सी-वाले, या अशा पोरी किंवा दलाल १ डॉलरला ३ रूबल विकताना दिसतात. थोडी घासाघीस केली तर आणखी जादाही. इथे दोन प्रकारची दुकानं आहेत–रूबल आणि डॉलर याची, रूबलवाल्या दुकानात स्वदेशी व परदेशी दोन्ही तऱ्हेच्या वस्तू मिळतात. प्रत्येक मोठ्या हॉटेलात डॉलरच दुकान आहे. लाल चौकापासच्या 'गुम' या डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये एक रूबी दुर्बिण १२० रूबल्सना मिळत होती. ती तसलीच दुर्बिण 'फाईव्ह स्टार' हॉटेलमधल्या 'डॉलर शॉप'मध्ये ६० डॉलरला. आश्चर्यच वाटलं मला जिथे सर्वच गोष्टींचं सरकारीकरण झालय, तर एक्सचेंजच्या दरान्वय ती १५० डॉलरना मिळायला हवी. कौंटरवर बसलेल्या मुली-पाशी मी याबाबत चौकशी केली तर तिच उत्तर होत', 'मला ते माहीत नाही व माहीत असायलाही नकोय !'

डॉलर दुकानचाच दुसरा एक अनुभव पहा. मी एक वस्तू घेतली– किंमत होती ३ डॉलर्स. मी दहा डॉलरची नोट दिली, तर तिथे सात डॉलर्स परत करण्याऐवजी मला रूबल्स देण्यात आले. मी जेव्हा डॉलरच परत करण्याबद्दल आग्रह धरला तेव्हा साग-ण्यात आल की, ८० डॉलरचा माल खरेदी केला तरच फक्त १०० डॉलर्सपैकी उरलेले डॉलर्स मिळतात. या पेक्षा कमी खरेदीवर रूबलच दिले जातात. अन् नतर तरी डॉलर कुठे परत करतात ? बहुतेक वेळा 'येन' किंवा 'मार्क'च परत देतात रूबल बाहेर नेता येत नाही देशाच्या !

आता शेवटचा अनुभव लाचखोरीच बतचा आहे. बाहेरची कुठलीही व्यक्ती पासाशिवाय हॉटेलमध्ये प्रवेश करू शकत नाही. एका मुलीने तिच्याकडचे अनेक कोरे पास मला दाखवले. ज्यावर आपल नाव टाकून कुठलाही माणूस आत सहज प्रवेश मिळवू शकत होता. नियमानुसार तर अगदी कडक चौकशी केल्यावरच असे पास द्यायला हवेत. तरुण पोरींची अगर डॉलरची दलाली करणाऱ्या कित्येकाजवळ असे कोरे पास मला आढळले. अधिक खोलात जाता समजलं की, सबंधित अधिकाऱ्याची मूठ दाबली की सारं काही होऊ शकतं हॉटेल बाहेर काम करणारे काही पोलीस काही जणाना इतरत्र दूर नेताना, त्यांचेशी बोलताना व नंतर हस्तां-दोलन करून हसत हसत येताना मी पाहिलं.

काय, तिथल शासन या साऱ्या बाबतीत अनभिज्ञ आहे ? हे सगळं का व कशासाठी चालू दिल जात ? अशा प्रकारच्या घटनांना आळा घालता येईल काय ? या प्रश्नाशी तसा माझा काही सबध नाही, अगर त्या प्रश्नाच्या समाधानकारक उत्तराची अपेक्षाही नाही.

जेव्हा माझ्या स्वतःच्या देशात अन् बहुतेक इतर देशांतूनही यापेक्षा अधिक प्रमाणात हे चालत, तेव्हा मास्कोतल्या गोष्टींची कशाला चिंता करू मी ? माझ्या मनानं विचलित होणं हे अस्वाभाविकच नाही का ? या प्रश्नाचं माझ्याकडे काही उत्तर नाही. मात्र एक सांगावसं वाटतं– जेव्हा एखादी प्रतिमा खंडित होतेय, असं दिसतं, तेव्हा मनाला विषाद वाटतो–मग भले ती प्रतिमा आपला आदर्श नसेना का. अन् मास्कोही एक आगळी वेगळी प्रतिमा आहे, याबद्दल माझ्या मनात जराही सदेह नाही. □

(डॉ. प्रकाश श्रीवास्तव यांच्या लेखाधारे)

---

Times of India
16 Jan. 1986

## Corruption clogs Soviet economy

MOSCOW, January 15 (UPI) Widespread corruption. which the Soviet leader, Mr. Mikhail Gorbachov, has vowed to eliminate, has hindered the economic growth of the Soviet Union, according to a top soviet official.

The criticism appeared in the current issue of the magazine, 'Communist', in an article by the general procurator, Mr. Alexander Rekunkov.

'The problems of hard drinking sponging and unearned profits became more acute. Different sorts of abuses spread and the principle of legality was violated.' Mr. Rekunkov writes.

Both the mayor of Moscow and the party chief of the Moscow region were recently replaced after rumours of corruption.

## रशियातल्या अर्थव्यवस्थेला भ्रष्टाचारामुळे खीळ

मास्को, जाने. १५ (यु. पी. आय) सर्वत्र फैलावलेला भ्रष्टाचार नष्ट करू अशी प्रतिज्ञा सोव्हिएट अध्यक्ष श्री. मिखाईल गार्बोचेव यांनी केली असली, तरी याच भ्रष्टाचारा-मुळे रशियातल्या आर्थिक विकासाला खीळ बसली आहे, असे एका रशियन उच्च अधि-काऱ्याने सांगितले.

या भ्रष्टाचारावर श्री. अलेक्झांडर रेकॉनाव्ह यांनी एका लेखाद्वारे 'कम्युनिस्ट' मासिकाच्या ताज्या अंकात टीका केली आहे.

'अतिमद्यपान, शोषण आणि काळा पैसा यामुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नानी गंभीर रूप घेतल; यामुळे अनेक प्रकारचे दोष निर्माण झाले आणि अनेक वेळा कायदा धाब्यावर बसवला गेला' असे रेकॉनाव्ह यानी लिहिले आहे.

भ्रष्टाचाराच्या या बातम्यांपाठोपाठ अलिकडेच मॉस्कोचे महापौर आणि मॉस्को विभागाचे पार्टी प्रमुख याना बदलून त्याच्या जागी नव्या नेमणुका केल्या गेल्या □

# तलासरीच्या परिसरात



● विनया खडपेकर ●

ठाणे जिल्ह्यात आदिवासींची जी अनेक गावे आहेत त्यातलेच एक गाव तलासरी. 'मौज' ने १९७० मधे प्रकाशित केलेले श्रीमती गोदावरी परुळेकरांचे 'जेव्हा माणूस जागा होतो' हे पुस्तक माझ्या वाचनात आले. तेव्हा 'तलासरी'चे अस्तित्व मला कळले. थोडे आश्चर्य वाटले. कारण तलासरी म्हणजे उंबरगाव पट्टीतली बत्तीस गावे घेऊन निर्माण झालेला तालुका. बसने उंबरगावहून तलासरी साधारण पाऊण तासाच्या अंतरावर आहे. उंबरगाव मला खूप लहानपणापासून माहती होते. शाळेत असताना १९५९–६० मध्ये कधीतरी मी उंबरगावला गेलेली होते. उंबरगावच्या भोवताली खत्तलवाड, शिरगाव संजाण ही गावे ऐकली होती. परंतु तलासरी ऐकले नव्हते. आदिवासींचे गाव ब्राह्मणी संस्कृतीच्या दृष्टीने नगण्य असावे. लहानपणी उंबरगावकरांच्या बोलण्यात संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे उल्लेख मी ऐकले होते. उंबरगाव महाराष्ट्रात रहाणार की गुजराथमधे जाणार याची चर्चा कानावरून गेली होती. परंतु गोदावरीबाई परुळेकरांच्या आंदोलनाविषयी मात्र काही ऐकल्याचे मला स्मरत नव्हते. उंबरगावकरांच्या दृष्टीने ते आंदोलन नगण्य होते की, नामोल्लेख करू नये इतके तिरस्करणीय होते कोणास ठाऊक !

श्रीमती गोदावरीबाईंचे पुस्तक वाचले आणि तलासरीबद्दलचे माझे कुतुहल चाळवले गेले. 'तलासरी' मिशनऱ्यांनी व्याप्त केलेली भूमी. तलासरी अन्याय–अत्याचाराची आणि बंडखोरीचीही भूमी. 'तलासरी'–कम्युनिस्टांचे कार्यक्षेत्र ! पुस्तकातून एवढे कळले. नंतर कधीतरी विश्व हिंदू परिषदेचे केंद्र तलासरीत सुरू असल्याचे माझ्या कानावर आले. सर्वसाधारणपणे कोणत्याही मध्यमवर्गीय माणसाच्या मनात असलेले स्वधर्म–प्रेम माझ्या मनात होते. त्यामुळे विश्व हिंदू परिषदेचे केंद्र तेथे असल्याचे ऐकल्यावर मला बरे वाटले. विश्व हिंदु परिषद धर्माचे काय काम करणार? घातक अंधश्रद्धा वगैरे नाहीशा करून समाजसुधारणा करणार की काही राजकारण खेळणार? असे प्रश्नही मनात उमटून गेले. पुढे तलासरीत विश्व हिंदू परिषदेचे कार्य वाढते आहे असे त्यांच्या कार्यकर्त्यांकडून मी ऐकले. मला त्यात काही विशेष वाटले नाही. टिकून राहिलेल्या स्वतःच्या संस्थेबद्दल कोणतेही कार्यकर्ते असेच बोलताना आढळतात; मग ते सर्वोदयी, समाजवादी, रा. स्व. संघवाले किंवा लाल बावटावाले कोणीही असोत !

या वर्षी मे महिन्यात आम्ही काही मैत्रिणी आंभाणला हिंदु सेवा संघाच्या केंद्रावर सहलीला गेलो होतो. तेथून तलासरी जवळच. विश्व हिंदु परिषदेच्या केंद्रावर मैत्रिणीची ओळख होती. तेथे जाणे सहज शक्य होते. वेळ फारसा नव्हता. म्हणून एका रात्रीपुरत्याच आम्ही तलासरीत विश्व हिंदु परिषदेच्या केंद्रावर गेलो. आम्ही पोहोचलो तेव्हा वीज बंद पडली होती. सगळीकडे गुडुप अंधार. सकाळी लगेच आम्हाला निघायचे होते. आता काहीच पहाणे शक्य होणार नाही असे वाटले. परंतु अण्णा जोशींनी विजेरीच्या प्रकाशात त्या परिसरात आम्हाला हिंडविले. सुमारे दोनशे मुले राहू शकणारी वसतिगृहाची इमारत पाहिली. खोल्या पाहिल्या. दिवस सुटीचे होते. मुले नव्हतीच. अण्णा जोशी दिवसभराच्या कामाने दमले होते. पण संस्थेबद्दलच्या तळमळीने आमच्याबरोबर फिरत होते. अण्णांनी शेती दाखविली गोशाळा दाखविली. अंधारात फिरताना मनात आले, कोणतीही संस्था अशी घाईघाईत एका फेरीत पाहून होत नसते. संस्थेचा विस्तार डोळ्यांना दिसत होता. पण तिचे बीजारोपण कसे झाले, मुळे किती खोल गेली आहेत, हे कसे कळणार ? केंद्राचे संस्थापक श्री. काणे यांच्याशी जुजबी बोलणे झाले आणि आम्ही झोपण्यासाठी निघून गेलो.

रात्री झोपताना गोदावरी परुळेकरांचे पुस्तक आठवले. ते भुके आदिवासी. अपुऱ्या कपड्यातले आदिवासी. घासभर अन्नासाठी जन्मभर वेठबिगार करणारे आदिवासी. त्यांच्या जमिनी जमीनदारांनी बळकावल्या. त्यांच्या बायका जमीनदारांनी वापरल्या. जमीनदारांनी क्वचित आदिवासींना जिवंत गाडले. जाळले. हे सारे याच भागात काही दशकांपूर्वी घडत होते. जमीनदार एवढे उन्मत्त का होते ? आदिवासी एवढे दुबळे का होते ? मानववंशशास्त्र, अर्थशास्त्र यांच्या प्रकाशात या प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतील. ख्रिस्ती मिशनरी येथे केव्हा आणि का आले ? कम्युनिस्टांची येथे येण्यामागची प्रेरणा कोणती ? हिंदुधर्मप्रेमी कम्युनिस्टांनी पाय रोवण्यापूर्वीच का आले नाहीत ? नंतर का आले ? याही प्रश्नांची उत्तरे शोधायची तर धर्मकारण, राजनीती यांची एकमेकातली गुंतागुंत वाढत जाईल.

तलासरी–गोदावरीबाई परुळेकर यांच्या कार्यामुळे एकदम प्रकाशात आलेला ठाणे जिल्ह्यातील एक लहानसा भाग. काही काळ तर हा 'लालमहाल' म्हणूनच ओळखला जायचा. आता या भागात विश्व हिंदु परिषद व इतर सघ प्रेरित संस्थांनीही वनवासी विकासाचे काही कार्य उभे केलेले आहे.

या दोन्ही कार्यपद्धतींची आणि कार्यांची ओळख करून देणाऱ्या या मुलाखती. दोन भागात. या अंकी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे श्री. कोम व श्री. ओझरे यांच्या. पुढील अंकी विश्व हिंदु परिषदेचे श्री. माधवराव काणे व श्री. अप्पा जोशी व सौ. शोभा जोशी यांच्या.

या सर्व मुलाखती–विनया खडपेकर.

खडपेकर यांनीच ११ मे ८५ 'माणूस' अंकात ठाणे जिल्ह्यातील आंभाण येथील हिंदु सेवा संघाची माहिती दिली होती व त्याचे प्रवर्तक श्री. अण्णा टोकेकर यांची मुलाखत घेतली होती.

---

काहीही असो. जनावराचे जिणे जगणाऱ्या माणसामधले 'माणूस'पण जागे झाले. त्याची मुले शिकू लागली. मनात निरनिराळे हेतू ठेवून त्याच्या विकासासाठी निरनिराळे गट, संस्था कार्य करू लागल्या. त्यातलेच एक केंद्र म्हणजे विश्व हिंदू परिषदेचे वसतिगृह. विश्व हिंदु परिषदेच्या केंद्राचा अधिक परिचय करून घ्यायचा असे मी तेव्हा मनात ठरवले.

### अंगणवाडीतील मुले

श्री माधवराव काणे याची मुलाखत, त्यांच्या वसतिगृहातील मुलाशी मनमोकळचा गप्पा आणि गावात कोठे थोडेफार फिरणे, जमल्यास गावातल्या महत्त्वाच्या व्यक्तीना भेटणे एवढे मर्यादित उद्दिष्ट डोळचासमोर ठेऊन डिसेंबरच्या दुसऱ्या आठवडचात मी तलासरीला विश्व हिंदु परिषदेच्या वसतिगृहावर गेले. तेथे गेल्यावर जिल्हा परिषदेच्या गटविकास अधिकारी श्रीमती जर्माखिडीकर यांनी जिल्हा परिषदेच्या अगणवाडचा, शाळा, आश्रमशाळा दाखविण्याची तयारी दर्शविली. सी. पी एम्. तर्फे निवडून आलेले सभापति श्री. ओझरे आणि आमदार श्री. कोम यानीही कामातून वेळ काढून 'माणूस'साठी मुलाखती देण्याचे कबूल केले. एवढा कार्यक्रम ठरल्यावर चार दिवस मला कमीच पडले.

तलासरीला पोहोचले. दुसऱ्याच दिवशी श्रीमती प्रभाताई जर्माखिडीकर आणि मी सकाळी नऊच्या सुमाराला जीपने निघालो. जाता जाता प्रभाताई माहिती देत होत्या. अंगणवाडचा फक्त सकाळीच चालू असतात. ६ वर्षापर्यंतची मुले अगणवाडीमध्ये येतात. अगणवाडी आणि बालवाडी यात तसा फारसा फरक नाही. बालवाडीला इमारतीची आवश्यकता असते तर अगणवाडचा मोकळचा अंगणातच भरविलेल्या असतात. इमारत असेल तर ठीक नसेल तरीही चालू शकते. मी पाहिलेल्या अंगणवाडचा म्हणजे छोटीशी घरे आणि त्यापुढे मोठी अगणे असे रूप होते. गर्भवती स्त्रियानाही येथे चांगला आहार दिला जातो. बाळतपणानंतर दोन–तीन महिनेही स्त्रियाना जीवनसत्वयुक्त आहार देण्याची व्यवस्था अंगणवाडीमध्ये असते. एकात्मिक बालविकास सेवा योजनेखाली ( Intigrated Child Development Scheme ) सर्वसामान्य चांगल्या मुलाला (normal child) पचवीस ते पसतीस पैशाचे खाद्य (कडधान्य आणि भोवतालची सहज मिळणारी पिके) आणि कुपोषित मूल, गर्भवती, बाळतीण यांना पन्नास पैशांचा आहार दिला जातो. अंगणवाडीमध्ये मॅट्रिक झालेली प्रशिक्षित अगणसेविका असते. तिला मदतनीस (हेल्पर) बहुतेक थोडीफार शाळा शिकलेली आदिवासी स्त्री असते.

अगणवाडी जवळ येत होती. श्रीमती जर्माखिडीकरबाई ड्रायव्हरला म्हणत होत्या, 'थाब बाबा, जीप इथेच थाबव, आम्ही उतरून जातो.' पण ड्रायव्हरने जीप अगणवाडीच्या बरीच जवळ नेली. आम्ही उतरत होतो. एवढचात अगणवाडीतल्या मुलाची एकदम रडारड सुरू झाली. मुल चोहोबाजूला सैरावैरा पळू लागली. बाई थोड चिडून ड्रायव्हरला म्हणाल्या, 'बघ, झालं आता? तुला सागत होते जीप तिकडे थाबव, तर ऐकल नाहीस.' 'आता तशी बाजूलाच जीप उभी केली की!' ड्रायव्हर आपले बोलायचे म्हणून बोलला. पोराचा गलका आणि घूम पळणे सुरूच होते. मला काही कळेना. श्रीमती जर्माखिडीकर मला म्हणाल्या—'जीप आणि आपल्यासारख्या कपडचातली माणसं दिसली की मुलाना वाटतं इजेक्शन देणारी माणस आली. धूम ठोकतात.' भोवताली घरे दिसत नव्हती मोठी झाडे दिसत नव्हती. पण क्षणापूर्वी किंचाळणारी पोरे अगदी लुप्त झाली होती. हरिणाच्या गतीने त्याना पळता येत असावे मुबईतला बालवर्गाचा पहिला दिवस मी पाहिला होता तेथेही पहिल्या दिवशी सगळी मुले आपापल्या सुरात सामुदायिकरीत्या रडत असतात पण ती अशी सैरावैरा पळत नाहीत. बहुतेक जागच्या–जागी बसूनच रडत असतात. दाराबाहेर जायचे नाही, बाहेर मोटारी असतात, फसवणारी माणसे असतात हे त्याना नकळत माहिती असते. वाईही दार उघड टाकीत नाहीत. इथली ही पळालेली मुले कुठे रानात चुकली तर, असा एक शहरी विचार माझ्या मनात आला एवढचात जर्माखिडीकर म्हणाल्या, सेविका आणि हेल्पर दोघीजणी घेऊन येतील पोराना. मी गृहित धरले, आता हे अर्धा एक तासाचे काम. दोघीजणी बाहेर गेल्या आणि भूमिगत झालेली ती पचवीस-तीस पोरे पुढे घालून दोन मिनिटाच्या आत परतसुद्धा आल्या त्या आत आल्या. मुलासाठी केलेले तक्ते, मुलाची खेळणी मला

दाखवू लागल्या. घाईघाईने त्याची कामाची रजिस्टरे त्यानी माझ्यापुढे ठेवली. मुलाना जो आहार देतात ती वाफवलेली कडधान्येसुद्धा माझ्यासमोर आणून ठेवली. मला ते काही नको असल्याचे मी सागितले. त्या मुलांचे सस्कार, वागणे मला जे पहायचे होते ते मी पाहिले होते की! ड्रायव्हरने जीप जवळ आणून उभी केली हे बरेच झाले.

## आदिवासींचे 'शांतिनिकेतन'

सगळी मुले आता शातपणे माझ्याकडे टुकटुकू पहात होती. मी इजेक्शन टोचणारी नाही याबद्दल आता त्यांची खात्री झालेली दिसत होती. ती खात्री पटविणे त्याच्या शिक्षिकेला कसे जमले होते कोणास ठाऊक. मी तिला विचारले तर ती आपली हसली. मुलांचे वजन कसे करतात ते दाखविण्यासाठी टांगत्या काटद्यावर तिने एका मुलाला ठेवले. ते जोरदार रडू लागले त्याला उतरवून ती त्या मुलाना गाणे सांगू लागली. श्रीमती जर्माखिडीकर म्हणाल्या, 'अहो या मुलांना लहानपणापासून रानात भटकायची सवय असते. गाईची वासरं चरत फिरताना अगदी तसच! आम्ही त्यांना अगणामधे-घरामध्ये म्हणजे एका जागी बसायला शिकवतो नीट शिजवलेलं खायला शिकवतो. म्हणजे शाळेत जाण्याच्या दृष्टीने ती तयार होतात.' सकाळी अशा दोनतीन अंगणवाड्या आम्ही पाहिल्या. जीप बरीच लांब उभी करण्याची काळजी घेतल्यावर गोधळ झाला नाही. मुलांशी, तेथेच बसलेल्या पालकाशी बोलण्याचा प्रयत्न केला पण आदिवासी-बद्दलचा नेहमीचाच अनुभव पुन्हा आला. It is a culture of silence. ही माणसं बोलत नाहीत.

अंगणवाड्या पाहून दुपारी आम्ही आश्रम शाळा पहाण्यास गेलो. शाळेलाच जोडून जेथे वसतिगृहाची सोय असते त्या शाळाना आश्रमशाळा म्हणतात आश्रम शाळेतल्या जेवणाचे, रहाण्याचे आदिवासीना पैसे द्यावे लागत नाहीत. गटविकास अधिकारी पाहुण्याना अचानक घेऊन आल्यावर शिक्षकाची धांदल उडत होती. सावण्याची आश्रमशाळा बघायला आम्ही गेलो. ही शाळा विद्यार्थ्यांची संख्या आणि एकंदर सुविधा या दृष्टीने सर्वात चांगल्या दर्जाची समजली जाते. मुलांची कागदोपत्री संख्या तीनशे पंचवीस. त्यातल्या बेचाळीस मुली. साधारणपणे दोनशे ते अडिचशे विद्यार्थी नेहमी उपस्थित असतात ज्या वर्गात मुले दिवसा शिक्त होती त्याच वर्गात ती रात्री जेवत होती, झोपत होती. वर्गात दोऱ्या बाधलेल्या होत्या. त्यावर मुलाचे कपडे होते. भोवताली बॅगा होत्या. शाळेची इमारत पक्की विटानी बाधलेली होती. वर्गातल्या मुलाना 'एकसाथ नमस्ते' करण्याची रीत होती. आपली नावे, इयत्ता मुले व्यवस्थित सागत होती; पण दहावी पास झाल्यावर पुढे काय करणार या प्रश्नाला मात्र कोणी उत्तर दिले नाही येथे शिक्षक टिकत नाहीत. शाळा फार दूर पडते, एक मुलगा साप चावून गेला. मदत मिळाली नाही. वगैरे गोष्टी मुख्याध्यापकांनी सांगितल्या. शाळेच्या जवळून नदी वहाते. त्या नदीचे नाव तीन चार शिक्षकाना विचारले ते कोणालाच सागता आले नाही. शेवटी शिपाई किंवा तत्सम कोणीतरी, ती विरोळी नदी असल्याचे सांगितले. इतर आश्रमशाळा म्हणजे कुडाच्या झोपड्याच होत्या. गिरगावच्या आश्रमशाळेच्या झोपडीला दारही नव्हते. सगळे वर्ग निरनिराळ्या झाडांखाली सुरू होते. मी मनाशी म्हटले हे तर आदिवासीचे शातिनिकेतन. शिक्षकांना विचारले, 'पावसाळ्यात काय करता?' त्यांनी सहजपणे सांगितले, 'तेव्हा घेतो सगळे वर्ग, एकदम आतच' निरनिराळ्या इयत्तेत शिकणारी सुमारे शंभर – दीडशे मुले त्या साधारण अडीचशे, तीनशे चौरस फुटाच्या झोपडीच्या जागेत कशी शिकत असतील? काय शिकत असतील? या अशा शिक्षणातून पुढे काय करण्यास ती समर्थ होतील? आश्रम शाळांमधली शिक्षक मडळी एस् एस् सी. उत्तीर्ण होऊन नतर प्रशिक्षण घेतलेली आदिवासी मडळी होती. बहुतेकांचे कपडे, एकंदर रहाणी आधुनिक, त्यावर नागर सस्कृतीचा ठसा अगदी स्पष्ट दिसत होता; पण बहुतेकजणांना मुलाच्या अभ्यासापेक्षा आश्रमशाळेच्या पाकशाळेत अधिक रस होता. स्वयंपाकावर त्यांची बारीक नजर दिसत होती. खाण्याची व्यवस्था कशी चागली केली आहे ते आवर्जून सागत होते. एखादा शिक्षक स्वयंपाकाच्या चुलाणाभोवती घुटमळत असायचाच. झाडाखाली असलेल्या वर्गातल्या मुलाना मी विचारले, तुम्ही पुढे कोण होणार? आधी कोणी काही बोलले नाही. मग दबकत एकाने सागितले, 'डॉक्टर' दुसरा म्हणाला, 'शिक्षक' एक चेहरा सागायला अगदी उत्सुक होता. मी त्याला विचारले. अकरा–बारा वर्षांचा मुलगा उत्साहाने उभा राहिला आणि त्यानं सणसणीत आवाजात स्पष्ट शब्दात, शुद्ध उच्चारात उत्तर दिल, 'मला स्वयपाकी व्हावसं वाटतं.' आम्हाला दोघीनाही हसू कोसळले. मुलगा गोंधळला. त्याचा गोंधळ होणे स्वाभाविक होते. आश्रम शाळेतली सर्वात महत्त्वाची व्यक्ती त्याने टिपली आणि तो आदर्श असल्याचे सागितले. तर त्यात हसण्यासारखे काय होते?

## दहा वर्षातली प्रगती

जिल्हा परिषदाच्या शाळेचे जाळे तलासरीत सगळीकडे पसरले आहे. काही शाळा एक शिक्षकी, काही द्विशिक्षकी आहेत आणि काही बहुशिक्षकी आहेत पोटाची दोन वेळची सोय होते म्हणून आदिवासी आश्रमशाळेत येतात हे गृहित धरले तरी यातून आदिवासी मुले साक्षर होत आहेत, 'शिक्षण' या संकल्पनेशी त्यांचा सपर्क येतो आहे एवढे म्हणता येईल. शाळेत शिकायला गेलेला मुलगा घरी कमवून आणीत नाही. पण ही बाजू शिक्षणाखातर आदिवासी आता खपवून घेऊ लागले आहेत असे या शाळांतून वाटते.

जीपमधून अंगणवाड्या, शाळा फिरत असताना तलासरीचा परिसर दिसत होता. रस्त्याच्या भोवताली सगळीकडे झाडे होती, शेते होती. या ठिकाणचे जीवन शाळा नाही, शेती आहे हे त्यामुळे तीव्रतेने जाणवत होते. 'शाळा' या मुलाना त्याच्या जीवनापासून दूर नेणार नाही का, असा प्रश्न मनात येत होता त्याचे उत्तरही मनात येत होते. शाळेत जाणारी मुले सुशिक्षित, सुसंस्कृत, सवेदनाक्षम व्हावीत पण त्याचे केवळ शहरीकरण होऊ नये. नागर सस्कृतीमधील, विद्या, कला, क्रीडा यांचा आस्वाद घेण्यास ती समर्थ व्हावीत पण स्वतःच्या ग्रामीण भागापासून तुटू नयेत. यासंबंधी श्रीमती जर्माखिडीकर बाईंशी बोलले. त्या म्हणाल्या, शाळेत मुलांना शेतीच थोडंफार शिक्षण आम्ही देतो. एरवीही आदिवासीना शेतीसाठी मदत करतो. एकाने

शेती फार छान केली आहे. त्या शंकर दुबळाच्या शेतावरच आपण आता चाललो आहोत. मला जमखिंडीकर बाईंचे आश्चर्य वाटत होते. त्यांना सेवानिवृत्त व्हायला अवघे दोन महिने बाकी होते. पण उत्साहाने त्या मला माहिती देत होत्या. तत्परतेने शाळेमधल्या चौकशा करीत होत्या. शाळेभोवती झाडांसाठी दिलेले बी-बीयाणे, रोपे, कुंपणासाठी दिलेले पैसे याचे काय झाले ते दक्षतेने पहात होत्या. तडफेने त्यांच्या कचेरीतली कामे आवरत होत्या. आम्ही शंकर दुबळा यांच्या शेतावर आलो. तीन एकर वीस गुंठे जमीन होती. सरकारी शिबिरात मिळालेल्या माहितीनुसार शंकररावांनी शेती केली होती. विरोळी नदीच्या धरणामुळे बारा महिने पाणी मिळू शकत होते. जून ते ऑक्टोबर भात, नोव्हेंबर ते जानेवारी गहू, जानेवारी ते मे हिरवा मूग, भुईमूग अशी वर्षातून तीन पिके निघत होती. फळे मुंबईला विक्रीसाठी जात होती. दालचिनी, काळे मिरीचे वेलही लावले होते. पण अजून पीक आले नव्हते. सरकारने सांगितल्याप्रमाणे प्रयोग करायला मी आधी तयार नव्हतो. पण केल्यावर फायदा झाला हे शंकररावांनी सांगितले. फिल्म्स डिव्हिजनचा माहितीपट आपण पहात आहोत असे मला वाटले. सरकारी शिबिरामुळे प्रत्येकाची एवढी प्रगती झाली तर आणखी काय पाहिजे !

अंगणवाड्या, शाळा आम्ही फिरत होतो. त्याच दिवशी तलासरीमध्ये आमदार कोम यांच्या नेतृत्वाने शाळेतल्या विद्यार्थ्यांचा पोलिसांवर मोर्चा गेल्याचे कळले. तो मोर्चा मला पहायला मिळाला नाही. पण दोनतीन जणांकडून, काही विद्यार्थी–विद्यार्थिनींकडून मोर्चाची हकिगत कळली आश्चर्य म्हणजे ती हकिगत माणसांगणिक वेगळी नव्हती. सर्व बाजूंनी एकच हकिगत ऐकू आली. मुंबई–अहमदाबाद महामार्गावर सायकलवरून जाणाऱ्या एका विद्यार्थ्याला टँकरने धडक दिली. मुलगा पडला. बरेच लागले. मुलाचे वडील पोलीस चौकीवर तक्रार घेऊन गेले. तेव्हा पोलिसाने त्यांना उर्मटपणे उत्तरे दिली. पोलिसांच्या निषेधार्थ आमदार श्री. कोम यांनी विद्यार्थ्यांना मोर्चाचे आवाहन केले. शाळेतल्या विद्यार्थ्यांचा पोलीस चौकीवर मोर्चा गेला. त्या मोर्चाने पोलिसांच्या बदलीची मागणी केली. बदलीच्या मागणीत मला अर्थ वाटला नाही. पण सी. पी. एम्‌च्या तत्पर प्रतिक्रियेचे कौतुक वाटले.

मोर्चानंतर दुसऱ्याच दिवशी अंगणवाडीला दहा वर्षे पूर्ण झाल्याबद्दल एका शाळेत गट विकास अधिकाऱ्यांनी समारंभ आयोजित केला होता. प्रदर्शन भरविले होते. अंगणवाडी सेविकांनी मुलांसाठी तयार केलेले तक्ते, वस्तू प्रदर्शनात मांडल्या होत्या. त्यांची स्पर्धा होती. सभापती श्री. ओझरे यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्‌घाटन झाले. गावातली बरीच मंडळी जमली होती. एक छायाचित्रकार हजर होते. छायाचित्रे घेतली जात होती. अंगणवाड्यांच्या सुपरवायझर सौ. सलमा सावे, सौ. मंदाकिनी सावे आणि सौ. चित्रलेखा कोठावळे यांनी समारंभाची बरीच बाजू सांभाळलेली दिसत होती. वातावरण उत्सवाचे, उत्साहाचे दिसत होते. प्रदर्शन सुंदर मांडले होते. अंगणसेविकांच्या हस्तकौशल्याचे अनेक नमुने त्यात होते. प्रदर्शन पाहून झाले. सभापती, आमदार यांनी आपल्या भाषणात प्रदर्शनाचे मनःपूर्वक कौतुक केले. आमदार श्री. कोम यांनी प्रदर्शन दोन दिवस ठेऊन गावातल्या लोकांना विद्यार्थ्यांना ते पहायला मिळावे अशी व्यवस्था केली. या कार्यक्रमाच्याच वेळी सलमा सावे यांनी बसविलेले एक दहा–पंधरा मिनिटांचे नाटुकले पहायला मिळाले. गंमत वाटली. लहान मुलांना प्रतिबंधक इंजेक्शने देण्याविषयीचे नाटक होते.

एक वारली स्त्री, तिच्या तान्ह्या मुलाला मांडीवर घेऊन बसली. नर्स येऊन म्हणाली, 'मी तुझ्या मुलाला इंजेक्शन देते. औषध देते. म्हणजे त्याला डांग्या खोकला, घटसर्प, धनुर्वात असे काही होणार नाही' वारली स्त्री ऐकत नाही. मग पुठ्ठ्याचा मुखवटा बांधून एक मुलगी आली. सांगू लागली 'मी आहे पोलिओ. तुझ्या मुलाला खाणार खाणार...' दुसरी मुखवटावाली आली- 'मी आहे डांग्या खोकला. तुझ्या मुलाला ' अशा तीनचारजणी आल्या आणि गेल्या. मग मूल आजारी झाले. नर्स पुन्हा आली. आईने आता मुलाला इंजेक्शन, औषधे देऊ दिली मुखवटेवाल्या मुली पुन्हा आल्या. पण आता त्यांना बाळाच्या जवळ जाताच येत नाही. कारण बाळाने तर इंजेक्शन, औषध घेतलेले असते.



अंगणवाडीत...सौ. जमखिंडीकर

¤

सगळे रोग दूरूनच पळून जातात.

नाटुकले करताना कलाकार आणि पहाताना गाववाली प्रेक्षक मंडळी रंगून गेली होती. मनमुराद हसत होती. काहीही म्हणा. कला माणसाला फार सहजपणे जिंकून घेते. खूप काही शिकवूनही जाते. रोगाची माहिती देणाऱ्या डॉक्टरांच्या भाषणापेक्षा त्या नाटुकल्याने प्रेक्षकांना नक्कीच जास्त प्रभावित केले असावे.

## विश्वासपूर्ण वातावरण

कार्यक्रम संपला. अंगणवाड्यांच्या सुपरवायझर असलेल्या तिघींशीही नंतर बोलण्याची संधी मिळाली. सौ. कोठावळे दापचरीहून तलासरीला येणाऱ्या, तर मंदाताई आणि सलमाबाई सावे दोघी बोर्डीला रहाणाऱ्या. बोर्डीहून तलासरीपर्यंत यायला दोन अडीच तास लागतात म्हणजे हे तर मुंबई सारखेच झाले. खरे म्हणजे मुंबईपेक्षा कठीण. कारण मुंबईला दर पाच मिनिटांनी धावणाऱ्या स्थानिक गाड्या आहेत. तेथे तसे नाही. दिवसातून एक दोनच बस. बाकी बहुतेक वेळी या तिघीही ट्रकमधून तलासरीला येतात जातात. बायकांनी असे करावे का, तसे करावे याची आम्ही मुंबईत चर्चा करतो. या ठिकाणी त्या तरुण स्त्रिया निर्भयतेने सहज वावरत होत्या. क्वचित् एखादा अपवाद वगळता ट्रकवाल्यांचा अनुभव एकंदर चांगला

असेच त्या म्हणाल्या. मुबईत मात्र ट्रक-वाल्यांबद्दल एक भीती आपल्या मनात असते. बस मिळत नाही म्हणून एखादी स्त्री पटकन ट्रकला हात करून, ट्रकमध्ये बसून जाणे हे मुंबईत सभवत नाही. तलासरीच्या परिसरात वातावरण एकदर चांगले असे त्याच्या बोलण्यात आले. आदिवासी नेहमी दारू प्यायलेले असतात, पण बायकांची छेड काढणे हा प्रकार विलकूल नाही. कित्येकदा एका अगणवाडीतून दुसऱ्या अंगणवाडीत जाण्यासाठी या सुपरवायझर· स्त्रियांना एकटीला तास तास चालावे लागते. मार्ग अनेकदा निर्मनुष्य असतो. पण भीती वाटत नाही. लोकाची नीतीमत्ता चागली. जिल्हा परिषदेच्या कचेरीतले वातावरण एकदर सहकार्याचे, आमदार श्री. कोम, सभापती श्री. ओझरे कोणतीही मदत करण्यास तत्पर असतात असेही त्याच्या बोलण्यात आले.

इतर शाळापेक्षा विश्व हिंदु परिषदेच्या वसतिगृहावरची मुलेमुली बोलायला अधिक मोकळी वाटली. त्याच्याशी मी बोलत बसले तेव्हा त्याचे शिक्षक, किंवा वसतिगृहावरची मोठी माणसे भोवताली नव्हती वेळही बराच मिळाला होता. हे त्याच्या मोकळया बोलण्याचे कारण असावे– नववी, दहावीवी मुले होती दूरदर्शन, चित्रपट, पुस्तके, शिक्षण, भूतखेत अशा अनेक विषयावर आम्ही बोललो. दहावीनंतर आपण काय करायचे याचा विचार फारसा कोणी केला आहे असे वाटले नाही. आर्टस्, सायन्स, कॉमर्स हे तीन शिक्षणक्रम त्यांना माहिती होते. पण इतर लहानलहान शिक्षणक्रमाची त्यांना फारशी कल्पनाच नव्हती. डहाणु–ऊंबरगाव सोडून इतरत्र फिरून आलेली मुले फारच थोडी होती. शिक्षणानंतर गावातच रहावे असे बहुतेकाना वाटत होते. एकजण मात्र म्हणाला, मुबई टी. व्ही वर सिनेमात पाहिली आहे. रस्ते, मोटारी, ताजमहाल हॉटेल छान दिसतं. मुबईत रहावंस वाटत. मुलांनी चित्रपट दूरदर्शन आणि व्हीडिओवरच पाहिले होते. चित्रपटगृहात मोठ्या पडद्यावर चित्रपट बऱ्याच जणानी पाहिले नव्हते. वसतिगृहात वाचनालय आहे. परतु सगळी पुस्तक मुलानी वाचलेली नव्हती. चागली, इंटरेस्टिंग पुस्तकच नाहीत, सगळी सुभाषबाबू, विवेकानंद याची चरित्रं असली काही तरी आहेत असा मुलांचा अभिप्राय. मुले सगळयात रंगली ती भुताच्या गप्पात आमचा भुतावर विश्वास आहे घरच्या आजारपणात त्याचा अनुभव येतो असे त्यांचे ठाम मत. भुताळी बाई ते शिक्षण कसं मिळवते त्याची माहिती मला मुलानी दिली. तिला शिक्षणासाठी नवरा किंवा मुलगा बळी द्यायला लागतो. तो आजारी पडतो. मरतो. मग ती बाई आणि तो मत्र शिकविणारा दोघ त्याला खातात. एकदा का स्वत च्या माणसाला खाल्ला म्हणजे मग तिला कोणाची माया उरत नाही. ती कोणाला पण काही करू शकते. जुना 'वाडा' प्रकरणाचा सदर्भ देऊन मुलानी त्याचे भाष्य केले. ती बाई भुताळीच होती. भगतानं शोधून काढली होती. पण पेपरानी उगीच त्याला राजकारण म्हटलं आता आम्ही बोलतो ते तुम्हीपण अंधश्रद्धा म्हणून छापाल. पण शहरातले लोकसुद्धा भुताना घाबरतात. काल साताक्रूझच्या शाळेतली मुलं ट्रीपला आली होती. इथ रात्री भुत असतात असं आम्ही सागितल्यावर घाबरली. आम्हाला वाटतं, ज्यांचा भुतावर विश्वास नाही त्याच्याच मागं भुतं लागतात.

बरोबरीच्या मुलीशी बोलता का, बोलायला आवडतं का, या प्रश्नाला मुलानी आधी नीट उत्तर दिलं नाही. नंतर म्हणाली, काम असलं तर बोलतो. तसं हॉस्टेलवर बोलत नाही. पण शाळेत बोलतो.

मुलीशी बोलतानाही भुताखेतावरचा विश्वास तोच आढळला. पण इतर काही गोष्टीमध्ये फरक होता. वाचनालयातली झाशीची राणी, अहिल्याबाई होळकर याच्यावरील पुस्तके त्यानी वाचली होती. त्यातील महत्त्वाचा तपशील त्याच्या लक्षात होता. डहाणु–उंबरगावच्या परिसराबाहेर बहुतेक मुली फिरून आल्या होत्या. दूरदर्शन पहायला बसणे, रात्री हिंडणे यावर इतर सर्व वसतिगृहाप्रमाणे याही वसतिगृहात बधने आहेत. याबद्दल तुम्हाला काय वाटतं असं मी मुलीना विचारल तेव्हा त्या म्हणाल्या, 'मुलीना असं सगळं ऐकायला लागतंच की काय करणार? मी त्याना म्हटल, मुबईत आम्ही हल्ली म्हणतो– स्त्री पुरुष सारखेच. उगीच जुन्या बायकासारख खाली मान घालून मार खात बायकानी जगायचं नाही. मला अनपेक्षितपणे मुलीकडून उत्तर आले. ते माहिती आहे आम्हाला. पुस्तकातल्या रझिया पटेलच्या धड्यात आहे सगळं! 'सगळी जोखड स्त्रीवर का?' 'हा जुलूम सहन करणार नाही.' एका पाठोपाठ एक धड्यातली वाक्यं त्यानी पाठ म्हणून दाखविली. ती आम्हाला पटतात असेही सागितले. घरातली, शेतीची कामं आम्ही करतो. भाऊ काही इतकं सगळं करीत नाही, असेही त्या नतर सागू लागल्या• मुलाशी मैत्री, लग्न या विषयावर मात्र बोलण्याची त्याची सकोचाने तयारी नव्हती.

वसतिगृहात आलेली मुले अशिक्षित, अतिगरिबी असलेल्या कुटुबातून आलेली आहेत मुली मात्र थोड्या फार सधन, शिक्षित कुटुबातून आलेल्या आहेत. त्यामुळे साहजिकच त्याच्यात चौकसपणा, प्रगल्भता अधिक जाणवते.

अनेक ठिकाणी फिरणे बोलणे झाले. तलासरीची मला आता थोडी फार कल्पना आली. मी मुलाखतीकडे वळले. आमदार श्री. कोम आणि सभापती श्री ओझरे हे दोघेही आदिवासी समाजातले. सुशिक्षित सी.पी.एम् तळमळीचे कार्यकर्ते आणि त्या पक्षाचे प्रतिनिधी म्हणून निवडूनही आलेले श्री. माधवराव काणे, विश्व हिंदु परिषदेचे कार्यकर्ते त्याचे सहकारी आण्णा जोशी आणि सौ. जोशी शून्यातून एक मोठे विद्यार्थी वसतिगृह त्यानी उभे केले आज आदिवासी समाजातील १४५ मुले आणि ४५ मुली त्या वसतिगृहात रहातात. ग्रामीण भागातले समाज कार्यकर्तेच राष्ट्राचा विकास करू शकतात, राष्ट्रीय परिवर्तन घडवून आणू शकतात हे सत्य विचारवंतानी अनेकदा सागितले आहे. म्हणूनच या सगळयांच्या मुलाखती घेण्याचे मी योजले होते. मिशनरी शाळेत जाणे मला जमले नाही.

¤


मराठीतील एक सच्चे आत्मचरित्र

हंसा वाडकर

# सांगत्ये ऐका

चौथी आवृत्ती

मूल्य : १४ रुपये

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, पुणे ३०

# जेव्हा जनजागृती सर्व थरांत होईल...
## —लहानू शीडवा कोम

**प्रश्न :** आता तुम्ही आमदार आहात. अगदी लहानपणापासून आमदार होण्यापर्यंतचा तुमचा प्रवास थोडक्यात सांगू शकाल का ?

**श्री. कोम :** आदिवासीमध्ये आमचं घर तस सधन होतं. गावात जे काही चार–पार लोक सधन होते, त्यातलं आमचं घर होतं. घरात पुरेसं धान्य असायचं. कपडे होते. पोटापाण्याचा प्रश्न मला नव्हता. दगदग नव्हती. भोवताली गरिबी दिसायची. माझ्या घरात वडील शिकलेले होते. चुलते शिकलेले होते. वडील कॉंग्रेसच्या स्वातंत्र्याच्या चळवळीत काम करायचे. १९४५–४६ मध्ये वयाच्या पाचव्या, सहाव्या वर्षी मी शाळेत जायला लागलो. पोलीस पाटलाच्या ओटीवर शाळा भरायची शाळेत मोडी होत. पाढे अगदी औटकीपर्यंत पाठ करून घ्यायचे. १९५६ मध्ये मी मॅट्रिक झालो. माझं शिक्षण डहाणूला झालं.

**प्रश्न .** ज्या मार्क्सिस्ट पक्षातर्फे तुम्ही निवडून आलात त्यांच्याशी तुमचा केव्हा सबंध आला ?

**कोम :** मॅट्रिकला असताना, किंवा त्यानंतर एक–दोन वर्षे भूदान चळवळीची भाषण ऐकत होतो. त्या भाषणात रशियात क्रांती कशी झाली, जमिनीच वाटप कस झाले, जमीनदार मारले गेले, रक्तपात झाला हे सांगायचे.

**प्रश्न :** भूदान चळवळीच्या भाषणात रशियन क्रांतीचा संदर्भ दिला जायचा ?

**कोम :** हो, दिला जायचा. ती भाषण ऐकून माझ्या डोक्यात विचार यायचा. ही क्रांती म्हणजे काय ? त्या दृष्टीनं मी वाचन करायला लागलो. काही लोकांकडून समजावून घेऊ लागलो. नंतर कॉमरेड डांगे, शामराव परुळेकर, गोदाताई परुळेकर यांच्याशी संपर्क साधून समजावून घेतलं. सर्वोदयवादी शंकरराव देव, वसंतराव नारगोळकर, आचार्य भिसे यांच्याकडेही गेलो. आचार्य भिसे यांच्याकडे मी आणि माजी आमदार वडू यांनी आश्रमात राहून दोन वर्ष काम केल. ते करीत असताना आम्ही दोघांनी आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह काढण्याच ठरवल. त्यांनी आधी वसतिगृह काढले मी आता नंतर काढलं.

**प्रश्न :** भूदान चळवळीची भाषणं तुम्ही सांगता. रशियन क्रांतीचा मार्ग त्यांना पटण्यासारखा होता असं वाटत नाही. रक्तरंजित क्रांती भूदान चळवळीला अपेक्षित नव्हती. ते नेमक काय सांगायचे ?

**कोम :** भूदान चळवळीत रशियन क्रांतीसारख झाल पाहिजे असं सांगायचे. पण त्याच्यासारख रक्त सांडवून नाही असही म्हणायचे. आपल्याला जमिनी मिळवायच्या आहेत, त्यासाठी लोकांचं हृदय-परिवर्तन कस करायच, ग्रामदान कस करायच हे ते सांगायचे. त्यामुळ मी वाचायला लागलो. हे जनता, झगडे हे सगळं कळायला लागलं. नंतर मी कम्युनिझमकडे झुकलो.

**प्रश्न :** म्हणजे तुम्हाला कुठेतरी भूदान चळवळीपेक्षा कम्युनिझमचं जास्त आकर्षण वाटलं ? ही चळवळ आपल्याला निश्चित काही देऊ शकेल असं वाटल ?

**कोम :** हो कम्युनिस्ट मला एकदम जवळचे वाटले. विचार करून १९५९ मध्ये मी कम्युनिस्ट पक्षाचा सभासद झालो.

**प्रश्न :** आचार्य भिसे यांच्या आश्रमात तुम्ही रहात होतात. त्यांच्या आठवणी सांगाल ? म्हणजे अशा व्यक्तीच्या सहवासातली एखादी घटना, प्रसंग एकदम तुम्हाला काहीतरी शिकवून, सांगून गेला अशा आठवणी.

**कोम :** आचार्य भिसे म्हणजे झटून काम करणारे. आळस नाही. आचार्य भिसे यांना जांभई आलेली मी पाहिली नाही. कधीच पाहिली नाही. दिवसरात्र मी त्यांच्याकडे होतो. पण आळस दिसला नाही. नेहमी कामात असायचे.

**प्रश्न :** कोणत्या प्रकारचं, कशा प्रकारे काम करायचे ते ?

**कोम :** आदिवासीच सगळं काम करायचे. सानेगुरुजींच्या पठडीत ते तयार झाले होते. शिक्षक होते. शिकवायचे. आदिवासींच्या तक्रारी लिहून द्यायचे.

**प्रश्न :** पण काही तरी महत्त्वाचं उमगलं, त्याचा पुढच्या आयुष्यात उपयोग झाला अशी आचार्यांची आठवण ?

**कोम :** त्यांच्यापासून मी संस्कार घेतले. लवकर उठायचं. लवकर निजायचं. उठल्याबरोबर झाडझूड करायची. सकाळी काम करायचं. ते माझं वळण अजून कायम आहे. ते वळण कधीच जाणार नाही.

### योजनांचा अपुरेपणा

**प्रश्न :** गोदुताई परुळेकरांची भाषणं तुम्ही ऐकली होती ?

**कोम :** हो. कम्युनिस्ट पक्षामध्ये येण्याआधीपासून मी त्यांची भाषण ऐकत होतो.

**प्रश्न :** भूदान चळवळ आणि गोदुताईंची भाषण एकाच काळात ऐकत होतात ?

**कोम :** हो. एकदम ऐकत होतो. त्यांची तुलना करीत होतो. गरीब लोकासाठी आपण खूप काम करावं असं वाटायचं. वडील कॉंग्रेस चळवळीतले, बेचाळीसमध्ये त्यांनी लाठीमार सहन केला होता. ते संस्कार मनावर होते. लहानपणापासून मनात काम करण्याची जिद्द होती. पण कुठं काम करावं हा संघर्ष मनात होता. शेवटी कम्युनिस्ट पक्षाचा मेंबर झालो.

**प्रश्न :** लहान वयात उच्च रहाणीमानाचं आकर्षण वाटलं ? भोवतालच्या जमीनदारासारखं आरामाचं जीवन जगाव असं वाटलं ?


**कोम :** नाही. लोकासाठी काम करावं असच वाटायचं.

**प्रश्न :** वेगवेगळी भाषणं ऐकत होतात तेव्हा आपणही निवडणूक लढवू, निवडून येऊ असं वाटल ?

**कोम :** नाही फक्त लोकासाठी आपण काम करावं एवढंच वाटायचं.

**प्रश्न :** निवडणुकीला केव्हा उभे राहिलात ?

**कोम :** १९६२ मध्ये जिल्हा परिषदेला कम्युनिस्ट पक्षातर्फ निवडून आलो. १९६२ च्या एप्रिलमध्ये निवडणूक झाली आणि १९६२ च्या नोव्हेंबरमध्येच हिंदुस्थान–चीन संघर्षाला सुरुवात झाली.



लहानपणापासून
लोकांसाठी काम करावं
असं वाटायचं. .
- श्री. कोम

त्यामुळे मी जेलमध्ये गेलो. जेमतेम दोन मिटिंग अटेंड केल्या होत्या.

**प्रश्न** : चीन–भारत युद्ध आणि तुम्ही का जेलमध्ये ?

**कोम** : आम्ही कम्युनिस्ट. हिंदुस्थानमधल्या कम्युनिस्ट पार्टीच्या आम्हा दीड हजार लोकांना जेलमध्ये घातलं होतं. प. बंगाल, आसाम सगळ्या ठिकाणचे कम्युनिस्ट होते. आम्ही बाराजणं, शामराव परुळेकर, गोदाताई परुळेकर, नार्वेकर, खोपकर वगैरे लोक साडेतीन वर्षं जेलमध्ये होतो. नियमाप्रमाणं हजर राहिलो नाही म्हणून जिल्हा परिषदेनं माझं सदस्यत्व कमी केलं मग १९६४ मध्ये मी जेलमधूनच उभा राहिलो निवडून आलो.

**प्रश्न** : सुटून आल्यावर काय काय केलं ?

**कोम** : नंतर जिल्हा परिषदेत मी सतत तीन टर्म निवडून आलो. म्हणजे बघा, एकंदर १९६२ ते १९७७ हा काळ.

**प्रश्न** : या काळामध्ये कार्य कोणतं केलंत ?

**कोम** : जिल्हा परिषद ही एक चौकट आहे. सरकारच्या योजना, जिल्हा परिषदेच्या योजना यांची कामं करीत होतो. हे काम करीत असताना लोकांच्या दैनंदिन गरजा, किसान सभेचं काम, पक्षाचं काम हे करीत होतो.

**प्रश्न** तुमच्या कामाचं स्वरूप काय होतं ? एखादा प्रकल्प हातात घेतला होता ?

**कोम** : असा काही नाही. पण लोकांच्या जमिनीच्या तक्रारी, लोकांना अर्ज लिहून देणं, लोकांची भांडणं मोडवणं, त्यांना बैलजोडी मिळवून देणं, सरकारी योजना लढाई करून मिळवून देणं अशी कामं होती.

**प्रश्न** : म्हणजे सरकारी योजनाच घेऊन त्या अंमलबजावणीसाठी लढे उभारण्याचं काम तुम्ही केलंत. पण त्यावेळेस सरकारी योजना विकासासाठी पुरेशा आहेत असं तुम्हाला वाटलं ?

**कोम** : नाही. योजनांचा अपुरेपणा जाणवला.

**प्रश्न** : सरकारी योजना अपुऱ्या वाटल्या तर त्याला पूरक अशा काही योजना तुमच्याकडे होत्या ?

**कोम** : आम्ही जिल्हा परिषदेला सुचवलेलं होतं. पण जिल्हा परिषद ही एक चौकट असते. त्या पलीकडे ते जाऊच शकत नाही.

**प्रश्न** : कोणत्या योजना सुचविल्या होत्या ?

**कोम** : काही रस्ते, शाळा, पाटबंधारे यासंबंधी सुचविल्या होत्या.

**प्रश्न** : त्या पूर्ण झाल्या ?

**कोम** : काही पूर्ण झाल्या.

**प्रश्न** : कोणत्या योजना पूर्ण झाल्या ?

**कोम** : काही शाळा उघडण्याची, बांधण्याची कामं झाली.

**प्रश्न** : हा शेतीवर अवलंबून असलेला भाग आहे. शेती पावसावर अवलंबून. पुरेसं पीक नाही, तर पाणी पुरवठ्याच्या दृष्टीनं तुम्ही काही योजना आखल्यात, कार्यवाहीत आणल्यात का ?

**कोम** : योजना आखल्या. पण ते चालवणं सरकारवर किंवा को–ऑप. सोसायटीचं काम असतं. सध्याच्या परिस्थितीत ते शक्य नाही. सरकारमुळं त्या फेल गेल्या.

## संघर्षाचा वेगळा विचार ?

**प्रश्न** : सरकारी कामाचा बोजवारा उडतो आता आपल्याला चांगलं माहिती झालं आहे. पण बोजवारा उडू नाही, सरकारनी योग्य काम करावं यासाठी तुम्ही काही केलं ?

**कोम** : केलं. पण त्याचा उपयोग झाला नाही.

**प्रश्न** : आश्चर्य आहे. तुमचा भाग तसा जागरूक आहे. मोर्चे निघतात. संप होतात. तरी तुमचा सरकारवर दाब येऊ शकत नाही ?

**कोम** : हा शेतीचा भाग डोंगराळ आहे. लागवडीची जमीन कमीच. शेती कितीही सुधारली तरी इथल्या प्रजेला शेतीवर जगणं शक्य नाही. त्यामुळे यांना मजुरीसाठी बाहेर जावं लागतं. इथंच कारखाना व्हायला पाहिजे. घरटी एका माणसाला नियमित कायम रोजगार मिळाला पाहिजे.

**प्रश्न** : लोकसंख्या आणि शेती यांचं प्रमाण जुळणार नाही म्हणून कारखानदारी तुम्हाला आवश्यक वाटते. पण त्याबरोबर भांडवलशहांची सत्ता येते. ती हजारो मजुरांचं शोषण करू लागते. त्याचं काय ?

**कोम** : म्हणून त्यासाठी झगडे, लोकांची संघटना करणं हे सगळं आलंच की !

**प्रश्न** : संघटन करून, मोर्चे काढून तुम्ही भांडवलशहांवर नियंत्रण करू शकाल याची तुम्हाला खात्री वाटते ?

**कोम** : नुसतं निदर्शनं आणि मोर्चे एवढंच नाही. इतरसुद्धा काही करून काही प्रमाणात आम्ही नियंत्रण करू शकतो.

**प्रश्न** : १९४७ नंतर सगळेच विरोधी पक्ष सतत निदर्शनं, मोर्चे, संप करीत सुटले. पण त्यामुळे जनतेचा किंवा विरोधी पक्षांचा फार लाभ झाला असे वाटत नाही. संघर्षाच्या काही वेगळ्या मार्गांचा विचार केला ?

**कोम** : विचार केला. पण ते केव्हा होईल ? जेव्हा जनजागृती सर्व स्तरांमध्ये म्हणजे शेतकरी, कामकरी लोकांमध्ये जागृती होईल तेव्हा आज तशी स्थिती नाही.

**प्रश्न** : या ठिकाणी तुम्ही सत्तेवर आहात. अनेक गोष्टी करण्याचे अधिकार तुम्हाला आहेत. गावाचं, माणसांचं आरोग्य सुधारणं, अंधश्रद्धा घालवणं यादृष्टीने कोणते उपक्रम सुरू करण्याचा तुमचा

विचार आहे ? किंवा आधी सुरू केले आहेत ?

**कोम :** मुख्य प्रश्न रोजगाराचा आहे. इथले हजारो लोक डहाणू-तून बाहेर, ठाणे जिल्ह्यातूनही बाहेर मजुरीसाठी जातात. रेतीच्या, विटाच्या कामाला जातात. मासेमारी करायला जातात. मिठागराच्या कामाला जातात. इथेच त्याना रोजगार मिळवून दिला पाहिजे. सबंध ठाणे जिल्ह्यात तलासरीमध्ये एज्युकेशन जास्त आहे. कारण पुष्कळ लढे इथे झाले आहेत. काँग्रेसनी शाळा काढल्या. विश्व हिंदु परिषदेनी हॉस्टेल चालवलं. तरी अजून हे प्रमाण कमीच आहे.

**प्रश्न :** रोजगारीबद्दल आपण बोललो आहोत. शिक्षणाच्या बाबतीत जेव्हा मी शाळा हिंडले तेव्हा मला असं दिसलं, मुलांमध्ये शिक्षणाची उत्सुकता आहे. म्हणूनच अनेक गैरसोयी सोसून मुलं शाळेत येतात. थोडीफार शिकतात. पण शिकूनी तरी भुताखेतावरचा विश्वास तसाच आहे. ही अंधश्रद्धा विकासाच्या आड येते. ती घालविण्यासाठी काय करता ?

**कोम :** काही दुखणं झालं की त्याना भुताची बाधा झाल्यासारखं वाटतं. डॉक्टर दुखणं बरं करतो हे त्याना पटलं पाहिजे. त्या दृष्टीनेसुद्धा आमची बारा मेडिकल सेंटर्स आहेत तीन प्रायमरी हेल्थ सेंटर्स आहेत. डॉक्टर फक्त एकच आहे.

**प्रश्न :** डॉक्टर का मिळत नाहीत ?

**कोम :** डॉक्टर येत नाहीत खेडेगावात. आले तर निघून जातात. संस्कार शहरी. सवयी शहरी. त्यांना रहायला नीट जागा नसते. नर्सला जागा नसते. मग ते निघून जातात.

**प्रश्न :** जिल्हा परिषद, शासन याच्याकडे डॉक्टर न टिकण्याची ही कारणं देऊन डॉक्टरासाठी क्वार्टर्स बांधले पाहिजेत अशी मागणी केली का ? नुसत्या मागण्याने होणार नाही. सगळ्या शक्तीनिशी त्यासाठी दबाव आणलात का ?

**कोम :** प्रेशर आणायला पाहिजे क्वार्टर्स बांधा—डॉक्टर बोलवा असा सगळ्या पक्षानी मिळून प्रपोगंडा केला पाहिजे म्हणजे हळूहळू अंधश्रद्धा नाहीशी होईल. मध्ये आम्ही एका डॉक्टरांविरुद्ध मोर्चासुद्धा काढला होता. कारण तो कायम नसेत असायचा. त्याची बदली झाली. आता दुसरा आलेला डॉक्टर चांगला आहे.

**प्रश्न :** तुम्ही लोकसभेत, विधानसभेत केव्हा निवडून आलात ?

**कोम :** १९७७ मधे मी लोकसभेत निवडून आलो होतो. नंतर विधानसभा. म्हणजे माझी एकंदर पंधरा वर्षं जिल्हा परिषद झाली. अडीच वर्षं लोकसभा आणि विधानसभेची आता पाच वर्षं झाली.

**प्रश्न :** दवाखाना ही माणसाची अगदी प्राथमिक गरज आहे इथे शाळेमध्ये साप चावून मुलाचा मृत्यू झाल्याचं दोनतीन ठिकाणी ऐकलं. तेव्हा वाटलं या ठिकाणी तर डॉक्टर सतत पाहिजे तो कोठेही जलद पोहोचू शकला पाहिजे १९६२, १९६५ निदान १९७५ पासून तुम्ही इथे सत्तेवर आहात. डॉक्टरी सुविधा मिळवण्याच्या बाबतीत तुम्ही काय केलं ? डॉक्टराच्या पाच जागा असताना डॉक्टर एकच ?

**कोम :** या ठिकाणी डॉक्टरसाठी गाड्या आहेत. पण इतर लोकच त्या वापरतात. मग डॉक्टरला गाडी मिळत नाही डॉक्टर पाच हवेत आणि ते शासनानी द्यायला पाहिजेत. शासन देत नाही. त्यासाठी आम्ही प्रेशर टाकू.

**प्रश्न :** दवाखाना सुरू करायचा तर शहरात डॉक्टरना जागेचा प्रश्न भेडसावतो बरेच पैसे गुतवावे लागतात. जर रहाण्याची जागा, पिण्याचं चांगलं पाणी हे प्रश्न इथे सुटले तर शहरातले डॉक्टर काही वर्षांपुरते तरी इथे येतील. एक गेला की दुसरा अशी व्यवस्थित साखळी होऊ शकेल. पण मूलभूत सुविधा देण्यासाठी काय कराल ?

**कोम :** आमची खात्री आहे या वर्षअखेर आम्ही डॉक्टर मिळवू. परवा सी. ओ. ही येऊन गेले.

## आदिवासी प्रगती मंडळ

**प्रश्न :** या वर्षअखेर ? डॉक्टरासाठी किती क्वार्टर्स बांधू शकाल ?

**कोम :** क्वार्टर्स नाही. डॉक्टर आणू.

**प्रश्न :** अहो पण ते येतील आणि निघून जातील.

**कोम :** काहीतरी व्यवस्था करू. गाडी देऊ. रोज आणू पोचवू.

**प्रश्न :** इथे फोन्सची आवश्यकता आहे. या परिसरात फोनची व्यवस्था आहे जिल्हा परिषदेच ऑफिस, विश्व हिंदु परिषदेच केंद्र मिशन स्कूल याचे आपापले फोन आहेत. मग निदान शक्य असलेल्या, प्रत्येक शाळेत फोन असायला नको ? समजा डॉक्टरजवळ जीप आहे पण डॉक्टरला जेव्हा कळेल अमूक ठिकाणी, अमूक मुलाला साप चावला तेव्हा तो जीपमधून तिकडे जाईल. पण हे कळेल कसं ?

**कोम :** कळवण्याच्या दृष्टीनं अडचणच आहे. पण हल्ली सायकली असतात सायकलीवरून माणसाला आणतात. ज्यांना साप चावतो त्यातले निम्मे तरी लोक दवाखान्यात येऊ शकतात.

**प्रश्न :** पण सायकलीपेक्षा फोन जास्त जलद नाही का ? साप चावणं किंवा इतर काही आजारात वेळ फार महत्त्वाचा असतो.

**कोम :** फोन म्हणजे सेंट्रल गव्हर्मेंटचा प्रश्न आला.

**प्रश्न :** ते झालंच. पण फोनची सुविधा सगळ्या शाळा, सार्वजनिक ठिकाणी उपलब्ध असावी अशी मागणी तुम्ही केली आहे का ? प्रयत्न केले आहेत का ?

**कोम :** प्रत्येक शाळेत, पोस्टात फोन हवा. पण फक्त एका उपलाटच्या पोस्टऑफिसमधेच फोन आहे.

**प्रश्न :** अंधश्रद्धा नाहीशी करण्याच्या दृष्टीनं तुम्ही काय केलं, मुलांना तशा गोष्टी सांगणं, दूरदर्शनवर असा कार्यक्रमाचा आग्रह धरणं ?

**कोम :** असं नाही केलं. पण एक प्रयोग प्रत्यक्ष करून दाखवला. एका विशिष्ट मशीन, पद्धतीन चालल तर विस्तवावरून कोणालाही चालता येतं हे प्रत्यक्ष दाखवलं तुम्ही कोणीही चालू शकता. त्यात मंत्रतंत्र, भुताटकी, चमत्कार नाही, हे दाखवलं. लोकाना आश्चर्य वाटलं.

**प्रश्न :** हे चांगलंच आहे मुलानी मला सांगितलं, मागे वाड्याचं जे प्रकरण गाजलं होतं ते खरं म्हणजे भुताटकीचंच होतं. पेपरवाल्यानी भुताटकी नाही म्हणून खोटंच सांगितलं. त्याचं काय ?

**कोम :** काय म्हणता ? ते प्रकरण मी स्वतः बाहेर काढलं होतं. ती बाई भुताळी वगैरे काही नाही हे सिद्ध केलं होतं. तरीही असं मत आहे ? मला कोणी असं बोललं नाही. आमच्या हॉस्टेलवरच्या मुलामध्ये असे अंधविश्वास नाहीत पण या भागात काही ठिकाणी हे अंधविश्वास आहेतच. शिक्षणाच्या सुधारणेने हळूहळू कमी होतील. विकासासाठी आम्ही १९८३ मध्ये आदिवासी प्रगती मंडळ सुरू केलं. तेव्हाच वसतिगृह चालू केलं सुरवातीला वसतिगृहाला स्वतंत्र जागा

नव्हती. दहा मुलं मी माझ्या घरात ठेवली. माझी तीन मुलं होतीच. वर्षभर एकत्र स्वयपाक करीत होतो.

**प्रश्न** : शिक्षणाबद्दल जागरूकता दिसतेच. तितकी आरोग्याबद्दल दिसत नाही. इथे आरोग्य सेवकाचं पद आहे ना ? त्याचं काम काय ?

**कोम** : आरोग्यसेवकाचं पद आहे. ते किती आहेत याचा आकडा मला आता झटकन् सागता येणार नाही. पण पचायत समितीचे आरोग्य–सेवक सगळ्या गावात आहेत. त्यांच काम आरोग्याचच असतं. कोणाला काय झाल, औषध कुठे लागेल ते पहायच. विहिरीत औषध टाकायच. झाडाखोडामधे औषध टाकायच.

**प्रश्न** : गुरं आणि माणसं एकाच झोपडीत रहातात. हे आरोग्याच्या दृष्टीन बरोबर वाटत नाही. ही परिस्थिती बदलण्याचा काही प्रयत्न झाला ?

**कोम** : प्रयत्न केला. पण इथली ही सर्रास पद्धत आहे. प्रश्न पैशाचा येतो. गुरासाठी वेगळी जागा केली की राखणदार हवा. दुसरं म्हणजे नवीन शेतीसाठी नवीन प्रकारचे नांगर आले नाहीत. त्यामुळं गुरं परंपरेप्रमाणे घरातच.

**प्रश्न** : सगळ्याच विरोधी पक्षाच्या कार्यात, उपक्रमात 'शासन' हा एक मोठा अडथळा असतो. समजा उद्या तुमच्या पक्षाचं सगळीकडे राज्य आल तर ज्या योजना, जे काही जनतेसाठी करायचं असा तुमचा विचार आहे ते सगळं करू शकाल ?

**कोम** : सगळंच जमेल असं नाही. वैयक्तिक विचार कितीही असले तरी पार्टीचा एक कार्यक्रम असतो. त्याची शिस्त असते आम्हाला या देशात काय करायच आहे, यासवधी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षान कार्यक्रम तयार केला आहे.

**प्रश्न** : तो कोणता ?

**कोम** : पुस्तकरूपात लिहिलेला आहे. शेती, कामगार, आरोग्य, शिक्षण याबद्दल आमच्या पार्टीचं सरकार आलं तर काय करणार ते आम्ही त्यात दिले आहे.

**प्रश्न** : कागदोपत्री सगळं सुव्यवस्थित असत. पण ग्रामीण भागात ते कशा प्रकारे पोहोचत हा प्रश्न आहे. उदाहरणार्थ, गावाला शासनानं पोलीस खात दिल. पण ते वागतात कसे ? पोलिसाच्या उर्मटपणाविरुद्ध तुम्ही नुकताच मोर्चा काढलात. तुमच्या पक्षाचं राज्य आलं तर पोलीस असं वागणार नाहीत याची खात्री देऊ शकता ?

**कोम** : हो खात्री देऊ शकतो. कारण सत्ता मग खेड्यातून चालवली जाते. सध्या ती वरच्या याच्यातून गाजविली जाते.

**प्रश्न** : ज्या देशात कम्युनिस्ट राज्यकर्ते आहेत त्या रशिया, चीनमध्ये जाऊन त्या ठिकाणचे प्रत्यक्ष चित्र तुम्ही पाहिल आहे ?

**कोम** : नाही.

**प्रश्न** : लोकमान्य टिळकाचे शब्द आहेत– 'अत्युच्च पदी थोरही विघडतो.' कितीही मोठ्या मनाचा माणूस असू दे ! तो सत्तेवर आला की भ्रष्ट होतो. तर जनता जागृती महत्त्वाची की कम्युनिस्ट सत्ता जे पाहिजे ते सगळं देईल हे स्वप्न पहाणं योग्य वाटतं ?

**कोम** : मी जरी प्रत्यक्ष कोठे गेलो नसलो तरी आमच्यामधल्या तिकडे जाऊन आलेल्या पराजपेबाईंनी सागितलं आहे. चीनमध्ये बेकारी नाही. भिकारी नाही. कोणी उपाशी नाही. मुलं गुबगुबीत असतात. हे ऐकल्यावर मला वाटलं, आमच्याकडे मुलं अशी का गुबगुबीत नाहीत ? इथ मुलाचे डोळे खोल गेलेले. पोटं वरती आलेली. कारण चीनमध्ये सरकारच काम तळापर्यंत पोहोचल आहे. आपल्याकडे कोणतीही योजना नीट राबवता येत नाही. फायदा घेता येत नाही.

**प्रश्न** : आपण जे काही वाचतो, ऐकतो त्यावरून दिसतं रशिया आणि अमेरिका या दोन महाशक्ती सगळ्या जगावर राज्य करतात. निरनिराळ्या देशात अनेक मार्गांनी आक्रमण करतातना ?

**कोम** : रशिया आक्रमण करतो असं वाटत नाही.

**प्रश्न** : अफगाणिस्थानात ?

**कोम** : अफगाणिस्थानात मदत केली आहे. आक्रमण केलं नाही. त्याच्या राष्ट्राध्यक्षानी निमत्रण दिलेल होतं. जर रशिया गेला नसता तर अमेरिकेन हस्तक्षेप केला असता म्हणून मदत केली. मुलुख घेतलेला नाही.

**प्रश्न** : जमीनदारानी आदिवासीची गुलामगिरी चालविली होती तशा प्रकारे उघडपणे चालू काळात प्रबल देश इतराना गुलाम करणार नाहीतच. परतु शिष्यवृत्ती, सामाजिक कार्य अशा मिषानी हल्ली परकीय पैसा, प्रबल देशाची सत्ता दुसऱ्या दुबळ्या देशात शिरते. हे अमेरिका करते आणि–

**कोम** : अमेरिका विकासाच्या नावान हे करते त्यानी इथे तळासरीमध्ये कष्टकरी सघटना काढली होती. त्रिपुरामध्येही असच केल, जेणे करून आम्ही लढे करू शकणार नाही अस पहातात.

**प्रश्न** : रशियाच तेच आहे. म्हणून अफगाणिस्थानच उदाहरण मी दिलं.

**कोम** : त्या राष्ट्राध्यक्षानी जा म्हणून सागितल नाही तोपर्यंत रशियाच सैन्य असेल. जा म्हटल की ताबडतोब जातील.


¤

आमदार श्री. लहानु कोम यानी हेतुतः विचारपूर्वक मार्क्सवाद स्वीकारला आहे. जिल्हा परिषद किंवा कोणतेही शासन ही एक बदिस्त चौकट असते. ती अपेक्षित विकास कार्य करू शकत नाही असे ते मानतात. परतु कम्युनिस्ट शासनसुद्धा अशीच बदिस्त चौकट आहे असे त्याना वाटत नाही. कम्युनिस्ट पक्षाच्या सत्तेबरोबर सुख-समृद्धी येईल असेच स्वप्न ते पहातात. स्थानिक विकासासाठी औद्योगीकरण त्याना आवश्यक वाटते. औद्योगीकरणापाठोपाठ येणाऱ्या भांडवलशाहीच्या सत्तेवर नियत्रण ठेवता येईल हा विश्वास त्याना का वाटतो, ते नेमके समजू शकत नाही. तळासरीच्या विकासाची तळमळ श्री. कोम याच्या मनात आहे स्वतःच्या समाजाबद्दल त्याना जिव्हाळा वाटतो.

¤

## कम्युनिस्ट सत्ता, पाहिजे ते सगळं देईल, हे स्वप्न योग्य वाटतं ?

# सभापती– राजाराम नथू ओझरे



गोदुताईंनी आमच्यासाठी हाल काढले. त्यांचं ऐकलं पाहिजे असं वाटायचं –श्री. ओझरे

**प्रश्न :** तुमचा जन्म किती सालचा ? शिक्षण कोणत्या शाळा–कॉलेजमध्ये झालं ? शिक्षणाची आई–वडिलांना आवड होती की त्यांचा शिक्षणाला विरोध होता ?

**सभापती श्री. ओझरे :** माझा जन्म १९५२ मधला. आठव्या वर्षी शाळेत जायला लागलो. शाळा तीन किलोमिटर लांब होती. घरापासून शिक्षक घरी न्यायला यायचे. ते दिसले की मी कुठंतरी पळून जायचो. गुरं चारायला जायला मला आवडायचं शाळेत जाणं नकोसं वाटायचं; पण वडील तिसरीपर्यंत शिकले होते. त्यांना शिक्षणाची आवड होती. वडिलांनी मारहाण करकरून मला शाळेत पाठवलं. मी शाळेत जायला लागलो, दोन–दोन, तीन–तीन महिने शिक्षक नसायचे. त्याच शाळेत चौथीपर्यंत शिकलो. चौथीनंतर सातवीपर्यंत मिशनऱ्यांच्या शाळेत शिकलो. आठवी ते अकरावी ठक्कर बाप्पा हायस्कूलमध्ये गेलो. तेव्हा आठवीपासून रहायला विश्वहिंदु परिषदेच्या हॉस्टेलवर गेलो. भिवंडीला कॉलेजमध्ये गेलो तेव्हाही तिथल्या विश्वहिंदु परिषदेच्या दांडेकर हॉस्टेलमध्ये रहात होतो.

**प्रश्न :** शाळेत असताना आपण पुढे कोण व्हावं, काय करावं असं तुम्हाला वाटायचं ?

**ओझरे :** समाज कार्यकर्ता व्हावं असं वाटायचं.

**प्रश्न :** तुमच्या भोवताली भिवंडीला कॉलेजमध्ये असताना तुम्ही मजेत आरामात रहाणारी माणसं पाहिली असतीलच. त्यांच्यासारखं नोकरी करीत किंवा दुकान चालवून मोटारीतून फिरावं असं तुम्हाला कधी वाटलंच नाही ?

**ओझरे :** नाही. अगदी लहानपणापासून समाज कार्यकर्ता व्हावं असंच वाटायचं ?

**प्रश्न :** आश्चर्य आहे. असं का वाटायचं ते सांगू शकाल का ?

**ओझरे :** गोदुताईंची भाषणं ऐकत होतो. 'सावकारशाही नष्ट करा.' 'भांडवलशाही नष्ट करा.' या घोषणा सतत ऐकत होतो. गोदुताईंनी आमच्यासाठी खूप हाल काढले. त्यांचं ऐकलं पाहिजे असं वाटायचं. जमिनदारांनी आपल्या आदिवासींना लुटून बंगले बांधले आहेत. त्यांच्याशी भांडलंच पाहिजे असं मनात यायचं. कम्युनिस्ट विचारसरणी आवडत होती.

**प्रश्न :** विश्वहिंदु परिषदेच्या वसतिगृहात रहायला कसे गेलात ? कोणी ओळखीचं होतं ? तुम्हाला ओढ असलेलं कम्युनिस्ट वातावरण आणि विश्वहिंदु परिषदेच्या वसतिगृहातलं वातावरण यात काही फरक जाणवला ? वसतिगृहाचं वातावरण नकोसं वाटलं की हवंसं ?

**ओझरे :** वसतिगृह आवडलं होतं. प्रार्थना, खेळ, शिवाजी महाराजांच्या गोष्टी हे सगळं आवडायचं. वातावरणात फरकही काही वाटला नाही. त्या वसतिगृहात रहायला गेलो, कारण ख्रिस्ती मिशनच्या विरोधी मत गावात होतं. ते सक्तीनं धर्म बदलायला लावतात हे माहिती होतं. म्हणून विश्व हिंदु परिषद चांगली. त्याच ठिकाणी रहावं असं गावातल्या बऱ्याच जणांचं मत असायचं. म्हणून मी त्या हॉस्टेलवर गेलो. माधवराव काणे चांगले सामाजिक कार्यकर्ते, कोणत्या पक्षाचे नाहीत अशी कल्पनाही होती.

**प्रश्न :** कॉलेजमध्ये असताना इतर काही कार्यक्रम, उपक्रम यात सहभागी होत होतात की फक्त अभ्यास ?

**ओझरे :** फर्स्ट इयर आर्टला होतो. अभ्यास करायला आवडायचा; पण तेव्हाच महाराष्ट्रात विद्यार्थ्यांचे संप सुरू झाले. मी त्या वाऱ्यात सापडलो. सगळ्या मोर्चामध्ये सामील झालो. विद्यार्थ्यांच्या सगळ्या अॅक्टिविटीजमध्ये भाग घेतला. नंतर आणीबाणी आली. सरकारनं हुकुमशाही आणली आहे, सरकारविरुद्ध लढलं पाहिजे असं वाटायचं. शिक्षण सुटलं. मी भूमिगत कामात होतो. जेलमध्ये गेलो नाही. पण बाहेरून काम करीत होतो. आणीबाणी उठणार नाही, हुकूमशाही-विरुद्ध खूप मोठं बंड होईल असं तेव्हा वाटलं. बऱ्याच गुप्त मिटिंग व्हायच्या. पण आणीबाणी अपेक्षेपेक्षा लवकर संपली.

**प्रश्न :** आणीबाणी उठल्यानंतर तुम्ही काय केलं ? पुन्हा शिक्षण? नोकरीचा प्रयत्न ?

**ओझरे :** पुन्हा कॉलेजमध्ये गेलोच नाही. शिक्षण पुरं केलं तरी समाजकार्यकर्ताच व्हायचं हे ठरलं होतं. घराला आधार व्हावा म्हणून मी नोकरी करावी, पैसे मिळवावे अशी आईची इच्छा होती. पण वडिलांचं मत असं नव्हतं. ते म्हणाले, 'आम्ही कम्युनिस्ट पार्टीचं काम केलं. तेच तुम्ही केलं पाहिजे.' मग मी कम्युनिस्ट पार्टीचा मेंबर झालो. पुढे उमेदवार झालो.

**प्रश्न :** पक्षाचा सभासद झाल्यावर तुमच्या वाट्याला येणाऱ्या कामाचं स्वरूप कोणतं होतं ?

### स्थानिक प्रश्नांची सोडवणूक

**ओझरे :** किसानसभेचा फंड जमविणे, पार्टीसाठी फंड जमविणे, मोर्चा काढणे, रोजगार हमीसाठी मोर्चा काढायचा, कमी मजुरी असेल त्या ठिकाणी संप करायचा. या सगळ्यात भाग असायचा.

**प्रश्न :** जेव्हा मार्क्सवादी पक्षाचं काम करीत होतात तेव्हा भोवताली इतर पक्ष जे पक्ष होते–काँग्रेस, जनसंघ, समाजवादी त्यात

पुन्हा प्र. सो. पा. स. सो. पा. त्याच्याशी संघर्ष यायचे ? एका पक्षाचे दुसऱ्या पक्षावर आरोप, प्रत्यारोप सतत चालूच असतात.

ओझरे : नार्वेकर आमचं काम करीत होते तेव्हा जनसंघाशी क्लॅश यायचे. कॉंग्रेसशी तर नेहमी क्लॅश असायचे बाकीच्या पक्षांशी एवढं काही नव्हतं. ते पक्ष तलासरीत, या भागात फारसे नव्हतेच.

प्रश्न : जेव्हा जेव्हा संघर्षाचे प्रसंग आले तेव्हा तुमच्या मनात कधी द्वंद्व झाल, कधी असं वाटलं स्वतःचा पक्ष चुकीचा आहे आणि दुसरा बरोबर आहे ?

ओझरे : नाही. मार्क्सवादच बरोबर ही खात्री होती. कारण गोदुताई परुळेकर इथं तलासरीत नेहमी यायच्या. आमचे क्लासेस घ्यायच्या. पिळवणूक कशी होते ते त्या सांगायच्या

प्रश्न : पक्षाचं काम करताना इतर मार्क्सवादी पुढाऱ्यांशी तुमचा संबंध आला असणारच. ते कोणते ? सगळ्यांविषयी गोदुताईंसारखाच आदर वाटला ? सगळ्यांशी पटलं ?

ओझरे : श्री. कुरणे, सक्षगिरी, अहिल्याबाई रांगणेकर, कॉमरेड बी. टी. रणदिवे या सगळ्यांशी संबंध आला. तसं शहरी पुढारी आणि खेड्यातले पुढारी यांच्यात फरक जाणवायचा. ते आमचे क्लासेस घ्यायचे. पण एकदा मार्क्सवाद स्वीकारला की सगेच रहायचं अस आमचं असतं. शहरी पुढारी, खेड्यातले पुढारी सगळे बरोबर रहायचे.

प्रश्न : कॉ. डांगे यांच्याशी कधी संबंध आला ?

ओझरे : कधीच नाही.

प्रश्न : तुमच्या आठवणीत इथं नेहमी मार्क्सवादी पक्षच निवडून येतो आहे ?

ओझरे : नाही. १९५६ पासून कॉंग्रेसची पंचायत समितीच होती. आता साधारण गेली दहा वर्ष मार्क्सिस्ट निवडून येत आहेत.

प्रश्न : कॉंग्रेस पक्ष निवडून येत होता तेव्हा तुम्हाला कधी निराश वाटलं, की आपण एवढं काम करून निवडणूक कॉंग्रेसच जिंकतो.

ओझरे : नाही. कारण भारत–चीन युद्धामुळे आमचे पुढारी अटकेत होते. पाकिस्तान–भारत युद्ध झाले तेव्हाही आमचे पुढारी जेलमध्ये होते. त्यामुळं मधे आम्ही निवडणूक लढवलीच नव्हती. म्हणून इतर पक्ष येऊ शकले. आमच्याकडे लोकाना तसं पार्टी वगैरे कळतच नव्हतं. गोदुताई म्हणतील त्याला मत द्यायचं असं ठरलेल होत. गोदुताईंबद्दलची भावना अशी होती की ती बाई म्हणजे आकाशातून उडू शकते आणि पाण्यावर चालू शकते बॉंबेचे पुढारी इथं आमचे क्लास घ्यायला यायचे तेव्हा सांगायचे– 'आम्ही गोदुताईंचे शिपाई आलो आहोत.'

प्रश्न : गोदुताई तुम्हाला मार्क्सवाद, लेनिन, रशियन राज्यक्रांती याबद्दल सांगायच्या ? त्या जे काही सांगत ते लोकांना नीट कळायचं?

ओझरे : चीनमध्ये, रशियामध्ये जशी क्रांती झाली तशी भारतात करायची आहे असं त्या सांगायच्या. रशियामध्ये लेनिनने क्रांतीचा उठाव केला तेव्हा कामगारांनी त्याला कशी मदत केली ते त्या सांगायच्या. लेनिन भूमिगत कसा होता, जो कोणी त्याचं मुडकं आणून देईल त्याला बक्षीस कस लावल होतं, झारसाहेब कसे येत असत, आगगाडीच्या इंजिनमधून लेनिन कसा पळाला, शेवटी एका नकली लेनिनलाच कशा गोळ्या झाडल्या आणि लेनिन कसा सुटला, लेनिननी राष्ट्रं कस निर्माण केलं हे सगळ त्या स्टोरीमध्ये सांगायच्या त्या सागायच्या रशियात कोणी कोणाच नोकर नाही. रशियात बेकारी नाही. आम्हाला वाटायच आपल्याकड असच व्हावं. आपल्या हिंदुस्थानात टाटा, बिर्ला, मफतलाल हे मोठे भांडवलदार आहेत. ते पार्लमेंट चालवतात. आपल शोषण करतात. ते थांबलं पाहिजे.

## नक्की विचार नाही

प्रश्न : जे लोक मार्क्सिस्ट पक्षातर्फे निवडून आले त्यानी गावासाठी कामं काय काय केली ?

ओझरे : लोकल प्रश्न असले की सोडवायला ते असायचे. निवडून आलेले तलासरीतच जास्त दिवस रहातात. अडचणीच्या वेळी मदत करतात.

प्रश्न : तुमच्या आठवणीत असे कोणते स्थानिक प्रश्न या भागात निर्माण झाले ?

ओझरे : किनवलीचा गोळीबार. इतर लहानसहान रोजगारीचे शेतीचे प्रश्न असायचे. मजुरीच वगैरे बघायचे.

प्रश्न : तुम्ही स्वतः प्रथम केव्हा निवडून आलात ?

ओझरे : मी पहिल्यांदा १९७९ मधे निवडून आलो. नंतर इलेक्शन झालेलीच नाही.

प्रश्न : या तलासरीच्या परीसरात १९७९ पासून तुम्ही कोणतं काय केलंत ? पुढे काय करायच्या तुमच्या योजना आहेत ?

ओझरे : सतत लोकाशी संपर्क ठेवला. सरकारी योजनाची अंमलबजावणी केली. कर्ज नको असं लोक म्हणायचे. पण घ्या घ्या असं आम्ही सांगतो.

प्रश्न : लोक अशिक्षित. त्यांना नुसतं सांगून भागणार नाही. अर्ज वगैरे लिहून देण्याच प्रत्यक्ष काम केलं ?

ओझरे : आम्ही त्यांच्याबरोबर तलाठ्याकडे जातो. सातबाराचे उतारे तलाठ्याकडून मिळवून देतो. आम्ही बरोबर असलो की तलाठी पैसे घेत नाही. एरवी तलाठी त्याच्याकडून पैसे घेतो. आम्ही लोकांबरोबर बँकेत जातो आणि सांगतो याना कर्ज द्या. अस काम आम्ही करीत असतो.

प्रश्न : गोदुताई परुळेकरांच्या 'जेव्हा माणूस जागा होतो' या पुस्तकात शेवटी त्यांनी लिहिलं आहे, एवढा सगळा संघर्ष आम्ही केला. माणूस जागा झाला. पण हे आदिवासी अजून अर्धपोटी आहेत. यावर आदिवासीना जमिनी मोफत वाटून देण्याचा उपाय त्यानी सांगितला आहे. तुम्ही काही प्रयत्न केले आहेत का ?

ओझरे : ते म्हणजे अस आहे, सकस जमिनी अजून शेटच्याच नावावर आहेत. त्यासाठी आम्ही अर्ज करतो. झगडा करतो. मारामाऱ्या करायचीसुद्धा वेळ येते.

प्रश्न : नेहमी सगळं काम मोर्चा, मारामाऱ्या या संघर्षात्मक मार्गानेच होऊ शकत अस तुम्हाला वाटतं ? असं बघा, जमीनदारानं जमीन बळकावलेली आहे. कायद्याची सगळी बाजू बरोबर आहे. मग मोर्चा काढणार की दुसरे काही मार्ग अवलंबणार ?

ओझरे : लीगल आहे की नाही ते बघायला लागतच. समजा नुसती ताडी देऊनसुद्धा शेटनं जमीन विकत घेतलेली असते. आम्ही ते बघतो.

प्रश्न : कायद्याची जमीनदाराची बाजू बरोबर असली तर काय? म्हैसाळला देवलांनी एक प्रयोग केला. जमीनदारांना आवाहन केलं. न्याय, अन्याय, बरोबर, चूक, कायदेशीर-बेकायदेशीर असा प्रश्नच नाही. पण जमीनदाराकडे खूप जमीन आहे आणि कुळांकडे कमी आहे तर कुळांना त्यांनी जमीन द्यावी. विनोबाजींच्या भूदान कल्पने-चाच हा प्रयोग. तसं तुम्ही इकडे काही केलं आहे का?

ओझरे : तसा प्रयोग इकडे केला नाही. इकडच्या जमीनदारांनी फार छळ केला होता. छळ म्हणजे असं बघा–

प्रश्न . त्या छळाची मला कल्पना आहे. गोदावरी परुळेकरांच्या पुस्तकात त्यांनी सगळं सांगितलं आहे. पण तो क्रूर, अमानुष छळ आता संपला आहे. त्यानंतर तुम्ही जे मार्ग विकासासाठी स्वीकारता आहात त्याबद्दल मी विचारते आहे. मोर्चे, संप वगैरेंनी शासन ताळ्या-वर येत नाही. परिस्थिती बिघडणारच दिसते आहे. तर दुसऱ्या कोणत्या मार्गानी जावं असा विचार तुम्ही, तुमच्या पक्षानी केला आहे का?

ओझरे : तसा विचार झालेला नाही. बंद केलेल्या गिरण्या शास-नानी ताब्यात घ्याव्यात असं आम्हाला वाटते.

प्रश्न : शासनानं गिरण्या ताब्यात घेऊन प्रश्न सुटेल असं तुम्हाला वाटतं? शासनाची कार्यक्षमता तर जगजाहीर आहे.

ओझरे : कारखानदार काय करतात, मजुरी द्यायला लागेल म्हणून टाळेबंदी करतात. उदाहरणार्थ– एखादा शेट टाळेबंदी करतो आणि मशिनरी हालवतो दुसरीकडे नेतो तर शासनानी खरं म्हणजे असं होऊ न देता मजुरी द्यायला लावली पाहिजे. पण शेटवर काहीच कारवाई होत नाही.

प्रश्न : यावर उपाय काय? तुम्ही जे सांगता आहात ते सगळं फार नित्याचं, कॉमन झालं आहे. इंडियन एक्सप्रेसचा संप अशाच प्रकारे मोडून काढला. 'बंद' ही लढ्याची चाल तितकी परिणाम-कारक होताना दिसत नाही. तेव्हा तुमच्या जवळची नवी हत्यारं कोणती? या दृष्टीने तुमच्या पक्षाच्या चर्चेत काही विचार झाला आहे, किंवा होणार आहे?

ओझरे : तसा काही विचार झालेला नाही. आता कलकत्त्याला पार्टी काँग्रेस होणार आहे. पाच वर्षांत जालंधरनंतर आता कलकत्त्याला होते आहे. तेव्हा कोणता लढा द्यायचा हे ठरेल. राज्य कमिटी, डिस्ट्रिक्ट कमिटी, तालुका कमिटी, गाव कमिटी असं सगळं होऊन आम्हाला अभ्यास करावा लागेल.

## आमचं सरकार आलं तर

प्रश्न : पक्षाचे अभ्यासवर्ग होतात तेव्हा चर्चेचे विषय साधारण कोणते असतात?

ओझरे : 'पिळवणूक म्हणजे काय?' 'भांडवली लूटमार कशी होते?'

प्रश्न : ठीक आहे. या तलासरी परिसरात तुम्ही कार्यकर्ता म्हणून काम करायचं ठरवलं आहे? तुमच्या समाजातीच्या अधिकारात काय करायचं ठरवलं आहे?

ओझरे : तसं म्हणजे हे करतोच आहोत.

प्रश्न : या ठिकाणी डॉक्टरांचा संप आहे. सहजपणे डॉक्टरांची मदत मिळू शकत नाही. तुमच्याकडे मेडिकल ऑफिसरच्या जागा किती?

ओझरे : पाच. त्यातले एकच मेडिकल ऑफिसर आहे. पूर्वी जो होता तो सुद्धा दारूच्या नशेत असायचा. त्याची आम्ही बदली मागि-तली. दुसरं इथं काम म्हणजे उपजीविकेच्या दृष्टीने औद्योगीकरण वाढलं पाहिजे.

प्रश्न : औद्योगिकरण वाढलं की पुन्हा पुन्हा भांडवलशाहीतली पिळवणूक सुरू होणार नाही?

ओझरे : नाही. मजुरी द्यायला गव्हर्मेंटला भाग पाडायचं.

प्रश्न : तुम्ही मघाशी बदली म्हणालात त्यावरून आठवण झाली. कालच तलासरीत एका विद्यार्थ्याला ट्रकची धडक लागून अपघात घाला त्या मुलाच्या वडिलांना पोलिसानी उर्मट वागणूक दिली म्हणून तुमच्या नेतृत्वाने शाळेच्या मुलामुलींचा मोर्चा पोलीस चौकी-वर नेला. त्या पोलिसाच्या बदलीची तुम्ही मागणी केली. पण त्यांच्या जागी जो दुसरा पोलीस/पोलीस अधिकारी येईल तो असं वागणार नाही याची खात्री देऊ शकता?

ओझरे : तशी खात्री नाहीच.

प्रश्न . मग बदलीतून काय साधणार? मोर्चा काढण्यात तुमची जागरुकता दिसली तर कायम उपाययोजनेची तरतूद यात नाही.

ओझरे : कारण शासन आमच्या पार्टीचं नाही. ते आमचं ऐकत नाही.

प्रश्न : समजा उद्या केंद्र शासन, राज्य शासन सगळं कम्युनिस्ट पक्षाच आलं तर पोलीस सुधारतील, अरेरावी करणार नाहीत याची तुम्हाला खात्री वाटते?

ओझरे : नाही. असं काही म्हणता येत नाही. पण मग पोलिसाचा प्रश्नच येणार नाही. त्या त्या ठिकाणचा पार्टीचा प्रतिनिधी गावाचा प्रश्न सोडवेल.

□

अगदी लहानपणापासून नकळत श्री. ओझरे यांनी मार्क्सवादाच्या हातात हात घातला आहे. त्यानुसारच त्यांची पुढची वाटचाल सुरू आहे. आदिवासी समाजाला मदत करण्यासाठी ते त्यांच्याकडून तत्पर आहेत. शेती अपुरी असल्यामुळे विकासासाठी तलासरी भागाचे औद्योगिकरण होणे त्यांना आवश्यक वाटते. औद्योगिकरणापाठोपाठ येणाऱ्या दोषाचे कारण शासन आहे असे त्यांना प्रामाणिकपणे वाटते. मार्क्सवादी शासन आले की सर्व प्रश्न सुटू शकतील अशी त्यांची धारणा जाणवते. 'शोषण' 'पिळवणूक' या कम्युनिस्ट परिभाषेतच ते बोलतात.

आपल्या भागाच्या विकासाच्या दृष्टीने त्यांनी अधिक खोल जाऊन विचार करणे आवश्यक आहे. भारतातल्या या राज्यात कम्यु-निस्ट पक्ष सतत सत्तेवर आहे तेथे विकासाची प्रगती किती आहे, कायद्याचे राज्य कितपत चालू शकते याचे निरीक्षणही उपयोगी येऊ शकेल. कम्युनिस्ट पक्षाची सत्वर्षांची ठरीव वाटचाल चालण्यापेक्षा स्थानिक गरजा ओळखून त्या पुऱ्या करण्यासाठी हातातल्या सत्तेचा चिकाटीने उपयोग करणे आवश्यक वाटते.

(अपूर्ण)

# शब्दांचं अंगण

## स्त्रीविषयक पुस्तकं

आशा कर्दळे

जगातल्या क्रांत्यांचा इतिहास रोचक आहे. राज्यक्रांत्या, औद्योगिक क्रांत्या यांच्याप्रमाणेच सामाजिक क्रांतीची वाटचाल सध्या स्त्रीमुक्ती चळवळीच्या रूपानं सुरू आहे, असं म्हटलं तर वावगं ठरू नये. याही चळवळीचा जागतिक आणि भारतीय इतिहास रोचक आहे. या चळवळीची काही तत्त्वं आहेत आणि ती तत्त्वं जनमनावर ठसण्यासाठी वाङ्मयनिर्मिती अपरिहार्य आहे. साहित्यातला एक विशिष्ट प्रकार म्हणून त्या लिखाणाची दखल घेणं आवश्यक आहे.

सध्या ग्रंथाली, स्त्री उवाच, स्त्रीमुक्ती संघटना, प्रेरणा प्रकाशन या संस्था अशा प्रकारच्या पुस्तकांचं प्रकाशन करत आहेत. १९८२ साली 'मैत्रिणी' हे व्यासपीठ उदयाला आलं. स्त्रीजीवनाचे विविध पैलू तपासणं हे त्याचं उद्दिष्ट होतं. त्यानंतर स्त्री उवाच या गटाचा जन्म झाला. समाजात घडणारे बदल आणि त्यांचा स्त्रीजीवनावर होणारा परिणाम तपासणं, स्त्रीमुक्ती चळवळीला उपयुक्त ठरेल असं लिखाण छापणं, निरनिराळ्या व्यक्तींच्या मुलाखती घेणं, काहींना लिखाणाला उद्युक्त करणं, परकीय भाषेतल्या चांगल्या स्त्रीमुक्तीविषयक साहित्याचा अनुवाद करणं हे या गटाचं कार्य आहे.

त्या दृष्टीनं 'स्वतःला शोधताना' (घटस्फोटितांच्या कथा) हे संकलित पुस्तक हा पहिला प्रयोग आहे. स्त्रीउवाच आणि ग्रंथाली यांनी संयुक्तपणे प्रकाशित केलेलं हे पुस्तक आहे. घटस्फोट ही तशी फार नाजूक घटना. स्त्रीचं भावविश्व उध्वस्त करून टाकणारी. समाज अजूनही घटस्फोटित स्त्रीकडे स्वच्छ दृष्टीनं बघत नाही. या पुस्तकात ज्या घटस्फोटित स्त्रिया आपली कहाणी सांगत आहेत, त्यावरून निकोप सहजीवन ही किती दुर्लभ गोष्ट आहे हे लक्षात येतं. याचं कारण सामंजस्याचा अभाव. कायद्यानं मान्य केलेल्या सात कारणांखेरीज अन्य अनेक कारणं स्त्रीला घटस्फोटाला प्रवृत्त करायला लागली आहेत— ती मोठी मानसिक पीठिका आहे. प्रेमविवाह करूनही मनं का विटतात हा प्रश्न उरतोच. मन म्हणजे संशयाचं निवासस्थान. दुसऱ्या पुरुषाचा संशय आल्यानं विवाह मोडू शकतात. या ठिकाणी प्रश्न पडतो की विश्वास इतका तकलादू आणि संशय हा सर्वसाक्षी आहे का? बऱ्याचशा स्त्रिया लग्नाआधी पती आणि संसार याबद्दल काहीच विचार करत नाहीत, तो डोळसपणे करायला हवा म्हणजे स्त्रीला स्वतःच्या अपेक्षा स्वच्छ दिसत असल्यानं भंगाचं कारण बरंच कमी होईल. मुलीचं माहेर आणि नवऱ्याचे माहेरच्या लोकांशी संबंध हा तर स्वतंत्र अभ्यासाचा विषय होईल. हे संबंध बहुधा कृत्रिम, दिखाऊ, ताणलेले असेच असतात. स्त्रीनं सासरच्या सगळ्यांना जवळ करावं अशी अपेक्षा असताना नवऱ्याला ते नातेसंबंध नको असतात हा मूलभूत प्रश्न आहे वैवाहिक जीवनातला.

घटस्फोट घेतल्यानंतर पती–पत्नीचे मित्रत्वाचे संबंध आहेत असं क्वचितच आढळतं. समाजवादी देशांमध्ये घटस्फोटाचे कायदे सोपे जाणि स्त्रियांच्या फायद्याचे आहेत असं या पुस्तकात निरीक्षण आहे. 'मुलांचं कसं होईल म्हणून घटस्फोट न घेता संसारात पिचणारी स्त्री आणि उतावीळपणे लग्न जमवून तितक्याच उतावीळपणे ते मोडणारी स्त्री या दोहोंमधल्या वास्तव परिस्थितीची आज गरज आहे. त्या दृष्टीनं कुटुंब संस्थेकडून सहजीवनाकडे वाटचाल होणे आवश्यक आहे' असं छाया दातार प्रस्तावनेत म्हणतात, ते उचितच आहे.

छाया दातार यांचं 'मी तरुणी' हे छोटे लेख असलेलं पुस्तक ग्रंथालीनं प्रसिद्ध केलं आहे. स्त्रीमुक्तीचा विचार हा परदेशातून भारतात आलेला नसून याच मातीत रुजलेला आणि सामाजिक परिवर्तनातून अपरिहार्यपणे पुढे आलेला आहे असं प्रतिपादन लेखिका करते. या पुस्तकात समग्र स्त्रीजीवनाचा आढावा घेताना लेखिकेनं काही मूलभूत प्रश्न उपस्थित केले आहेत. पुरुष म्हणजे सूर्य आणि स्त्रिया म्हणजे सूर्यफूल? बाई कितीही नटली तरी हौस कोणाची फिटली? स्त्रीच्या नावे बँकेत खंडीभर पैसे जमा केले तरी तिचं मन स्वतंत्र होईल का? कायद्यानं कितीही संरक्षण दिलं तरी स्त्रीचं जिणं आश्रिताचंच का? हुंडा हा गुरगुरणारा कुत्रा असून स्त्रीची ही पद्धतशीर वाटमारी कधी थांबणार? या प्रश्नांमधून आणि त्यांच्या उत्तरांमधून स्त्रीचं पुरुषाधीनत्त्व प्रभावीपणे स्पष्ट केलं आहे. शिक्षिका, शेतमजूर स्त्री, हवाई सुंदरी (लेखिकेनं या गटाला ग्लोरिफाइड आया असं मार्मिक नाव दिलं आहे) या स्त्रीवर्गाच्या समस्यांचा निर्देश करून लेखिका परदेशी तरुणींच्या परिस्थितीची चिकित्सा करते. अमेरिकन तरुणी दुसऱ्या महायुद्धात आपल्या हक्कांच्या मागणीसाठी बाहेर पडली. एका हाताने स्वातंत्र्य देऊन दुसऱ्या हाताने ते काढून घेणाऱ्या समाजाचा दुटप्पीपणा तिला सहन झाला नाही. चिनी तरुणी थोड्या अधिक बंडखोर वागल्या. व्हिएतनामी स्त्रिया तर ९० टक्के शेतीत आहेत. जपानमध्ये वेश्याव्यवसायाविरुद्ध स्त्रीला झगडावं लागलं. प्रत्येक देशात स्त्रियांच्या समस्या आहेतच. फक्त त्यांचं स्वरूप वेगवेगळं आहे.

### स्वतःचा शोध

अशाच छोट्या छोट्या वैचारिक पण ललित अभिव्यक्ती असलेल्या लेखांचं एक पुस्तक म्हणजे विद्या बाळ यांचं 'शोध स्वतःचा.' ते श्रीविद्या प्रकाशन आहे. स्त्रीच्या आत्मतत्त्वाचा अतिशय परखडपणे यात शोध घेतला आहे. स्त्रीला 'का?' हा प्रश्न दरवेळी विचारायला उद्युक्त करणं हा या पुस्तकाचा हेतू. या पुस्तकात अशा अनेक स्त्रिया भेटतात की ज्यांच्या मनाच्या वेदना, दुःखं ही परिचित वाटतात. फार जवळची वाटतात. कधीतरी आपण अनुभवून नंतर

दडपून टाकलेल्या व्यथा या पुस्तकाच्या रूपानं पुन्हा मुखरित होतात. कष्टकरी, विवाहित, अविवाहित, वृद्ध, घटस्फोटित, बलात्कारित अशा स्त्रियांचं एक वेगळं विश्व इथं दिसतं. त्या विश्वाचं दर्शन घडवताना श्रीमती बाळ माणसामाणसामधल्या संबंधांचंही दर्शन घडवतात. त्यातून काही विचारार्ह मुद्दे उपस्थित होतात. विवाह ही स्त्रीच्या जीवनातली अपरिहार्य घटना नाही. पुरुष जर या घटनेकडे एक आनुषंगिक घटना म्हणून पाहू शकतो, तर स्त्री त्याच घटनेला अपरिहार्य का समजते? घटस्फोट ही देखील सर्वस्व संपलं, आकाश कोसळलं अशा तऱ्हेची घटना नाही. उलट एका पाश्चात्य स्त्रीचं उदाहरण देऊन लेखिका म्हणते, विवाहाची प्रतिष्ठा राखण्यासाठीच घटस्फोट असू शकतो या संबंधाची काही प्रतिष्ठा आहे की नाही?

या पुस्तकातली शेवटची दोन दीर्घ प्रकरणं फार सुरेख उतरली आहेत. त्यांना चिंतनिका म्हणावं लागेल. ती आत्मपर असली तरी कोणत्याही स्त्रीनं मानसिक बदलाचा आणि विकासाचा एक नमुना म्हणून त्याकडं जरूर बघावं.

'नाते क्रांतीचे आणि स्त्री मुक्तीचे' हे स्त्रीमुक्ती संघटनेनं प्रकाशित केलेलं संकलित लेखांचं पुस्तक आहे. त्यात शारदा साठे, गीता महाजन, अजित पाटील यांचे लेख आहेत. निरनिराळ्या देशांमधल्या स्त्रिया स्त्रीमुक्तीच्या या क्रांतीला कसा हातभार लावत आहेत, तेच स्पष्ट केलं आहे. समाजवादी देशामध्ये स्त्रीजीवनात आमूलाग्र बदल व्हायला आवश्यक तो भौतिक परिसर निर्माण झाला आहे. हा या पुस्तकाचा निष्कर्ष.सोविएत स्त्री ही नव्या युगाची नवमहिला. रशियात ५३% स्त्रिया आहेत. 'कामगार स्त्री' आणि 'शेतकरी स्त्री' ही दोन मासिकं तिथं निघतात. घटनेतील हक्कांचा प्रत्यक्षात उपयोग व्हावा म्हणून कम्युनिस्ट पार्टीनं खास व्यवस्था केली आहे. चिनी स्त्रियांची शौर्यगाथा तर गोल्ड फ्लॉवर या स्त्रीनं निनादत ठेवली. स्त्रियांना उत्पादनात सहभाग आणि वेश्या व्यवसायाचं निर्मूलन या त्यांच्या प्रमुख मागण्या आहेत. क्युबामध्ये स्त्री घरकाम उरकून सरकारी मोहिमांमध्ये जबाबदारीनं आणि हिरिरीनं भाग घेते. सामाजिक उत्पादनातला वाटा ५०% नाही ही तिची खंत आहे. आंदोलनाचा मुख्य रोख तो आहे. व्हिएतनामी स्त्री वेश्यांच्या पुनर्वसनाच्या प्रश्नात जास्त अडकली आहे कारण फ्रेंच आणि नंतर अमेरिकन सत्तेत त्या स्त्रिया भरडून निघाल्या आहेत. निकाराग्वा या छोट्याशा देशात स्पेनची गुलामगिरी सोसली पण क्रांतीत स्त्रियांचा प्रचंड सहभाग होता.

## स्त्रीमुक्ती आणि विज्ञान

'स्त्री चळवळीची वाटचाल' हे प्रागतिक पुस्तक प्रकाशनचं पुस्तक. शांताबाई भालेराव मुकर्जी या पहिल्या कामगार नेत्या महिलेला आदरांजली वाहून ही वाटचाल सुरू होते. त्यात सहभागी झाल्या आहेत कमल भागवत, मालती गाडगीळ, शांता केळकर, शांता रानडे, मालिनी तुळपुळे वगैरे. आजची स्त्री चळवळ ही एकसंध नाही. त्यात अनेक प्रवाह आहेत. मग हे आंदोलन नक्की कशाविरुद्ध? तर समाज, पुरुष, दुहेरी नीतीकल्पना,. स्त्रीचा हीनगंड या सर्वांवर प्रहार होणं जरूर आहे. स्त्रीच्या सामाजिक आणि कौटुंबिक अशा दुहेरी शोषणाविरुद्ध हा लढा आहे. हुंडा, अत्याचार, बलात्कार हे ताजे विषय आहेत. इतिहास असं सांगतो की भारतात सरंजामशाहीचा उदय झाला आणि स्त्रीला दुय्यम स्थान प्राप्त झालं. तिची कोंडी हळूहळू घट्ट होत गेली. ती फोडण्याचे प्रयत्न या शतकाच्या प्रारंभी समाज सुधारकांनी 'स्त्री दास्य विमोचन' या नावानं केले. तो स्त्री जागृतीचा कालखंड होता. रमाबाई, रखमाबाई, आनंदीबाई यांनी स्त्री जागृतीची शिखरं घडवली. कामगार लढ्यातही स्त्रियांचा सतत सहभाग होता. भारताच्या इतर राज्यामध्ये विविध स्त्री संघटनांचं कार्य कसं चालतं तेही या पुस्तकात सांगितलं आहे. बंगाल– आत्मरक्षा समिती, आंध्र–आंध्र महिला संघम, पंजाब–विमेन्स सेल्फ डिफेन्स लीग या व इतर संघटनांच्या कार्यावरून या भारतव्यापी चळवळीचं स्वरूप स्पष्ट होतं.

प्रेरणा प्रकाशननं लहान लहान बऱ्याच पुस्तिका प्रकाशित केल्या आहेत. त्यावरून या चळवळीचे विविध पैलू स्पष्ट होतात. त्यापैकी एक–स्त्री मुक्ती चळवळ–विचार भूमिका आणि मागण्या हे पुस्तक ज्योती म्हापसेकर आणि मंगल पाध्ये यांनी लिहिलेलं. भूमिका मांडताना मुख्य मागण्या दिल्या आहेत. त्यातल्या काही अशा– नोकरी हवी, समान वेतन, पाळणाघरं हवीत, स्वस्त भोजनगृहे, वसतिगृहे, देवदासी प्रथेला बंदी, बलात्काराविरुद्ध कठोर शिक्षा व्हावी वगैरे. यावरून या चळवळीचं एकूण स्वरूप कळतं. 'मराठी साहित्यातील स्त्री' या वैशाली वैद्य आणि शारदा साठे लिखित पुस्तिकेत आद्य कवयित्री महादाइसापासून स्त्रियांच्या वाङमयनिर्मितीचा मागोवा घेतला आहे आणि वा. म. जोशी, फडके, खांडेकर यांनी रंगवलेल्या नायिकांचा परामर्ष घेतला आहे. या सर्व स्त्रिया स्वतंत्र प्रज्ञेच्या होत्या. 'स्त्रीमुक्ती आणि विज्ञान' या पुस्तिकेत शारदा साठे, सुलभा महाजन, सुजाता खांडेकर यांचे लेख आहेत. विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे स्त्रीची घरकामातली शक्ती आणि वेळ वाचला, तिच्या कामाचं स्वरूपच बदललं. त्यामुळे ती घराबाहेर पडून उत्पादनातला सहभाग वाढवू शकली. 'स्त्रीमुक्ती आणि कुटुंबव्यवस्था' या पुस्तिकेत प्रमुख प्रतिपादन हे आहे की स्त्रीमुक्ती चळवळीला कुटुंबाच्या पुनर्रचनेचं राजकारण जागरूकपणे मांडावं लागतय. "क्रांतीशिवाय स्त्री मुक्त होऊ शकत नाही आणि स्त्रीमुक्तीशिवाय क्रांतीला पूर्णत्व नाही' हा युक्तिवाद चांगला स्पष्ट केला आहे. 'राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ, दलित चळवळ आणि स्त्रीमुक्ती' या पुस्तिकेत काँग्रेसने स्त्री-पुरुष समानतेची भूमिका घेतली होती हे सिद्ध करून सरोजिनी नायडू आणि ॲनी बेझंट या स्त्री–पुरुष समानतेच्या विचारातूनच राजकारणात आल्या हा पुरावा दिला आहे.

मुंबईच्या स्त्रीमुक्ती संघटनेनं प्रसिद्ध केलेलं छाया दातार यांचं 'स्त्री विमुक्ती' हे पुस्तक वाचनीय आहे. कुटुंब व्यवस्था आणि समाजरचना यांचा सूक्ष्म अभ्यास त्यामागे आहे वर्गबद्ध आणि वर्णबद्ध समाजरचनेत पुरुषही जिथं समान दर्जा आणि समान हक्क यांचा उपयोग घेऊ शकत नाही, तिथं स्त्रिया समान पातळीवर कशा येऊ शकतील? कुटुंब व्यवस्था ही सतत बदलती प्रक्रिया आहे हे इतिहास सांगतो. उद्याची कुटुंबव्यवस्था वेगळी असेल. समता आणि स्वातंत्र्य या पायावर ती उभी असेल. फ्रेंच

लेखिका म्हणते, स्त्री ही स्त्री म्हणून जन्माला येत नाही, तर संस्कारामुळे ती स्त्री बनते ! हे संस्कार बदलणं आवश्यक आहे. आर्थिक, सामाजिक आणि कौटुंबिक क्षेत्रात स्त्री दुय्यमच स्थानावर आहे हे लेखिकेनं खेदपूर्वक नमूद केलं आहे. बालविवाह, विधवाविवाह, जरठविवाह यांचा सडेतोड समाचार घेऊन लेखिकेनं सिंधू, वैदिक, आर्य संस्कृतीकाळातली तसंच शिवकालीन आणि पेशवेकालीन स्त्रीची परिस्थिती कशी होती ते सांगितलं आहे.

## कुंपण आणि आकाश

'स्त्री उवाच' या संस्थेनं प्रकाशित केलेल्या छाया दातार यांच्या 'पुरुषकेन्द्री' या पुस्तकात एक वेगळा विचार आला आहे. बंधुभाव या शब्दाप्रमाणे 'भगिनीभाव' हा शब्द सुचवून लेखिकेनं या भावनेची नितांत गरज प्रतिपादन केली आहे. कारण आपल्या समाजात आज नणंद–भावजय, जावा–जावा, सासू–सुना अशा भाडखोर जोड्या आढळतात तसंच कुमारिका, सुवासिनी, विधवा ह्या स्त्रियांमध्येच मोठा जमातवाद पसरलेला आढळतो तो नष्ट व्हायला हवा. या जमातवादाला खरं आव्हान स्त्रीमुक्ती चळवळ देऊ शकते. कारण शेवटी सगळ्या समदुःखी आहेत समान नागरी कायदा असावा, पुरुषांनी घरगुती कामं करावीत, याही आग्रही मागण्या दातारांनी केल्या आहेत. अमेरिका–युरोपमध्ये विसाव्या शतकाच्या प्रारंभी ही चळवळ सुरू झाली. मतदानाच्या हक्कासाठी स्त्री लढायला प्रवृत्त झाली, पण भारतात ही चळवळ त्याच काळात स्वतंत्रपणे वेगळ्या संदर्भात रुजली हेही आवर्जून त्यांनी सांगितलं आहे.

'कुंपण आणि आकाश' हे मंगला गोडबोले लिखित राजहंस प्रकाशनचं पुस्तक. कोणत्याही प्रकारचा अभिनिवेश न आणता स्त्रीला हरघडी पडणाऱ्या प्रश्नांची उकल साधेपणानं करण्याचा यात प्रयत्न केला आहे. पण ती उकल करता करता लेखिका चिंतनाची जी झेप घेते, ती थक्क करणारी आहे. स्त्री–पुरुष या नात्याचा इतका साकल्यानं विचार क्वचितच झाला असेल.

'पतीची आवड तीच आपली आवड असं मानून जगणाऱ्या स्त्रीला काय म्हणावं ? संसार हा एक खेळ मानला तर खेळाडू कसे तुल्यबळ असावेत त्यात मग हारण्याला अगर जिंकण्यालाही नशा असते. संसारात मात्र बाई नेहमीच कच्चं लिंबू असते. ती सुख मिळवण्यासाठी धडपडत नाही, तर सुख मानायला शिकते, बाईनंच 'माणूसपण' जपावं असं कितीजणांना वाटतं ?

लेखिकेचे हे विचार अस्वस्थ करणारे आहेत. स्त्रिया स्वतःचं आत्मपरीक्षण करून आत्मसन्मानानं जगायला शिकणार आहेत की नाही हा मूलभूत प्रश्न आहे. नुसतं अर्थार्जन करून काय फायदा ? तिचं कोंडलेलं मन मोकळं व्हायला पाहिजे. त्यासाठी तरुण किंवा प्रौढ मित्र असायला तिला लाज वाटायला नको. संपन्न व्यक्तिमत्वाचा तोही एक निकष आहे. समृद्ध मित्र परिवार असणं. त्या ठिकाणी स्त्रिया–स्त्रियांमध्ये असलेला मत्सर आधी गळून पडायला हवा. मत्सर म्हणजेच स्त्री. ही उक्ती तिनं फोल ठरवायला हवी. असं झालं म्हणजे आपण दुसऱ्या स्त्रीपेक्षा सुंदर कसं दिसू याचा विचार न करता ती तिच्या स्वतःच्या दृष्टीत सुंदर दिसण्याचा प्रयत्न करेल !

स्त्रीच्याभोवतीचे सामाजिक आणि सांसारिक संदर्भही फार महत्त्वाचे. ते तर सतत बदलत आहेत. मग तिनं स्वतःला बदलायला नको का ? संसाराचं अति स्तोम माजवून त्यालाच सर्वस्व मानणं जसं टोकाचं, तसंच संसार म्हणजे स्त्रीचं व्यक्तिमत्व संपवून टाकणारी आपत्ती हे दुसरं टोक. ही दोन्ही टोकं तिनं टाळायला हवीत. व्यक्तिमत्व ही एक विलक्षण शक्ती आहे. ती अशी इतक्या चटकन संपत नसते. उलट समृद्ध व्यक्तिमत्व आपला सगळा परिसर उजळून टाकत असतं. ते कमावण्याचा प्रयत्न स्त्री करणार आहे की नाही ? आयुष्य हे आपल्या हाती आलेलं एक साधन आहे. ते वापरून आपण आपल्या शक्ती ओळखून त्याचा दर्जेदार आविष्कार करायला हवा आहे.

स्त्रीला स्वतःकडे एका वेगळ्या दृष्टीनं बघायला हे पुस्तक शिकवतं. स्त्रीमुक्तीची चळवळ ही सध्या एका संक्रमणावस्थेतून जात आहे. विकासाच्या गतीला बांधली गेलेली स्त्री एका अशा वळणावर येईल की जिथं कुंपणं सगळी मोडून पडलेली असतील आणि असेल ते केवळ असीम आकाश ! □

---

पुस्तके

# रसिक प्रेक्षकांस सप्रेम...

---

हे पुस्तक म्हणजे रंगभूमीशी निगडित असे आत्मवृत्त आहे. आत्मचरित्र नाही.

सिने अभिनेत्री व रंगभूमीवरील अभिनेत्री या दोन्ही अंगाने लेखिकेचे काही सांगणे असेल, असे वाटले होते. पण त्यांनी फक्त मराठी रंगभूमी व त्यांचे त्यावरील काम एवढाच विचार करून त्या 'रसिक प्रेक्षकां'स भेट द्यायला येतात हे जरा खटकले. या पुस्तकात दुसरा विभाग करून त्यांच्या चित्रपटातील भूमिका, ते चित्रपट, त्यातील कलावंत (उदा. बंधन दादामुनी–अशोककुमार, किस्मत–किशोर साहू, पहिली मंगळागौर शाहू मोडक इत्यादी) त्यांचा स्वतःचा व इतर कलावंतांचा अनुभव, सिनेसृष्टी, तेथील कौशल्य (टेक्निक), सिनेसृष्टी व रंगभूमी यातील फरक, दोन्ही क्षेत्रातील कामातील फरक इत्यादीबद्दल त्यांनी लिहिले असते तर एकत्र असा ग्रंथ झाला असता. दोन्ही क्षितिजावर चमकणारी ही अभिनेत्री ही आपले स्वकथन करते आहे असे तरी झाले असते कारण लेखिकेने या दोन्ही प्रांतात आपले म्हणून स्थान निर्माण केलेले होते, आणि 'रसिक प्रेक्षक' त्यांना विसरणार नाहीत. असो

लेखिका उत्तम अभिनेत्री तर आहेच; पण त्याबरोबर उत्तम लेखिका आहे, हे तिने लिहिलेल्या पुस्तकावरून व त्यांनी लिहिलेल्या इतर पुस्तकावरून (स्नेहांकिता, पळसाला पाने तीन व सर्वस्वी तुझाच (नाटक) ) कळून येते. लिहिण्याची म्हणून त्यांची अशी एक शैली आहे आणि ती हृद्य आहे. आडपडदा न ठेवता प्रांजळपणे, प्रामाणिकपणे आणि पोटतिडकीने त्या सांगतात असे या पुस्तकावरून वाटते.

या पुस्तकात 'झुंजारराव', 'राणीचा बाग' 'लग्नाची बेडी' आणि 'संशय कल्लोळ' या नाटकांचाच विचार त्यांनी केला आहे. कारण त्यांनी या चार नाटकात प्रमुख भूमिका केल्या आहेत. त्या भूमिका

करताना नाटकाचे लेखन व प्रायोगिकदृष्टचा जे विचार आले, ज्या काही बऱ्यावाईट घटना, प्रसग आढळले त्या दृष्टिकोनातून तिला स्वत.ला असलेला अभिप्रेत व नाटककार व दिग्दर्शक याना असलेला अभिप्रेत (अभिनय वगैरच्या दृष्टीने) याचे जाता जाता तुलनात्मक विवेचन केले आहे. त्या विवेचनातील मुद्दे रसिक प्रेक्षकांस सर्वस्वी मान्य होतीलच असे नाही. काही ठिकाणी नाटकाची कथा सांगण्याअगोदर त्यांचे स्वकथनही आढळते. (उदा. झुजारराव लेख)

या चारी नाटकाच्या लेखात त्यानी नाटकाची कथा (अक, प्रवेश, सवादासह) प्रथम सागितली आहे; पण ती सागितली नसती तरी चालले असते. कारण बहुतेक रसिक प्रेक्षकांना ती नाटके माहिती आहेत. कदाचित लेखिकेचा असा विचार असेल की ज्यांनी (विषेषत: नव्या पिढीतील कलाकार व रसिक प्रेक्षकाना) ही नाटके पाहिली नसतील, वाचली नसतील त्याना कळावे.

शेवटी 'समारोप' मध्ये 'भावबधन', 'मला काय माहीत', 'सर्वस्वी तुझाच'; 'अस्ताई', 'साक्षीदार' या पाच नाटकाचा गोषवारा दिला व या नाटकात ज्या त्यानी भूमिका केल्या त्याचेही थोडक्यात विश्लेषण आहे. येथेही त्यानी जाता जाता त्याची काही मते व अनुभव सागितले आहेत.

'उजळणी' या परिशिष्ट वजा लेखात नटाने अगर नटीने कसे असावे, कसे वागावे, कसा त्यावा अभ्यास असावा वगैरेबद्दल उपयुक्त सूचना दिलेल्या आहेत.

उजळणीमध्ये लेखिका लिहिते—'रगभूमी काय किंवा चित्रपट काय दोन्ही सृष्टीत बरे वाईट अनुभव नवोदिताचा पाठलाग करीत असतात' अभिनय कलेच्या दृष्टाने लेखिकेचा पाठलाग कसा आहे याचे विवरण या पुस्तकात दिसते. (मर्यादेच्या चौकटीत)

प्रस्तावनेत दिग्दर्शक, आवाजाचे चढउतार अभिनय आणि कलाकार, कलाकाराचे अवलोकन कसे असावे, त्याची रगभूमीवरील हालचाल यासंबधी त्यानी सूचना वजा विवेचन केले आहे. इतकेच नाही तर या पुस्तकात दिलेल्या विश्लेषणाच्या मदतीने हौशी व महत्त्वाकांक्षी कलाकाराला अभ्यासाची दिशा नक्कीच सापडेल.

पुस्तकात उल्लेखलेली नाटके व त्यात त्याच्या भूमिका असलेले फोटो दिल्यामुळे ती एक चागली गोष्ट झाली. मुखपृष्ठही चागले झाले आहे.

पुस्तकात घेतलेल्या नाटकांचे विवेचन करताना लेखिकेने जर दिग्दर्शक व त्याचे दिग्दर्शन, आजूबाजूचे कलावत व त्यांचा अभिनय (उदा झुजाररावमध्ये कै. बाबुराव पेंढारकर व कै. नानासाहेब फाटक याच्या अभिनयातील फरक) त्याना तो कितपत पोषक वाटला तसेच श्रीपाद जोशी, अविनाश नदकुमार रावते, बाळकराम याच्याबद्दलही विस्ताराने लिहिले असते तर ते अभ्यासाच्या दृष्टीने उद्बोधक झाले असते. दिग्दर्शक श्री. मो ग. रागणेकर, श्रीपाद जोशी, बाळकराम याच्याबद्दल लिहिले आहे; पण ते फारच त्रोटक वाटते.

मराठी नाटच इतिहासाच्या रकान्यात या पुस्तकाचे स्थान राहील.

—वसंत फाटक

रसिक प्रेक्षकास सप्रेम
स्नेहप्रभा प्रधान
पॉप्युलर प्रकाशन
पृष्ठे १६ + १७२, किंमत ६० रु.

# ह. भ. प. पांगारकरांचे स्मृतीधन

रघुपती भट्ट

ह. भ. प. पागारकर मराठी भाषेच्या सेवेमुळे सर्वांना माहिती आहेतच. मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचे त्यांचे दोन खड सदर्भग्रंथ म्हणून सर्वमान्य आहेत. सारस्वतकारापेक्षा पागारकराना अधिक साधने उपलब्ध झाली होती. 'महाराष्ट्र सारस्वत' आणि भावे याच्यानतर पागारकर आणि त्याचा इतिहास. भावेंना बरीच माहिती मिळू शकली नव्हती. तुळपुळेंच्या पुरवणीने ते स्पष्ट होतेच पागारकराच्या इतिहासाचे आणखी एक वैशिष्ठय म्हणजे पागारकराची भाविकता. इतिहास लिहिताना भावे आणि पागारकर या दोघाचेही कस वेगळे आहेत. दासोपताबद्दल लिहिताना भावे आणि पागारकर या दोघानी वेगवेगळे लिहिले आहे. पांगारकर अत्यत भाविक होते आणि त्याच्या इतिहासलेखनात किर्तनकारांचा जिव्हाळा आणि गोडवा भरलेला आहे.

मराठी सतकवीच्या रचनांचा अभ्यास करण्यासाठी पागारकरांनी अपार कष्ट घेतले. मोरोपंत, तुकाराम, ज्ञानेश्वर याची चरित्रे पांगारकरांनी प्रत्येक सताच्या जन्मगावी जाऊन, सबधित हस्तलिखिते, कागदपत्रे याची कसून छाननी करून लिहिली आहेत. या चरित्राची हिंदी आणि गुजराथी भाषांतरेसुद्धा प्रसिद्ध आहेत. सतकवीचे चरित्र आणि काव्य कामगिरी याबद्दल पांगारकरानी अगदी भरपूर लिहून ठेवले आहे.

सतचरित्र, सतकाव्य टीका आणि मराठी वाङ्मयाचा इतिहास लिहिणाऱ्या पागारकरांनी आपलं आत्मचरित्रही लिहिलंय आणि हे आत्मचरित्र अत्यंत वाचनीय आहे संतांच्या कविता, अभंगादी मिळवण्यासाठी पांगारकरांनी किती कष्ट घेतले याची माहिती तर त्यात मिळतेच पण त्याशिवाय पांगारकरानी समकालिनाची सुदर व्यक्तिरेखाही त्यात चितारलेल्या पाहायला मिळतात पांगारकरानी स्वत च्या या सुदर आत्मचरित्राला 'चरित्रचंद्र' अस नाव दिलय. सूर्याच्या प्रकाशाने चद्र जसा प्रकाशतो तसं आपलं आयुष्य सतचरित्राच्या अभ्यासान उजळून गेलय असं त्याचं मत आहे.

पांगारकरानी १८८६ साली न्यू इग्लिश स्कूलमध्ये नाव घातले. या शाळेत अनेक मोठी माणसे शिकवित होती. पागारकराना 'युक्लिड' अवघड जात होते. वर्गात दहा सिद्धात झाले तरी त्याना काही कळले नाही. आपल्याला हा विषय काही जमणारच नाही असं त्याना वाटू लागलं होतं. एक दिवस युक्लिडचे शिक्षक आजारी पडले.

त्या दिवशी सातवीला शिकवणारे एक शिक्षक पागारकरांच्या पाचवीच्या वर्गावर

झाले. 'किती सिद्धांत झाले?' त्यांनी विचारले. 'दहा' उत्तर मिळाले. मग त्या शिक्षकांनी पहिल्या गृहितकृत्यापासून सुरुवात केली आणि सगळा वर्ग गुंगवून टाकला. एका तासाच्या आत त्यांनी ते दहा सिद्धांत अगदी कुशलपणे समजावून दिले. त्या शिक्षकाच्या शिक्षण पद्धतीमुळे पांगारकरांना त्या दिवशी सगळे समजले. लिमये मास्तर जे त्यांना तीन महिने शिकवत होते ते या शिक्षकांनी एका तासात शिकवले. त्यामुळे पांगारकरांना ते शिक्षक नेहमी यावेत असं वाटत राहिलं.

ते शिक्षक म्हणजे लोकमान्य टिळक.

प्रो. गोपाळकृष्ण गोखले इंग्रजी शिकवीत असत. त्यांचे इंग्रजी पाठांतर 'भयानक' होते. मेकाले, मिल्टन, बर्क, ग्लॅडस्टन, ब्राईट वगैरे त्यांना तोंडपाठ होते. इंग्रजी भाषा त्यातील शब्द आणि म्हणी गोखल्यांमुळे चांगल्या समजत असत. त्यांचा चेहरा मोहक होता. ते तयारी करून परीक्षेच्या दृष्टीने उपयुक्त शिकवित असत.

'त्राटिका' नाटकाचे कर्ते वासुदेवराव केळकर हेसुद्धा पांगारकरांना शिकवित होते. केळकरांचा चेहरा भव्य आणि रुबाबदार होता. गोखल्यापेक्षा त्यांच्या शिकवण्यात 'बुद्धिमत्ता, सहृदता, मार्मिकता आणि रसिकता' अधिक असे. केळकरांनी एकदा तोंड उघडले की विद्यार्थी तल्लीन होत. ते घरी तयारी करून कधी येत नसत. कोणता भाग शिकवायचा आहे हे विचारून मगच त्यांची सुरुवात असे.

आगरकर सदैव आनंदी असत; पण त्यांना दम्या-खोकल्याचा त्रास होता. जिना चढून वर्गात आल्यावर खोकल्याची उबळ येऊन त्यांची चार-पाच मिनिटे दमछाक होई. ते मुलांना कधी रागावत नसत. कॉलेजमध्ये लॉजिक शिकवित. त्यामुळे मुलांबरोबर वाद घालणे त्यांना बरे वाटायचे. त्यातूनच मुलांना वादाच्या वेगवेगळ्या पद्धती ते शिकवायचे. ते नास्तिक होते त्यामुळे आस्तिक पांगारकरांशी त्यांचा नेहमी वाद चाले.

लोकमान्य टिळक शाळेच्या शिस्तीला फारसे जुमानत नसत. ते बहुतेक घंटा झाल्यावर पंधरा मिनिटांने येत आणि दुसरी घंटा झाल्यावर पंधरा मिनिटांनी सोडायचे. 'एखादे उदाहरण सुरू झाल्यावर ते मधूनच सोडून द्यायचे हे मला मान्य नाही' असं त्यांचं म्हणणं असे. पण त्यामुळे शाळेचे वेळापत्रक विस्कळित होऊन जाई.

शाळेला शिस्त लावणारे वा. शि. आपटे हे मनाने खूप चांगले होते. एक प्रसंग पांगारकरांनी दिलाय. एकदा एका वर्गात मुलांनी दांडगाई करून बाके मोडली. तेव्हा वर्गशिक्षकांनी सर्वांना छड्या मारल्या. वा शि. ना हे समजले तेव्हा त्या मास्तरना बोलवून ते म्हणाले,

'मास्तर! तुम्ही मुलांना व्यर्थ मारलेत.' अहो मुले ही दांडगाई करणारच! त्यासाठी आम्ही शाळेत तीन सुतार कायम ठेवले आहेत. आम्हाला आमची मुले शेळ्यामेंढ्यासारखी बुळचट व्हायला नको आहेत!

आपटे यांनी 'संस्कृत कोश' लिहिला होता. ते 'पस्तिशीच्या आत सर्वांना चटका लावून गेले.' ते अकाली मरण पावले.

## भाषणे आणि वक्ते

फर्ग्युसन कॉलेजमध्ये डिबेटिंग क्लब होता. एक शनवार इंग्रजीला द्यावा आणि एक मराठीला द्यावा अशी सूचना पांगारकरांनी केली. त्यावेळी आर. पी. परांजपे यांनी प्रतिपक्ष केला. 'इंग्रजीशिवाय दुसरी भाषा उपयोगात आणू नये.' बरीच वादावादी होऊन शेवटी पांगारकरांची सूचना मान्य झाली. परांजपे (रँग्लर) जाता जाता म्हणाले- 'पांगारकर! जगात मूर्ख अधिक असल्यामुळे तुम्हा आज विजय झाला आहे.'

फर्ग्युसनला असताना पांगारकर लिहू लागले. भाषणे देऊ लागले. उत्तम लेखक म्हणून त्यांची ख्याती होऊ लागली. खुद्द टिळकांनाही त्यांचे कौतुक वाटे. विंचुरकरांच्या वाड्यात खुद्द टिळकांनी त्यांना गणेशोत्सवानिमित्त व्याख्यानासाठी बोलवले होते. या वक्तृत्व आणि लेखनाच्या भरात पांगारकरांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष झाले आणि ते बी. ए. ला नापास झाले. प्रो. जिन्सीवाले त्याबद्दल त्यांना फार बोलले. टिळकसुद्धा नाराज झाले असं त्यांना कळलं. पुढे प्रयत्न करून पांगारकरांनी शिक्षकाची नोकरी पत्करली.

त्यावेळची एक आठवण. टिळक आणि गोखले वाद अगदी शाळा-कॉलेजातूनही गाजत होता. बहुतेक मुलांचा ओढा टिळकेपक्षाकडे असे. दापोलीला ३० रु. पगाराची एक नोकरी होती. गोपाळकृष्ण गोखलेंच्या चिठ्ठीने ते काम सहज झाले असते. पण गोखल्यांनी पत्र द्यायचे नाकारले. पांगारकरांचा ओढा टिळक पक्षाकडे आहे हें त्यांना माहिती होते आणि त्यांनी ते स्पष्ट सांगितलेही. गोखले मनाचे कोमल होते. पांगारकरांसारख्या होतकरू विद्यार्थ्यांकडे त्यांचे चांगले लक्ष असे. त्यांचे प्रेमही होते. पण पक्षाभिनिवेश मोठा होता. टिळक पक्षाच्या माणसाला का म्हणून चिठ्ठी द्यायची? मोठ्या माणसांच्या या लहान गोष्टी पाहून आपल्याला फार आश्चर्य वाटते असं पांगारकर लिहितात.

पुण्यामध्ये होणारी भाषणे आणि वक्ते यांच्या काही गमती पांगारकरांनी दिल्या आहेत

रानड्यांची भाषणे भारदस्त असत. एकदा त्यांनी भाषणात पाश्चात्य विचार, आचाराबरोबर आपण गेल पाहिजे असा युक्तिवाद केला. यावर टिळकांनी पाश्चात्य ओघाला आपण प्रतिबंध केला पाहिजे असा प्रतिहल्ला चढवला. गोखले हे उत्तम वक्ते होते; पण ते मराठीत कधी फारसे बोलले नाहीत. 'टिळक प्रथम अडखळत, कधीकधी कर्ताक्रियापदाची गाठ पडायची मारामार' पण टिळकांची उत्कट देशभक्ती आणि विचारांचा तेजस्वीपणा यामुळे ते विलक्षण छाप पाडून जात पुढे पुढे त्यांच्यातही उत्तम वक्तृत्व तयार झाले.

माधवराव कुंटे हे प्रभावी वक्ते होते. विनोदी शब्दरचना वापरून ते भाषणात मजा आणत. डॉ. भांडारकर, प्रो. भानु, डॉ. गर्दे हे मनोरंजक आणि बोधप्रद व्याख्याने करीत; पण रानडे, टिळक आणि जिन्सीवाले हे पुण्याच्या गळ्यातले ताईत होते. प्रो. जिन्सीवाले हे धार्मिक आणि ऐतिहासिक भाषणातून श्रोत्यांची मने हादरवून सोडत. आपल्या प्राचीन संस्कृतीचा अभ्यास आणि अभिमान यामुळे दुसऱ्यांची मते बदलण्यात ते यशस्वी होत. डॉ. विश्राम घोले यांनी मूर्तिपूजकांची निंदा केली आणि प्रो. भानु यांनी 'द्रौपदित्व' हा शब्द कुत्सितपणे वापरला तेव्हा 'आपल्या विद्वतेचा आणि वक्तृत्वाचा पाऊस

पाडून' प्रो. जिन्सीवाले यानी या दोघाना 'पदर पसरून माफी मागायला लावलेले आम्ही पाहिले आहे.' अस पागारकर लिहितात.

एक मिशनरी पेटीकॉस्ट पुण्याला व्याख्यानासाठी आले. शास्त्रीय ज्ञानाने परिपूर्ण, वक्तृत्व अगाध पण आभार मानताना न्या. रानडे यानी सात दिवसाच्या त्यांच्या ज्ञानसत्रावर पाणी फिरविले. ते म्हणाले,

'हिंदुस्थानात आमची राजसत्ता नाही, व्यापार नाही, शेती नाही, शास्त्रीय ज्ञान नाही. आम्ही सर्व बाबतीत पोरके राष्ट्र आहोत. या सर्व गोष्टी आम्हाला परदेशातून आयात केल्या पाहिजेत; पण हिंदुस्थानाजवळ एक अलौकिक चीज आहे आणि ती म्हणजे अध्यात्मज्ञान. हे आमच्याजवळ इतके भरपूर आहे की, ते जगातील सर्व राष्ट्राना आम्ही कित्येक शतके निर्यात ( Export ) करू शकू. आम्हाला या बाबतीत इतर राष्ट्राच्या तोंडाकडे पाहण्याची गरज पडणार नाही.'

केरोपत छत्रे हे नास्तिक होते. पागारकरानी त्याच्याबद्दल खूप ऐकले होते सत्शील स्वभावाचे केरोपत, त्यांचा सगळा पगार म्हणजे रुपये बाराशे, लोककल्याणार्थ खर्च करीत असत. केरोपंताचे शिष्य गोपाळराव आगरकर यानी डोळयात पाणी आणून केरोपंताविषयी विद्यार्थ्यांना सागितले होते.

पण पागारकरांना आण्णासाहेब पटवर्धन यानी केरोपंताची सागितलेली आठवण अत्यत मार्मिक आहे.

एकदा रात्री बराच वेळ केरोपंत आणि आण्णासाहेब बोलत बसले होते. नतर दोघेही झोपण्यासाठी म्हणून लवडले. केरोपताच्या पुटपुटण्यामुळे आण्णासाहेब उठून बसले. केरोपत काय पुटपुटत आहे हे त्यानी विचारले.

विष्णुसहस्रनाम ! केरोपंत उत्तरले.

आण्णासाहेब थक्क झाले नास्तिकाच्या तोंडात विष्णुसहस्रनाम ? केरोपताचे स्पष्टीकरण फार मोकळया मनाचे होते. त्याच्या आजीने त्याच्याकडून दिवसातून कधीतरी पंधरा मिनिटे विष्णुसहस्रनाम म्हणण्याचे वचन घेतले होते. केरोपत म्हणाले,

'देव कोणी असलाच तर ही माझी सेवा त्याच्या घरी रूजू होईल. नसलाच तर रोज पंधरा मिनिटे फुकट गेली असे होईल; पण २४ तासात कितीतरी तास आमचे फुकट जातात. त्यात १५ मिनिटे गेली म्हणून काय नुकसान आहे ?'

पागारकराना संताचे आणि सतप्रवृत्ती माणसाचे फार आकर्षण होते उमरावतीला शिक्षक म्हणून काम करताना प्रसिद्ध संतकवी 'गुलाबराव महाराज' याचा त्यांना सहवास घडला. अंध गुलाबराव महाराज प्रज्ञाचक्षू होते ते उत्स्फूर्तपणे ओव्या रचत असत. त्याना प्लेटो, आरिस्टॉटल, डिसकार्टस, हेगेल, मिल्ल आदी पाश्चत्य तत्त्वज्ञांचे वेदाताबरोबरच विवरण करता येत असे.

श्रीकृष्ण पती, ज्ञानेश्वर तात आणि आपण स्वत: गोपी अशी त्याच्या उपासनेची तऱ्हा होती. पांगारकर महाराजाच्या मर्जीत बसले म्हटल्यावर शिष्यांनी त्याना कानात सागितले महाराजाना नाव घ्यायला सांगा. आणि पागारकर म्हणाले, 'महाराज ! नाव घ्यायचे.'

'झालं ! महाराजाची मुद्रा एकदम चौदा वर्षाच्या नुकत्या लग्न झालेल्या मुलीसारखी सलज्ज झाली ! ते लाजणें, ते मुरडणे, तो सकोच, तो पोटस्थ आनंद, गुरुजनांनी आग्रह करावा अशी ती अनिर्व्याज हौस. सर्व काही मुग्ध कन्यकेचे कोमल व मधुर विकार महाराजानी पंधरा मिनिटे आपल्या मुद्रेत आणि हावभावात दाखवले की ही जातिवत मुलगी नाही असे कोणाला पळभरही वाटले नाही !'

## प्रभावी व्यक्तिचित्रे

काही अप्रसिद्ध पण पागारकरांना इतिहाससशोधनात मदतीस आलेली, अशा माणसांचीसुद्धा पांगारकरानी सुरेख व्यक्तिचित्रे दिली आहेत.

मोरोपताचे 'हरीश्चंद्राख्यान' त्याना एका वैद्याकडून सप्रेम भेट मिळाले. हा कोल्हापूरचा वैद्य स्वभावाने अत्यंत विक्षिप्त आणि तामसी होता. पण वरकरणी कठोर दिसणारा अंतर्यामी मृदु असल्याचा साक्षात्कार पागारकराना झाला. पागारकराना त्याने तिष्ठवले, आर्यांचा अर्थ विचारला आणि पांगारकर खरेखुरे मयुरभक्त आहेत अशी खात्री झाल्यावर पंताच्या हस्ताक्षरातील हरीश्चंद्राख्यान त्याने पागारकरांना बक्षीस दिले.

पंताचा कवितासंग्रह पंताच्या घराण्यातील श्रीमती तानुबाई याच्याकडे होता. तो वाचायला मिळावा म्हणून पांगारकरांनी ४।६ महिने खटपट केली. पण तानुबाई आज उद्या करीत राहिल्या. त्याच्या घरी येणाऱ्या दोघानी त्याचे कान फुंकले होते. पंढरपुरात पंताचे निकटवर्ती काशिनाथ बाबा याची वयोवृद्ध सून राधाबाई राहात होत्या. त्याच्याकडे पागारकर जात. त्याच्या बोलण्याची पागारकर टाचणे ठेवीत, कारण पंतांच्या अनेक कथा त्याना ठाऊक होत्या. पागारकराना त्या मुलाप्रमाणे मानीत. त्यांना पागारकरानी सागित लेकी, त्याना तानुबाई पोथ्या देत नाहीत. म्हातारी लगेच पांगारकराना घेऊन तानुबाईकडे गेली आणि सगळया पोथ्या पागारकराना वाचायला मिळाल्या.

पागारकरांचे हे आत्मचरित्र केवळ व्यक्ती रेखाचित्रे पाहण्यासाठी नव्हे तर एका कालखंडाचे ओघवते वर्णन वाचण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. यातील गोष्टी जुन्या वाचकाना कदाचित् शिळया वाटतील. पण नव्या पिढीच्या दृष्टिकोनातून त्या टाईममशिनप्रमाणे मोलाच्या आहेत. पागारकर राजकारणापासून अलिप्त राहिले व्यासंग आणि सशोधनाचा मार्ग त्यानी चोखाळला आणि आपल्या क्षेत्रात आपल्या परीने त्यानी चोख काम केले. महाराष्ट्राच्या सास्कृतिक

**सुरुवातीचे पान**

**ह. भ. प. ल. रा. पांगारकर यांचे आत्मचरित्र**
**'चरित्रचंद्र'**
**म्हणजेच**
**पांगारकरांचे आत्मचरित्र**
**ग्रंथकार**
**लक्ष्मण रामचंद्र पांगारकर**
**नाशिक नगर.**

परंपरेचा झेंडा फडकवत ठेवण्याची त्यांची ही कामगिरी आहे.

पांगारकराच्या आत्मचरित्रात युक्तीने तुरुंगात जाणारे लोकमान्य भेटतात. समाजसुधारक आगरकराचे अंतरंग कळते, गोखल्यांचा पक्षाभिनिवेश कळतो. वा. शि. आपट्यांच्या शिस्तीचे दर्शन घडते. पन्नास वर्षांच्या कालखंडाच्या चित्रणामध्ये ना. सी. फडक्याचे वडील सीतारामपत फडके भेटतात तर मध्येच सारस्वतकार भावेसुद्धा वर्णी लावून जातात.

आणि पागारकरांच्या संतसाहित्याच्या अभ्यासामुळे महाराष्ट्राची दैवते ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ, निरंजनमाधव आणि मोरोपत यांचेही पुसटपुसट दर्शन या आत्मचरित्रात घडतेच.

पांगारकरांच्या भाषेत–

'हे एका व्यक्तीचे चरित्र असले तरी यात महाराष्ट्र समाजाचा अर्धशतकाचा इतिहास सापडेल' कोणाचे मन दुखावू नये म्हणून त्यांनी बऱ्याच सत्यकथा टाळल्या आहेत. ते म्हणतात,

'या चरित्रात सत्यसृष्टीतील अनेक स्वभावचित्रे दिसतील. नाना प्रसंग आणि त्यातून पार पडण्याचे उपाय सुचतील, येथे साधुसंतांची दर्शने होतील, काव्याचे मनोहर साद ऐकू येतील, सृष्टीसौदर्य भोगायला मिळेल, मराठी भाषेचे व वाङमयाचे शुद्ध स्वरूप दिसेल, आपल्या राष्ट्राच्या व संस्कृतीच्या उद्धाराची तळमळ दिसेल, विद्वानांचा समागम घडेल व भाविक व प्रेमळजन भेटतील.'

एके ठिकाणी पांगारकर मराठी भाषेचा आपला अभिमान टोकाला नेऊन म्हणतात,

'सर्व हिंदू लोकांची एक संस्कृती आहे आणि तिचाच जयजयकार झाला पाहिजे. हिंदी भाषा व्यवहाराच्या सोयीसाठी राष्ट्रभाषा समजली गेली तरी महाराष्ट्राची राष्ट्रभाषा (?) मराठीच राहिली पाहिजे. शक्य तर तीच हिंदुस्थानची भाषा झाली पाहिजे.'

हिंदी, इंग्रजीचा वाद वालीत बसणाऱ्यांना पागारकराचे हे चोख उत्तर आहे की नाही ?

□

# रंगभूमी : १९८५–अधिक उणे

१९८५ या वर्षात तीस ते पस्तीस नाटके नव्याने रंगभूमीवर आली. काही जुन्या नाटकांना उजाळा मिळाला. नव्या नाटकामध्ये प्राधान्याने एक गोष्ट ध्यानात येते की, निम्म्याहून अधिक नाटके प्रहसनात्मक आहेत. उरलेली गंभीर स्तरावरची आहेत. सगीत नाटकाचे प्रमाण अत्यल्पच आहे.

विनोदी, फार्सिकल, किंवा प्रहसनात्मक नाटकांमध्ये करून करून भागले (अनिल सोनार), 'कार्टी प्रेमात पडली' (रत्नाकर मतकरी), 'तिच्याकडे आहे म्हणून' (अशोक पाटोळे), 'वात्रट मेले' (गवाणकर) 'बायकोला जेव्हा जाग येते' (सुभाष भेंडे), 'सभव असभव' (अनु. शोभा प्रधान), 'चल आटप लौकर' (अनु. विवेक लागू), 'पोलीसनामा' (शफाअतखान), 'मामला चोरीचा' (वसत सबनीस) इत्यादींचा सहजपणे उल्लेख करता येईल.

ह्या आणि अशा काही प्रहसनात्मक नाटकाची निर्मिती सख्यात्मक पातळीवर बरीच झाली असली तरी गुणात्मक पातळीवर त्यातली अपवादात्मकच आहेत. किंवा दुसऱ्या पद्धतीने सांगायचे तर प्रेक्षकाना आवडतात म्हणून खास तशी नाटके निर्माण करूनही सर्वांनाच तो प्रतिसाद लाभला नाही. या नाटकात सर्वात लक्षवेधी ठरले ते मतकरीचे 'कार्टी प्रेमात पडली' हे नाटक. लेखनाबरोबरच दामू केंकरे याचे दिग्दर्शन तितकेच महत्त्वाचे होते. लक्ष्मीकात बेर्डे जसे या नाटकाचे आकर्षण, तसेच वर्षा उसगावकर ही औरंगाबादच्या नाट्यशास्त्र विभागात शिकून आलेली कलावती व्यावसायिक रगमचावर मान्य झाली. इतर नाटकाना कमीजास्त यश मिळाले. 'मामला चोरीचा' हे शरद तळवलकरांच्या अभिनयाने आणि केंकरेंच्या दिग्दर्शनाने प्रयोगाची संख्या चागली गाठू शकले. त्याचबरोबर हेही लक्षात येत होते की, विनोदी नाटकाशी संबधित असे मोहरे खर्ची घालूनही यातली काही नाटके मोठ्या प्रमाणात तरली नाहीत. त्यांचे अंदाज चुकले !

विनोदी, प्रहसनात्मक नाटकाची मागणी आणि निर्मिती वाढली असली तरी गंभीर विषयाची हाताळणीही तितक्याच जाणिवेने झालेली दिसते. वसंत कानेटकराचे 'वादळ माणसाळतंय', मतकरीचे 'सत्ताध', एलकुंचवाराचे 'वाडा चिरेबंदी', शेखर ताम्हाणेंचे 'सविता दामोदर पराजपे', मंगेश कुलकर्णींचे 'आई शप्पत', वसत कामताचे 'उडुनी जा पाखरा', गज्वीचे 'तनमाजोरी' समेळचे 'पिंजरा', तेंडुलकराचे 'विठ्ठला' दिलीप खाडेकराचे 'कळत नकळत', लतेश शहाचे 'चीत्कार' इत्यादी नाटके सागता येतील.

या नाटकांमध्ये एक गोष्ट प्रथमदर्शनी जाणवते की यातली स्वतंत्रपणाने लिहिलेली नाटके कमी, याउलट भाषातरित, रूपांतरित, आधारित अशा नाटकाचे प्रमाण अधिक. उदाहरणार्थ 'सत्ताध' हे मतकरींनी 'रिस्पेक्टेबल प्रॉस्टीट्यूट' वरून घेतले आहे, 'आई शप्पत' हे मगेश कुलकर्णींने 'शबाना टू' वरून घेतले तर 'पिंजरा' हे समेळने हिचकॉकच्या 'सायको' वरून घेतले या सर्वात उजवे आणि अनेकार्थाने उजवे ठरले ते म्हणजे 'उडुनी जा पाखरा'. 'वन फ्ल्यू ओव्हर कक्कूज नेस्ट' वरून वसंत कामतानी हे नाटक रूपांतरित केले. एका मनोरुग्णालयात घडणारे हे नाटक केवळ तिथल्या रुग्णांविषयीच आपल्याला सागत नाही तर मानवी मनाविषयी, जीवनाविषयी खूप खोलवर सांगून जाते. 'आई शप्पत' चे रूपांतर चागले असले तरी त्यातले विषय–आशयातले परकेपण सतत जाणवत राहते. अभिनयाच्या सदर्भात सांगावयाचे तर 'आई शप्पत' मध्ये नाना पाटेकर, 'चीत्कार' मध्ये सविता प्रभुणे, 'सविता दामोदर' मध्ये रीमा लागू, 'पिंजरा' त अशोक समेळ विशेष स्मरणात राहिली.

स्वतंत्रपणाने लिहिलेली 'विठ्ठला', 'वादळ माणसाळतंय', 'तनमाजोरी' 'वाडा

चिरेबंदी' इत्यादी नाटके ज्या प्रमाणात प्रेक्षकांपर्यंत पोहोचायला हवी होती तितक्या प्रमाणात पोहोचली असे दिसत नाही. कदाचित या वर्षात त्यांचे आणखी काही प्रयोग होतीलही! कारण गज्वींचे 'तनमाजोरी' नुकतेच, म्हणजे वर्षाखेरी रंगभूमीवर आल्याने त्याचे भवितव्य अद्याप ठरायचे आहे. त्यातला नाना पाटेकरचा अभिनय पाहणे हा आनंदाचा–अनुभवाचा भाग आहे. महेश एलकुंचवारांचे पहिले व्यावसायिक नाटक 'वाडा चिरेबंदी' विजया मेहतानी केले. लेखन, दिग्दर्शन, अभिनय आणि एकूणच नाट्यनिर्मितीच्या संदर्भात हे नाटक प्रथम श्रेणीचे आहे. मात्र त्याला मिळणारा प्रतिसाद अल्पच ठरला. केवळ एका वाड्याचे उध्वस्त होणे एवढ्यापुरतेच ते नाटक मर्यादित नव्हते तर जीवनमूल्यांसंबंधी भाष्य करणारे होते. बाबा आमटे यांच्यासारख्या लोकोत्तर व्यक्तीच्या जीवनावर वसंत कानेटकरांनी नाटक लिहून यशवंत दत्तसारख्या गुणी अभिनेत्याने काम करूनही हे 'वादळ' शांततेतच संपले.

## संगीत नाटके कमी

नवी नाटके रंगभूमीवर आणण्याचा जसा काहींना हव्यास असतो तसा जुन्या नाटकांना उजाळा देण्याचा, नवे रूप देण्याचा छंद असतो. त्यामध्ये व्यावसायिक दृष्टी महत्वाची असतेच. अशी पुनरुज्जीवित झालेली या वर्षातील नाटके म्हणजे 'बेइमान', 'महंत', 'पती गेले ग काठेवाडी', 'काचेचा चंद्र', 'मला उत्तर हवंय', 'मोरूची मावशी' इत्यादी. यापैकी दोनच नाटकांनी प्रयोगसंख्या आणि प्रेक्षकमान्यता यामध्ये आघाडी ठेवली ती म्हणजे 'बेइमान' आणि 'मोरूची मावशी' यांनी. 'बेइमान'मध्ये थोडेफार बदल करून मधुकर तोरडमलांनी भूमिका आणि दिग्दर्शन करून उत्तम प्रयोग पेश केला. 'मोरूच्या मावशी' संबंधात नव्याने लिहिण्याचे कारण नाही, पण विजय चव्हाणचा सहज अभिनय आणि दिलीप कोल्हटकरचे नेमके दिग्दर्शन महत्वाचे ठरले!

संगीत नाटकांची निर्मिती दिवसेंदिवस क्षीण होत चालली आहे. पारंपरिक अर्थाने संगीत नाटके म्हणावी अशी दोनच नाटके आली– गो. नी. दांडेकरांचे 'सं. मंदोदरी' आणि विद्याधर गोखल्यांचे 'सुंदरा मनामध्ये भरली'. या व्यतिरिक्त संगीतकाच्या रूपात रत्नाकर मतकरींचे 'तुमचे आमचे गाणे', अरूण साधूचे 'पडघम' आणि विक्रम भागवतचे 'अफलातून' ही नाटके. यामध्ये 'मंदोदरी' एक स्त्री-विषयक विचार घेऊन माफक संगीताच्या आधारे पेश झाले. तर 'अफलातून' हे 'वेस्ट साईड स्टोरी'चे रंगरूप घेऊन युवाजीवनाचे चित्र रंगवून संगीतातून व्यक्त झाले.

प्रायोगिक नाटकाच्या संदर्भात विविध ठिकाणी प्रयत्न चालू असतात. स्पर्धेच्या निमित्ताने विशेष. त्यातील काही प्रयोग स्वतंत्रपणाने केले गेले. यामध्ये ड्रॉर्पचे 'मुंबईचे कावळे', जागरचे 'अभिहत', थिएटर अॅकॅडमीचे 'प्रलय', कामगार कल्याणचे 'एक गगनभेदी किंचाळी', मुंबईच्या रूपवेधचे 'आथोलो' इत्यादींचा आवर्जून उल्लेख करता येईल. 'आथोलो'चे अरूण नाईकने केलेले भाषांतर लक्षणीय आहे. त्याच्या एकूण प्रयोगनिर्मितीचा विचार नोंद घेण्यासारखा आहे. दिग्दर्शक आहे विजय केंकरे.

पुण्यात आणि मुंबईत काही अन्य भाषीय, प्रांतीय मंडळींनी प्रयोग पेश केले. त्यामध्ये भोपाळच्या भारत भवनच्या कलाकारांनी 'महानिर्वाण', 'घाशीराम' केले. कालिकत विद्यापीठातील नाट्यसंघाने 'नृत्य देवते तेडि' हे मल्याळी नाटक केले. 'मजमा' या मुंबईतील संस्थेने 'विच्छू' पेश केले

श्री. कारंथ यांची तीन व्याख्याने नाट्यपरिषदेच्यावतीने झाली. संगीत, अभिनय आणि नाट्यव्यवसाय ह्या विषयांवर अतिशय सखोलपणे ते बोलले. गडकरी जन्मशताब्दी सोहळ्याचा सांगता समारोह झाला. तसेच गडकऱ्यांच्या नावाने एक भरघोस पारितोषिक ठेवले गेले ते वि. वा. शिरवाडकरांना लाभले.

नगरला दुसरे दलित नाट्य संमेलन आणि पुण्याला दलित नाट्यमहोत्सव झाला. परभणीचे राजारामभाऊ कदम (९९) यांना संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार लाभल्याबद्दल अॅक्टिव्हने सन्मान केला. 'घाशीराम'चा अमेरिकेत इंग्रजीत प्रयोग झाला. थिएटर अॅकॅडमीने नवलेखकांच्या प्रोत्साहनासाठी एक नाट्यलेखक शिबिर आयोजित केले होते. त्यामध्ये अजित आणि प्रशांत दळवी, विनोद हडप, शफाअत खान, अरविंद विश्वनाथ, अतुल पेठे इत्यादी नवनाटककार होते. चर्चेसाठी विजय तेंडुलकर, श्रीराम लागू आदी मान्यवर आले होते.

लंडनच्या डेव्हीड ग्रीव्हज यांनी 'मूकाभिनय', 'मुखवटे' विषयावर शिबिर घेतले. नाट्यसमीक्षक संघाची स्थापना होऊन त्यांनी विविध नाटकांवर जाहीर चर्चांचे चार कार्यक्रम यशस्वीपणाने केले.

प्रभाकर पणशीकर नाट्यसंमेलनाचे पुन्हा एकदा अध्यक्ष झाले.

तर असे १९८५ साल. त्यातील रंगभूमीचे अधिक उणे!

–वि. भा. देशपांडे



चित्रपट

## जुळ्या भावांची आणखी एक कहाणी

# लवर बॉय

'राम और शाम'ने दोन एकाच चेहऱ्याच्या पण अगदी भिन्न स्वभावाच्या भावांची कथा लोकप्रिय केली. त्यानंतर काही वर्षांनी 'सीता और गीता'नं तुफान यश मिळवलं आणि लोकप्रिय तारे–तारकांना दुहेरी भूमिका देऊन जुळ्या भावंडांची कथा पडद्यावर आणण्याची लाटच आली. अलिकडच्या काळात मात्र अमिताभ बच्चनसारखं चलनी नाणं असतानाही 'महान'नं जबरदस्त आपटी खाल्ली आणि हा प्रकार थंडावल्यासारखा झाला होता. अशावेळेस शोमू मुखर्जीनं राजीव कपूरला दुहेरी भूमिका देऊन 'लवर बॉय' पडद्यावर आणण्याचं धाडस केलं आहे.

वास्तविक राजीव कपूर तसा सुदैवीच म्हणायला हवा. दुहेरी भूमिकेसारखी महत्त्वाची संधी अनेक भल्याभल्यांना अजून मिळालेली नाही. पण राजीव कपूरच्या छोट्याशा आणि अजूनही फारशा यशस्वी न ठरलेल्या कारकिर्दीत दुहेरी भूमिका दुसऱ्यांदा त्याच्या वाट्याला आली आहे.

'लवर बॉय'ची कथा नेहमीचीच आहे. दोन भावांच्या सारख्या दिसण्यामुळे होणारा गोंधळ, त्यांच्या दोन प्रेमकहाण्या, याला एका मौल्यवान मूर्तीसाठी होणाऱ्या धडपडीची जोड दिली आहे.

रायसाहेबांना (ओम शिवपुरी) एक अतिशय मौल्यवान आणि जुनीपुराणी मूर्ती एका जुन्या गुहेत सापडते. तिच्यावर आपल्या विश्वासू साथीदाराला (नवीन निश्चल) लक्ष ठेवायला सांगून ते पोलिसांना आणायला जातात. तोपर्यंत सुंदरलाल (कादरखान) त्यांच्या भावाचा खून करतो. त्याचा आळ नवीन निश्चलवर येऊन त्याला जन्मठेप होते.

त्याच्या बायकोला मालतीला (तनुजा) जुळी मुलं होतात. जिच्या घरी ती असते ती बाई त्यातलं एक आपल्याला ठेवून घेते. मालती आपल्या मुलाला घेऊन एका अनाथाश्रमाच्या आश्रयाला जाते.

ही दोन्ही मुलं किशन आणि कन्हैय्या (राजीव कपूर) नावानं पुढं मोठी होतात. किशन भोळा तर कन्हैय्या पाकिटमारी वगैरे करणारा.

किशनची भेट रायसाहेबांच्या मुलीशी राधाशी (मीनाक्षी शेषाद्री) होते आणि तो तिच्या प्रेमात पडतो. पण आपल्या बावळटपणामुळे आपण तिला मिळवू शकणार नाही हे त्याला माहीत असतं. एवढ्यात अपघातानं त्याची भेट कन्हैय्याशी होते आणि कन्हैय्या व त्याची मैत्रीण बिजली (अनिता राज)त्याला मदत करायचं ठरवतात.

राधा ही कन्हैय्याची लहानपणची मैत्रीण असते. किशनला मदत करता करता तोच राधाच्या प्रेमात पडतो. इकडे बिजलीही किशनवर प्रेम करत असते. किशनला हे कळताच तो राधा–कन्हैय्याच्या मार्गातून बाजूला होतो; पण कन्हैय्यानं आपली फसवणूक केली, ही भावना असल्यामुळं रायसाहेबांच्याकडची मौल्यवान मूर्ती चोरण्यात तो सुंदरलाल आणि त्याच्या मुलाला (मॉंटी) मदत करतो.

पुढं आपण भाऊ असल्याचं दोघांनाही कळतं आणि मग शेवटची मारामारी वगैरे होऊन शेवट गोड.

चित्रपटाची कथा निर्माते–दिग्दर्शक शोमू मुखर्जीचीच आहे. अर्थात ते नुसतं नावालाच. कारण कथा म्हणजे काय, तर चार–पाच चित्रपटातून गोळा केलेला मसाला. संवाद कादरखानचे असल्यामुळे त्यांचाही तोच प्रकार आहे. स्वतःसाठी त्यानं विनोदी झाक असलेले संवाद लिहिले आहेत. पण दाक्षिणात्य चित्रपटातून हा प्रकार त्यानं बरेचदा केलेला असल्याने तो कंटाळवाणा वाटतो.

'लवर बॉय'च्या १८ रिळातला बराच भाग किशन, कन्हैय्या, त्यांच्या मैत्रिणी, राधाला जिंकण्यासाठी कन्हैय्यानं केलेले प्रयत्न यातच खर्ची पडतो. यात सगळ्यात मनोरंजक भाग म्हणजे कन्हैय्या एम्. ए. राम्स्वामी बनून राधाबरोबर सहलीला जातो हा. चित्राचं हेच स्वरूप कायम ठेवलं असतं, तर जुळ्या भावांचा प्रकार असूनही चित्रपट बऱ्यापैकी हलकाफुलका, करमणूकप्रधान होऊ शकला असता; पण या प्रकारात मारामाऱ्या, खलनायक यांना फारसा वाव मिळालेला नसल्याचं लक्षात आल्यावर दिग्दर्शकानं सुरवातीच्याच मूर्तीचं प्रकरण पुन्हा उपस्थित करून 'म्युझिकल मारामारी' दाखवलीय.

राजीव कपूरनं किशन व कन्हैय्या अशी दुहेरी जबाबदारी सांभाळलीय. त्यानं काम बरं केलंय. बावळट किशन म्हणून त्यानं राजकपूरची नक्कल करायचा काही ठिकाणी प्रयत्न केलाय. तो मात्र वाया गेलाय. रामस्वामीचं सोंग घेतल्यावेळेसचं त्याचं काम मात्र चांगलं आहे. मीनाक्षी शेषाद्री राधा म्हणून ठीक आहे. अर्थात तिच्या भूमिकेत नाविन्य काही नाही. तिच्यापेक्षा बिजलीची भूमिका वेगळी आहे. आणि अनिता राजनं ती ठसक्यात रंगवलीय. तनुजा, नवीन निश्चलला फारसा वाव नाही.

चित्रपटाचं छायाचित्रण मात्र सदोष आहे. चित्रपट नवाकोरा असूनही बऱ्याचदा चित्रं धूसर दिसतात.

'लवर बॉय'ला संगीत भप्पी लाहिरीचं आहे. चित्रपटात नाच, गाण्यांची लयलूट असल्यानं त्याचं बरं आहे. 'मैं तेरा प्यार हूँ' सारखी काही उडत्या चालीची गाणी नंतर लक्षात राहाणारी नसली तरी चित्रपट बघताना ऐकायला बरी वाटतात.

–सीमा कुलकर्णी

विज्ञान

# गोड आवाजाची चकती

समजा तुमच्या आवडत्या गायकाच्या गायनाचा कार्यक्रम दूर गावी आहे व तीव्र इच्छा असूनही त्या कार्यक्रमाला हजर राहू शकत नाही. पण त्यामुळे आता वाईट वाटण्याचे कारण नाही प्रत्यक्ष कार्यक्रमात हजर राहून गायन ऐकण्याचा आनद तुम्ही घरबसल्या उपभोगू शकता. मात्र यासाठी तुमच्याजवळ टेप रेकॉर्डर किंवा रेकॉर्ड प्लेअर असून भागणार नाही ही उपकरणे मूळ आवाजाची गोडी कायम ठेऊ शकत नाही. शिवाय काही दिवसानतर, वापरून वापरून रेकॉर्ड घासून खराब होण्याची, किंवा टेप-रेकॉर्डरचे 'हेड' खराब होण्याची दाट शक्यता असते ती वेगळीच. त्याकरिता तुमच्याजवळ 'कॉंपॅक्ट डिस्क सिस्टिम' नावाचे नवीन इलेक्ट्रॉनिक यत्र असण्याची आवश्यकता आहे या यत्राच्या साहाय्याने तुम्ही लता मगेशकरने गायलेले भावगीत किंवा अनुप जलोटाचे गोड आवाजातील भजन, मूळच्याच गोड, स्पष्ट व स्वच्छ आवाजात ऐकू शकाल. अगदी उच्च दर्जाचा हाय-फायडिलिटी ( Hi-Fi ) आवाज म्हणजेच जसाच्या तसा आवाज तुम्ही ऐकू शकाल. या नवीन विद्युत्उपकरणाने अमेरिकन सगीतप्रेमी रसिकाना अक्षरश: वेड लावले आहे. या यंत्राच्या व त्यावर चाल-णाऱ्या चकत्यांच्या झंझावती विक्रीने निर्माते व विक्रेते यांना बुचकळ्यात पाडले आहे. अर्थात या मोहिनीचे रहस्य आहे, या यंत्राच्या मूळ आवाजाचे पावित्र्य राखण्याच्या क्षमतेत.

व्हिडियो कॅसेट रेकार्डर ( VCR ) पेक्षा हे उपकरण जास्त लोकप्रिय होऊ पहात आहे. कारण विक्रीची जी पातळी VCR ने ६ वर्षांत गाठली होती, तीच पातळी हे उपकरण केवळ तीन वर्षांत गाठू पहात आहे. १९८३ साली प्रथमच अमेरिकन बाजारपेठेत प्रवेश केलेले हे उपकरण १९८६ सालापर्यंत चांगलेच लोकप्रिय झालेले असेल. तोपर्यंत याचे एक लक्ष सेटस् खपलेले असतील असा अंदाज आहे. एका विक्रेत्याचे तर दु:ख हे आहे की तो गिऱ्हाईकाच्या मागणीप्रमाणे माल पुरवू शकत नाही. त्याच्याजवळ उप-लब्ध असलेले सर्व सेटस् खपलेले आहेत. मूळ आवाजाची गोडी कायम ठेवण्याची क्षमता या चकतीत केवळ आश्चर्यकारक आहे. शिवाय ही चकती वापरून खराब होण्याची मुळीच शक्यता नाही. त्यामुळे याच्या सेटस्‌ची विक्री परंपरागत टेपरेकॉर्डरस् व रेकॉर्ड प्लेअर्सच्या विक्रीला मागे टाकील याबद्दल मुळीच शका नाही.

## यंत्राची रचना व कार्यपद्धती

या यत्राचा प्रमुख भाग म्हणजे चकती. तिला शास्त्रीय भाषेत 'कांपॅक्ट डिस्क' असे म्हणतात. ही चकती स्वच्छ प्लास्टिकची केलेली असून तिच्यावर आरशाप्रमाणे चक-चकीत व अतिशय पातळ अशा अॅल्युमिनि-अमच्या पत्र्याचे रोपण करण्यात येते. या चकतीचा व्यास ४.७५" इतका असतो, पण आवाज सग्रहित करण्याची या चकतीची क्षमता १२" व्यासाच्या LP रेकॉर्डपेक्षा फार जास्त असते ही LP रेकार्डच्या अडीच पट असते. या चकतीवरील संग्रहित आवाज ऐकण्यासाठी लेसर किरणे व कप्युटर याचा उपयोग करावा लागतो. कारण या चकतीवर ध्वनीचे 'डिजिटल रेकॉर्डिंग' केलेले असते. प्रथम ध्वनीचे बायनरी आकड्यात ( म्हणजे ० व १ ) मध्ये पृथ:करण केले जाते व मग हे आकडे चकतीच्या अॅल्युमिनियम पृष्ठभागावर संग्रहित केले जातात. म्हणजेच या चकती-वर जवळ जवळ १०००००००००००० इतक्या सूक्ष्म खाचा असतात. या खाचा रेकॉर्ड केलेल्या ध्वनीचे बायनरी आकड्यात प्रतिनिधित्व करतात.

ही चकती यंत्रावर ठेवल्यानंतर व यंत्र सुरू केल्यानंतर मिनिटाला पाचशे वेळा या वेगाने स्वत:भोवती फिरते ती फिरत अस-ताना लेसर किरणाचा पुजका तिच्यावर पडेल अशी व्यवस्था केलेली असते. तो नेमका त्या सूक्ष्म खांचावर पडतो व त्यावरून परा-वर्तीत होतो. हे परावर्तीत किरण मग 'डिटेक्टर' मध्ये प्रवेश करतील अशी सोय असते. त्यातून मग ( मायक्रोकप्युटरला ) सुक्ष्मसगणकाला योग्य ते डिजिटल सदेश प्राप्त होतात. त्याचे हा कंप्युटर ध्वनीत रूपातर करतो. अशा रीतीने चकतीवर रोपण केलेले संगीत ऐकू येते. या यंत्राचे वैशिष्ठ्य असे की यातील चकतीच्या पृष्ठभागाला लेसर किरणाशिवाय कशाचाही स्पर्श होत नाही: त्यामुळे चकती खराब होण्याचा किंवा आवाजात खरखर होण्याचा धोका संभवत नाही.

जर चकतीवर अनवधानाने ओरखडे पडले असतील तर त्याचा आवाजाच्या शुद्धतेवर काहीच परिणाम होत नाही. कारण या ओरखड्यावरून लेसर किरणे अलगदपणे सरकतात; पण त्याचे डिजिटल रूपांतर होऊ शकत नाही व म्हणून आवाज निर्माण होऊ शकत नाही. लेसर किरणाना जर चकतीवर अडथळे आढळले तर ते त्यावरून अलगदपणे उडी मारून पुढे जातात व मागील आवाज चालू ठेवतात.

कापॅक्ट डिस्क सिस्टिमच्या वाढत्या खपाला ज्याप्रमाणे त्याचा शुद्ध व गोड आवाज कारणीभूत आहे, त्याचप्रमाणे त्याची घसरणारी किंमतही जबाबदार आहे. शिवाय या चकत्या अतिशय टिकावू असतात. सध्या या यंत्राची किंमत १८० डॉलर्स असून एका चकतीची किंमत १२ ते १४ डॉलर इतकी आहे; पण दोन वर्षांपूर्वी ह्याच किंमती अनुक्रमे १००० डॉलर्स व २० डॉलर्स इतक्या होत्या. लवकरच ही किंमत १०० डॉलर्स इतकी होण्याची शक्यता आहे.

या यंत्राची वाढती मागणी लक्षात घेऊन जपानच्या जवळ जवळ ४५ कंपन्यांनी याची निर्मिती सुरू केली आहे. अमेरिकेत सध्या याचे विविध प्रकार उपलब्ध आहेत. एक म्हणजे टेबल मॉडेल, दुसरे पोर्टेबल व तिसरे मोटारीत बसविण्याचे मॉडेल. मोटारीत बसवावयाच्या मॉडेलचे वैशिष्ठ्य म्हणजे, मोटर खाच-खळग्यातून गेली तरी यत्राच्या आवाजात जरासुद्धा फरक होणार नाही.

विशेष म्हणजे यंत्र विकत घेणाऱ्यांना नवनवीन चकत्या ऐकण्याचे जणू वेडच लागते. म्हणून गिऱ्हाईक नव-नवीन चकत्या खरेदी करण्यासाठी अगदी बेचैन होतात. गिऱ्हाईकाच्या चकत्या खरेदी करण्याच्या बाबतीतील निर्मात्याचे सगळे अंदाज कोल-मडून पडले आहेत. त्याना वाटले होते की यंत्र खरेदी केल्यावर, पहिल्या दोन महिन्यात, गिऱ्हाईक फार तर सहा ते आठ चकत्या खरेदी करतील; पण प्रत्यक्षात गिऱ्हाईकानी

याच्या चौपट ते पाचपट चकत्या खरेदी केल्या !

लता मंगेशकर किंवा अनुप जलोटा यांचा मूळ गोड आवाज आपल्याला ऐकता येण्यासाठी अर्थात या नवीन इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञानाची भारतात आयात करावी लागेल. सध्या तरी तसे झाल्याचे ऐकिवात नाही.

—प्रा. अ. ल. देशपांडे

## इलेक्ट्रॉनिक ! इलेक्ट्रॉनिक !!

असे म्हणतात की भुंकणारे कुत्रे चावत नाहीत. पण त्यावर एकाने असेही म्हटले आहे की 'पण तोच कुत्रा भुंकणे केव्हा थांबवील व चावणे केव्हा सुरू करील याचा काही नेम आहे का?' एवढे मात्र खरे की कुत्र्याचे भुंकणेसुद्धा खूप त्रासदायक ठरू शकते. रात्री कुत्र्यांच्या ओरडण्यामुळे झोपमोड होण्याचा अनुभव सर्वांनीच घेतलेला असतो. तसे कुत्र्यांचे वेड्यावाकड्या सुरात तासन्तास भुंकणे चालू असते आणि ते चालू असेपर्यंत झोप लागणे अशक्य होऊन जाते.

युरोप—अमेरिकेतील लोकांना कुत्री पाळण्याची फारच आवड असते ही गोष्ट प्रसिद्धच आहे. अमेरिकेत कुत्र्यांच्या ओरडण्याने लोकांची झोपमोड होतेच; पण ज्यांची झोपमोड होते तो नुसताच अंथरुणावर तळमळत पडत नाही. आपली झोप कोणाच्या कुत्र्याने मोडली याची तो नोंद घेतो आणि दुसऱ्या दिवशी त्या कुत्र्याच्या मालकावर खटला भरतो आणि अमेरिकन कोर्ट कुत्र्याच्या धन्याला भरपूर दंड करते. त्यामुळे कुत्री पाळणे हे मोठे त्रासदायक काम झाले आहे. मात्र तरी लोकांचे कुत्र्यांविषयीचे प्रेम काही कमी होत नाही.

ॲरिझोना येथील 'ट्रायट्रॉनिक्स' या कंपनीने कुत्र्यांच्या फाजिल ओरडण्यावर एक उपकरण शोधून काढले आहे. हे इलेक्ट्रॉनिक उपकरण लहानशा डबीसारखे असून पट्ट्याने कुत्र्याच्या मानेला बसवता येते. कुत्रा भुंकू लागण्यापूर्वी साधारणतः गुरगुरू लागतो. गुरगुरणे सुरू झाल्याबरोबर या उपकरणातून कुर्रऽऽर असा बझरसारखा आवाज निघतो. ही कुत्र्याला दिलेली सूचना असते. बझरच्या आवाजानंतर जर कुत्रा भुंकत राहिला तर उपकरण त्याला चांगली जाणीव होईल असा शॉक देते. अर्थात हे उपकरण वापरण्यापूर्वी कुत्र्याला शिकवावे लागते.

'ट्रायट्रॉनिक्स चे' मालक श्री. डॅनियल टोर्टोरा स्वतःच कुत्र्यांना शिकवण्याचे काम करतात. ते मानसशास्त्रज्ञ आणि प्राणीशिक्षकच आहेत. या उपकरणांचे नाव इलेक्ट्रॉनिक कॉलर असे आहे. एका वेळी टोर्टोरा ३० कुत्र्यांचा 'क्लास' घेतात. दररोज अर्धा तास याप्रमाणे प्रत्येक कुत्र्याचे एका आठवड्यात शिक्षण पूर्ण होते. मात्र दर तीन महिन्यांनी एकदा अर्ध्या तासाचा 'उजळणी वर्गही' प्रत्येक कुत्र्याला करावा लागतो. या सर्वांमुळे 'इलेक्ट्रॉनिक कॉलर' किती लोकप्रिय होईल याची शंका आहे. पण श्री. टोर्टोरा यांना खात्री आहे कारण हजारो डॉलर दंड द्यावा लागणार नाही व शेजाऱ्याप्रमाणे स्वतःचीही झोपमोड होणार नाही हा फायदा काही कमी नाही !

— भा. रा. बापट

## पुणे वार्ता

पृष्ठ ४ वरून

या आणि अशा अनेक स्वरूपांचे अतिक्रमण युद्धपातळीवर हटवले पाहिजे.

वाहन चालकांना आणि पादचाऱ्यांनाही शिस्तीची नितांत आवश्यकता आहे. सायकलस्वार आणि आता मोपेडस्वार ज्या पद्धतीने वहाने हाकतात तोही चिंतेचाच विषय. रिक्षावाल्यांचे तर विचारू नये असे प्रकार. कुठल्या कुठल्या कोपऱ्यातून ते वेड्यावाकड्या पद्धतीने रिक्षा हाकत असतात. त्यांचे सारेच प्रकार जीवघेणे असतात. वाहतुकीचे नियम मोडणे ही फारशी गंभीर बाब नाही असाच बहुधा सर्वांचा समज आहे. याला पोलीस खात्यातील भ्रष्टाचारही कारणीभूत आहेच.

शहरातील रहदारीच्या दृष्टीने नव्या योजना मांडल्या गेल्या आहेत. पण पुरेशा पैश्यांअभावी त्या रेंगाळत पडल्या आहेत. रस्तारुंदीची कामे प्रकरणे न्यायालयात गेल्याने अपूर्ण आहेत. वीज, टेलिफोन आणि पाणीपुरवठा ही तीनही खाती आपापल्या इच्छेनुसार रस्त्यांवर खोदकाम करत असतात. एकूणच सर्व पातळीवर रहदारी हा समस्येचा विषय बनला आहे आणि त्याला आज तरी उत्तर नाही. अजून एकदोन वर्षात या वहातुकीचे काय होईल याचा विचार न करणेच चांगले ! या साऱ्या पार्श्वभूमीवर केवळ मार्गदर्शनाने असे या सप्ताहात काय साधले जाणार आहे ते संयोजकच जाणोत !

—मनोहर सोनवणे

प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्यांचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलांची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे ?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा.

मला निसटलंच पाहिजे !

अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No-11 ) Regd. No. PNCW - 28

बुद्धी व भावना या दोन्हीच्या सहाय्याने माणसाचे जीवन घडते. व्यक्तिमत्त्वात त्याचे संतुलन असावे लागते. हे संतुलन असणारा माणूसही पूर्ण बुद्धिनिष्ठपणे विचार करतोच असे नाही. तोही छोटयामोठया अनेक समजुती स्वतःशी बाळगून असतो. त्या अवैज्ञानिकच असतात; पण तेवढयामुळे त्याचा तोल गेला असे होत नाही. मात्र बुद्धी व भावना याचे हे संतुलन एका मर्यादेपलिकडे बिघडले की, बुद्धी गहाण पडते. माणूस भावनेची शिकार बनतो. अंधश्रद्ध होतो.

□

अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतल्या एका कार्यकर्त्याने बुवाबाजी, झपाटणे, भानामती, वशीकरण, पुनर्जन्म, ग्रहांचे खेळ यासारख्या आपल्या समाजात ठाण मांडून बसलेल्या गोष्टींचे केलेले शास्त्रशुद्ध विवेचन आणि अंधश्रद्ध निर्मूलन चळवळीतले प्रत्यक्ष अनुभव.

## विज्ञाननिष्ठा रुजवणारे राजहंसचे नवे प्रकाशन

# भ्रम आणि निरास

## लेखक : डॉ. नरेंद्र दाभोळकर

**पृष्ठे : १४० / किंमत : ३० रुपये**

## राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०. फोन : ४४ ३४ ५९

वा. र. गोडे, ४१ भवानी शंकर रोड
जोशी वाडी, चितळे पथ कॉर्नर, दादर
मुंबई : ४०० ०२८ * फोन : ४२२ ५४५५